IRBK-0100433

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ४३३

IRBK-0100433
IRBK-0100433

४३३
नाटक

श्री.

# संगीत उग्रमंगल नाटक.

## अंक पहिला.

IRBK-0100433

( मुली मंगलाचरण करितात

### पद १

( राग यमन. ताल त्रिवट. )

नृ-हरि-तनू-धर हरि भजूं या भैरवी सौम्य विभुची
मूर्ति निरंजन मनुज-कृति-फलद नेणते ह्मणती
संकटकरही संकटहर ॥ ध्रु० ॥
ग्रह नवही नटे हा स्थित निजपदीं भ-राशि-रूप
लम दिन-मासीं मुहूर्त घटिका काल सकल ॥

### पद २

(राग हमीर. ताल झंपा).

राधिका कुंजवनिं । धुंडिते नाथ तंव । सखीशीं प्रणयरत ।
निपट पाहे तया ॥ ध्रु० ॥ न अपराधिक समज । सुमुखि
अपराधिकां । तिजासिं बोले चतुर । करो हरि तो दया ॥

## प्रवेश पहिला.

स्थळ—रतनपुर—राजवाडा. पद्मावती राणीचा एक महाल.

पद्मावतीः—( गायन करीत प्रवेश करिते.)

### पद ३

(राग दरबारी कानडा. ताल त्रिवट.)

नवल गमे मज ग्रह-चिंता । विग्रहवंता होय दुरंता ॥ ध्रु० ॥
मंगल अवनी-सुत अतिसुंदर । होय अमंगल कैसा अवनी-नाथा

**दुर्गावती:**–( प्रवेश करून ) सखे पद्मावती, येतां येतां मी तुझ्या गाण्यापैकीं शेवटचा ग्रहचिंता हा शब्द ऐकला.

**पद्मावती:**–( चपापून स्वगत ) माझें हृद्गत इनें ताडलें कीं काय ? ( उघड ) बरें मग ?

**दुर्गावती:**–तेव्हां ह्मटलें, आज पद्मावतीला ग्रहचिंता कुठची आठवली आहे ? कर्तृत्वाची माणसें असतात तीं ग्रहांच्या वर्चस्वाला जुमानीत नसतात. सखे, लंकानाथ सिंहासनाला नवग्रहांच्या पायऱ्या करून त्यांना पायाखालीं तुडवून साऱ्या त्रिभुवनावर सत्ता गाजवीत होता.

**पद्मावती:**–पण रावणाच्या पायऱ्या झालेले नवग्रह त्यावेळीं पालथे पडले होते, ह्मणूनच रावणाची जबरदस्ती चालली बरें !

**दुर्गावती:**–एकूण ग्रहांनासुद्धां ग्रहदशा सुटली नाहींच ! तर मग ते आह्मां मानवांप्रमाणें दुर्बळच समजले पाहिजेत. मग त्यांच्या पीडेबद्दलची चिंता पाहिजे कशाला ?

**पद्मावती:**–पण ग्रहांच्या पीडेची चिंता पडली आहे कुणाला ! मी ह्मणत होतें गृहचिंता आणि तूं ऐकलेंस ग्रहचिंता ! त्याला मी काय करूं ?

**दुर्गावती:**–वा ! ही तर त्याहून नवलाची गोष्ट ! हें पहा, अष्टनायिकांतली सर्वांत उंच पायरी स्वाधीनभर्तृकेची आहे. आणि ती पदवी तर तूं कधींच बळकावून बसली आहेस ! खरें ना हें ?

**पद्मावती:**–( हंसत ) स्वाधीनभर्तृका ? होय. सध्यां तरी तें पद मला मिळालें आहे खरें !

**दुर्गावती:**–झालें तर ! नवरे आपल्या अनुरोधानें कसे वागतील ही काय ती बायकांना चिंता असायची. तूं तर स्वतःला स्वाधीनभर्तृका ह्मणवतेस आणि मग तुलाग गृहचिंता कुठून आली ?

**पद्मावती:**–दुर्गावती, संसारांत चिंता ही ज्याची त्याच्यापरी सर्वांना लागलेलीच आहे. मी राजपत्नी आहें तरी माझा सर्व काळ आनंदांत जात असेल असें मानूं नकोस !

## पद ४

( राग यमन. ताल त्रिवट. )

आण तव गडे ! । सुख मला । नृप-रमणी-वैभविं नोहे ।
जरि पति माना । गुण-गण वानी । मनिंचें जाणी ॥ ध्रु० ॥
सदन-भार । समज अनिवार । हुर हुर थोर झुरवि हें हृदय सतत ॥

तूं संसार करूं लागलीस ह्मणजे गृहिणींच्या चिंता काय असतात तें सर्व तुझें तुलाच कळूं लागेल.

**दुर्गावती**:–( हंसत ) बरें बरें ! अहो संसार केल्या संवरलेल्या आजी-बाई ! आपला उपदेश मी मान्य करतें ! राहूं दे ती गृहचिंता तुझी तुझ्याजवळ ! मी इतकेंच कळवायला आलें आहें कीं, मी आतां घरीं जायला निघालें.

**पद्मावती**:–खरेंच का दुर्गावती ? आतांच निघणार ? बरें आहे. कलावंती, ( कलावती येते. ) ताईसाहेब आतांच घरीं जायला निघणार. त्यांच्या स्वारीची सर्व तयारी नीटनेटकी झाली आहे कीं नाहीं, एवढें पाहून ये बरें. ( कलावती जाते. )

**दुर्गावती**:–पद्मावती, आपण वाराणसीस पाठशाळेंत शिकत होतों तेव्हां गुरुजीनीं चर्चेसाठीं एकदां बायकांनीं राजकारणांत मन घालावें कीं न घालावें असा उपन्यास केला होता तो आठवतो का तुला ?

**पद्मावती**:–तो कसा मी विसरेन ? पाठशाळेंत कितीक दिवस तो वाद मारे धूमधडाक्यानें चालला होता ! बाकीच्या सर्व मुली एकीकडे आणि आम्ही दोघी एकीकडे. मुली म्हणायच्या कीं, बायकांनीं संसार तेवढा करावा. राजकारण हा मुळीं स्त्रियांचा विषयच नव्हे !

**दुर्गावती**:–आणि आम्ही म्हणत होतों कीं, बायकांनीं संसार सोडून राजकारणांत पडूं नये हें कबूल. पण जर एखाद्या महत्त्वाच्या राजकार्याचा नाश पुरुषांच्या हातून झाला तर त्याचे दुष्परिणाम निमूटपणें सोसून बायकांनीं मुळूमुळू रडत घरांत बसून रहावें हें नाचकीचें काम आहे ! त्यांनींसुद्धां नासलेलें राजकारण सुधारण्यासाठीं आपलें बुद्धिकौशल्य खर्चा-यल. पुढें सरसावलेंच पाहिजे ! आतां एवढें मात्र खरें कीं, बायकांनीं राजकारणांत मन घालायचें तर संधि करण्यापुरतेंम्हणजे प्रतिस्पर्ध्यांतला

कलह मोडून त्यांत परस्पर मैत्री उत्पन्न करण्यापुरतें मात्र मन घालावें. लढाऊ राजकारणाच्या भरीस त्यांनीं पडूं नये.

**पद्मावती**:—तें कां बरें? मी तर म्हणतें कीं, प्रसंग पडेल तर तरवार मारायलासुद्धां बायकांनीं कचरतां कामा नये!

**दुर्गावती**:—मला नाहीं तसें वाटत! संधि घडवून आणायला आवश्यक लागणाऱ्या दया, क्षमा, शांति, प्रीति या सर्व स्त्रिया आहेत. त्या स्त्रियांच्या हृदयाचें अधिष्ठान करून रहाणाऱ्या देवता आहेत! या देवतांच्या अनुकूलतेमुळें स्त्रियांना संधिकार्य जसें सुगम होईल तसें संग्रामाचें कार्य होणार नाहीं. कारण त्यांत लागणारे मंत्र, पराक्रम, उत्साह हे सारे पुरुष आहेत. ते लढाईत दहादहा जखमा लागलेले राव आणि मोठमोठे बहादूर वीर यांच्याच घरीं पाणी भरायचे! ते आम्हां बायकांच्या हातीं लागावे कसे?

**पद्मावती**:—बायका या स्वतः राव नसतील आणि बहादूरही नसतील, पण नानायत्नांनीं पुरुषांना वश करून घेण्यांतली त्यांची रावबहादुरी सर्वमान्य आहे! मंत्र, उत्साह, पराक्रम हे पुरुष असले म्हणून काय झालें? त्यांनाही बायकांनीं वश करून आपल्या ताब्यांत आणलेंच पाहिजे!

**दुर्गावती**:—छे छे! संग्राम म्हटला म्हणजे तो अतिनिर्दय राक्षसीवृत्तीचा हिंसापूर्ण असा व्यवहार आहे! तो करण्याची इच्छा कोमल अंतःकरणाच्या स्त्रियांनीं कधींही धरूं नये!

**पद्मावती**:—आह्मांला युद्धकर्म दे म्हणून कोणी स्त्रिया देवाजवळ मुद्दाम मागणें मागायला कांहीं जात नाहींत; इतकें असून तें युद्धकर्म कपाळीं आलेंच तर केलें पाहिजे. तिथे डरून काय उपयोग!

**दुर्गावती**:—पण युद्धनीति ही कपटवेष, कपटभाषण आणि कपटकर्म करायला शिकवते. आणि तसें केल्यानें स्त्रियांच्या चारित्र्याला अपवाद येतो.

**पद्मावती**:—पातिव्रत्य संभाळणें हा स्त्रियांचा मुख्य धर्म आहे. तेवढा धर्म पाळला म्हणजे युद्धकर्मांत इतर अपवाद येतील त्यांची पर्वा मानण्याचें कांहीं एक कारण नाहीं. असो. आजच्या स्थितीला आमचा हा वाद अगदींच अप्रस्तुत आहे. समुद्र तरायचा झाला तर तो नावेंत बसून तरावा!

कीं कमरेला भोंपळे बांधून तरावा, हिमालयाचें शिखर चढायचें तर स्वतःच्या चालीनें चढावें कीं बकऱ्याच्या पाठीवर बसून चढावें, यासारखाच आपला हा वाद निवळ करमणुकीचा विषय आहे. कारण तुला काय आणि मला काय, असलीं तहाचीं अथवा लढाईचीं राजकारणें ढवळण्याचा प्रसंग जन्मांतसुद्धां कधीं यायचा नाहीं !

**दुर्गावती**:—हां हां ! तसें मात्र समजूं नकोस बरें ! तूं पतकरला आहेस विग्रहवाद आणि मीं पतकरला आहे संधिवाद. आणि त्याप्रमाणें स्वतः आचरण करून दाखवण्याचें कारण मला माझ्याच घरांतून कसें उत्पन्न झालें आहे हें तूं जाणतेच आहेस.

**पद्मावती**:—होय. तुझे वडील भीमसिंगराजे यांच्या मनांत पापबुद्धि उत्पन्न होऊन त्यांनीं आम्हांशीं बिघाड पुकारला आहे, आणि त्यांच्या आज्ञेवरून तुझा भाऊ कुमार हिरासिंग यानें फौजेसह आमच्या राज्यावर चाल करून सरहद्दीच्या प्रांतांत लुटालुटीचा धुमाकुळ माजवला आहे, अशा बातम्या आल्या आहेत.

**दुर्गावती**:—आणि त्यासाठींच मी घरीं पोंचल्याबरोबर वडिलांना युद्धापासून परावृत्त करण्याची खटपट करणार आहें.

**पद्मावती**:—फार चांगली गोष्ट ! पण ही खटपट तूं भीमसिंगांचीं आर्जवें करून त्यांची मर्जी न दुखवतां समजूत घालून करणार असेंच ना ?

**दुर्गावती**:—हें उघडच आहे. दुसरें काय मी करणार ?

**पद्मावती**:—तसें असेल तर मग तुझ्या कारस्थानाचा ओनामाच मुळीं चुकला आहे बरें ! कसा म्हणशील, तर तूं वाराणसीहून गुरुजींचा निरोप घेऊन परभारें माणिकदुर्गाला आपल्या घरीं चालली होतीस; ती मुद्दाम वाट सोडून तुझ्या वडिलांच्या शत्रूच्या म्हणजे आमच्या घरीं मला भेटायला आलीस. या तुझ्या कृत्यानें भीमसिंग संतोषी होतील कीं क्रुद्ध होतील हें सांग बरें ?

**दुर्गावती**:—पण मी तरी त्यांच्याच कामासाठीं तुझ्याकडे आलें आहें ना ?

**पद्मावती**:—भीमसिंगाचें काम आणि मी करायचें ? मी तें साफ करणार नाहीं. मीं शत्रूच्या उपयोगीं कां पडावें ?

**दुर्गावती**:–( हंसत ) अग चुकलें. त्यांचें काम नव्हे, माझें काम.

**पद्मावती**:–तसें असेल तर गोष्ट निराळी. तुझें काम तें माझेंच काम ! सांग काय करूं तें ?

**दुर्गावती**:– हें पहा, युध्यमान राजांचें सख्य करून द्यायचें तर त्याला दोहीं पक्षांची थोडी थोडी अनुकूलता आगाऊ असावी लागते. जेव्हां समेटाची संधी येईल तेव्हां माझ्या वडिलांचें मन मी खात्रीनें वळवीन.

## पद ५

( राग मियाचा मल्हार. ताल एक्का. )

**मोह–दशा–वशा सखे जनका । क्षय–भय नोहे ।**
**बुद्ध करिन त्या । प्रार्थना–प्रभावें ॥ ध्रु० ॥**
**समर–शमन झणि व्हावें । जग सुखित असावें ।**
**न रुसावें । प्रिय मम जगदीशें सफल हेंचि करावें ॥**

असें जरी आहे तरी प्रतिपक्षाची पायधरणी करण्याचा प्रसंग येईल तेव्हां तिथें माझी भीड कशी चालेल? माझा वशिला काय तो तुझ्यापाशीं. आणि ऐन वेळीं तूं युद्धक्षेत्रांत हजर असशील असा थोडाच भरंवसा धरतां येतो आहे ! तेव्हां मी म्हणतें, कीं आजच तूं लक्ष्मणसिंग महाराजांच्या कानावर ही गोष्ट घालून मीं योजलेल्या सत्कार्याला त्यांचीं अर्धीमुर्धी कबुली आगाऊ मिळवून दे.

**पद्मावती**:–छे छे बाई ! लढाईची गोष्ट आणि ती या वेळीं त्यांच्या कानावर घालायची ! अगदीं नांवसुद्धां काढूं नकोस.

**दुर्गावती**:– कां बरें ? स्वाधीनभर्तृके ! असें कां बोलतेस ? नवऱ्याकडून एवढेंही काम करून देणें तुझ्यानें होत नाहीं माझ्यासाठीं ?

**पद्मावती**:–सखे, तूं सांगतेस तें काम तूर्त माझ्यानें व्हायचें नाहीं ! तें कां व्हायचें नाहीं, याला कारण सबळ आहे. पण तें कारणही मला सांगतां येत नाहीं !

**दुर्गावती**:–तुझी मला फार आशा वाटत होती गडे ! पण तूं नाहींच म्हणतेस तिथें काय करायचें ? बरें, आतां एवढें तरी कर कीं, लक्ष्मणसिंग-महाराजांच्या नांवचें एक पत्र मला लिहून दे. पत्रांत मजकूर इतकाच

असावा कीं, उभयपक्षीं सलोखा रहावा ह्मणून दुर्गावती जें जें सांगेल तें तें मीच सांगतें असें समजावें, आणि निःशंकपणें मान्य करावें.

**पद्मावतीः**–आलें ध्यानांत. पण याला पत्र कशाला पाहिजे ? पत्रापेक्षांही अधिक विश्वासाची एक उत्तम वस्तु तुला देतें. ( आपल्या बोटांतून मुद्रिका काढून तिच्या बोटांत घालते. ) ही मुद्रिका नीट जपून ठेव आणि तूं म्हणतेस तें कारण जेव्हां उत्पन्न होईल तेव्हां महाराजांना ही दाखव; ह्मणजे तूं जें जें सांगशील तें तें प्रत्यक्ष मीच बोलतें आहें असें समजून ते निमूटपणें मान्य करतील. अगदीं तिळमात्र दिक्कत घ्यायचे नाहींत. मात्र या मुद्रिकेचा एकदांच उपयोग करण्याची परवानगी मीं तुला दिली आहे.

**दुर्गावतीः**–( हर्षानें ) सखे पद्मावती ! तूं हा माझ्यावर मोठाच उपकार केलास. आणि यानें माझें निम्में काम आजच पार पडलें असें मी समजतें. या मुद्रिकेचा एकदांच उपयोग करण्याची तुझी शर्त मी इमानानें पाळीन बरें ! याउपर युद्ध थांबवून तुझा नवरा आणि माझे वडील यांमध्यें सौरस्य करून देण्याचें काम जर या दुर्गावतीला जिवाचा सुद्धां बळी देऊन करतां येण्याजोगें असेल तर तें ती करून दाखवील. ही तिची प्रतिज्ञा ऐकून ठेव.

**पद्मावतीः**–देव करो आणि तुझा यत्न सफळ होवो !

**कलावतीः**–( प्रवेश करून दुर्गावतीस ) ताईसाहेब, निघण्याची सर्व तयारी झाली आहे.

**दुर्गावतीः**–तर मग आतां निघालेंच पाहिजे. येतें बरें ! पद्मावती, ज्या आम्ही क्षणभरसुद्धां एकमेकांना विसंबत नव्हतों, त्याच आम्ही याउपर नुसत्या दर्शनसुखालासुद्धां पारख्या होणार ! आम्हां बायकांचा आयुष्यक्रम देवानें पुरुषायत्त करून ठेवला ! ते नेतील तिकडे आम्ही जायचें आणि ते राहतील तिकडे रहायचें !

## पद. ६.

(राग जयजयवंती. ताल झंपा.)

**सुहार्दा भुकेला । स्त्री-भाव केला ।**
**स्वातंत्र्य लीला । न ठावी तयांला ॥ ध्रु० ॥**

**अनुराग-रुचिरा । मन देति अवला ।**
**निजभाव विसरतां । त्या होति महिता ॥**

तूं लक्ष्मणसिंग महाराजांची पट्टराणी झालीस. तुझें ऐश्वर्य पाहून फार फार संतोष झाला. माझ्या भावी आयुष्यक्रमाचा लखोटा अजून फुटावयाचा आहे !

**पद्मावती:**—दुर्गावती, देव सद्गुणांचा कैवारी आहे. जें ऐश्वर्य माझ्या वांट्याला आलें तेंच तुझ्याही वांट्याला येईल बरें ! चिंता करूं नकोस. ( परस्परांस आलिंगन देतात. दुर्गावती जाते. गणक येतो. ) या गणकाचार्य, या. स्वारीच्या दर्शनाला जाऊन आलांत हें पोषाखावरून दिसतेंच आहे ! काय चालला आहे तिकडे उद्योग ?

**गणक:**—महाराजांनीं आपली तसबीर काढली आहे ना ? त्याच तसबिरींत रंग भरण्याचें काम चाललें आहे. अगदीं गर्क होऊन गेले आहेत. आणि राणीसाहेब ! आपणही वसंतोत्सवांत त्यांना खूप रंगवून सोडलें आहे ! मी अर्धी घटका तिथे होतों तितक्यांत पांच चार वेळां आपली आठवण निघाली होती.

**पद्मावती**—( हर्षानें ) होय ना ! जातें. आतां लौकरच तिकडे जातें. बरें, मीं सांगितलें होतें त्याप्रमाणें वर्षफळ ऐकवण्याचा थाट् उतरलात ना ? काय सांगितलेंत वर्षफळ ?

**गणक**—काय सांगितलेंत हें काय विचारावें ! जशी आपली सूचना होती तसेंच बोललों. मात्र तें दरबारी भाषेनें लेंकड्याच्या चालीप्रमाणें वांकडें वांकडें बोललों इतकाच काय तो फरक ! महाराजांच्या राज्यांत पर्जन्याची भरपूर वृष्टि होऊन शेतकऱ्यांचे डोळे ठणठणीत कोरडे रहातील. धान्याची समृद्धि होणार असल्यामुळें सर्वांना पोटभर अन्न मिळेल. मात्र दुष्काळ व त्यावर पोटें जाळणारे व्यापारी उपाशीं मरतील. प्रजाजनांत संतोषाचा फैलावा होईल, पण वैद्य मात्र कष्टी रहातील. कारण, यंदां रोगराई औषधालासुद्धां मिळायची नाहीं, मग रोगराईवर औषध घेतो कोण ? याप्रमाणें दिली मनमुराद साखर पसरून आणि आलों निघून !

**पद्मावती:**—आणि शत्रुपीडेबद्दल काय सांगितलेंत ?

**गणक:**—छान सांगितलें ! म्हटलें महाराज ! सरकारची तरवार आणि शत्रुपीडा हा शब्द हीं दोन्ही आतां कोशांतच राहूं द्या !

कारण यंदांचेंच काय, पण पुढचें दहा पंधरा वर्षांचें गणित करून पाहिलें, तरी या राज्याला शत्रुपीडेचा योग कुठे आढळला नाहीं. तेव्हां म्हटलें, कपिलाषष्ठी साठ वर्षांनीं येते, तसाच हा योगदेखील फार दूरवरचा असावा; म्हणून दिला गणिताचा नाद सोडून !

**पद्मावती**:–( हंसत ) किती खोटें बोललांत हो !

**गणक**:– खोटें बोललों ! त्याचा कसला आला आहे विधि आणि निषेध ! राजद्वारीं असें करावें तेव्हांच निभाव लागायचा ! तिथे खरें बोलायला जावें तर बत्तिशीच्या पथकांतले काय थोडे जवान हजेरीला उभे असतील तेसुद्धां तत्काळ लोटांगणें घालायचे ! आपल्याशीं मात्र राणीसाहेब, मला खोटें बोलतां येत नाहीं. कारण मी आपल्या खासदिमंतीचा ज्योतिषी. सूक्ष्म रीतीनें गणित वर्तवून जें कांहीं इष्टानिष्ट फळ येईल तें मला आपणाला सांगितलेंच पाहिजे. आणि तें यापूर्वींच सांगून टाकलें आहे. काळजी करण्याजोगी सर्वांत मुख्य गोष्ट हीच आहे कीं महाराजांच्या राशीला आठवा मंगळ आलेला आहे. हें आठवें स्थान म्हणजे–हो, उच्चारायलासुद्धां भय वाटतें, पण सांगतोंच आतां–या आठव्या स्थानाला मृत्युस्थान म्हणतात.

**पद्मावती**:–( अंगावर शहारे आणून ) अगबाई ! काय भयंकर संकट हें !

**गणक**:–आपल्या राज्यावर परचक्र चालून आलें आहे. महाराज आहेत अतिशय तापट आणि लढाईला उतावळे ! जर का ते शत्रूशीं लढाई द्यायला बाहेर पडले, तर कांहीं तरी भयंकर अनर्थापात झाल्यावांचून रहाणार नाहीं. याकरतां परचक्राची वार्ताच मुळीं त्यांच्या कानावर जाऊं नये याबद्दलची काय सावधगिरी ठेवायची ती ठेवली आहे ना ?

**पद्मावती**:–तशी सावधगिरी ठेवण्यांत मी कशी चुकेन ? एक महिनाभर महाराजांनीं अंतःपुराबाहेर मुळीं पडूंच नये आणि राज्यकारभाराची गोष्ट त्यांच्यापुढें केव्हांही निघूंच नये, येथपर्यंत मीं बंदोबस्त केला आहे.

**गणक**:–छे छे, आपली इतकी दक्षता असल्यावर मग बोलायचें कांहीं राहिलेंच नाहीं ! आज मी आलों आहें तो आणखी एका नाजूक संकटाची वर्दी द्यायला आलों आहें.

**पद्मावतीः**—संकट आणखी नाजूक ! तो काय प्रकार आहे तो सांगा तरी !

**गणकः**—महाराजांना लवकरच केव्हां तरी द्वितीयभार्येचा योग दिसून येतो आहे.

**पद्मावतीः**—एवढेंच ना ? कांहीं चिंता नाहीं. थोरल्या अरिष्टाचा जिनें इतका कडेकोट बंदोबस्त केला, तिला या धाकट्या अरिष्टाचा बंदोबस्त करणें काय मोठें अवघड आहे ? तुम्हीं सावध केलेंत, चांगलें झालें. कांहीं काळजी करूं नका बरें !

**गणकः**—तर मग येतों आतां.

**पद्मावतीः**—थांबा थोडे. विद्याधर ! ( विद्याधर येतो. ) गणकाचार्यांना पाडव्याचा पोषाख द्यायचा असतो तो आण आणि त्यांना दे. ( विद्याधर वस्त्रें आणतो व गणकास देऊं लागतो. )

**गणकः**—देवी, हें उपकारांचें ओझ्यावर ओझें आणखी कशाला ? पण आपली मर्जी मोडणें हेंही वाईटच ! (वस्त्रें घेऊन) साम्राज्याभिवृद्धिरस्तु! सौभाग्यसमृद्धिरस्तु ! पुत्ररत्नप्राप्तिरस्तु ! ( जाऊं लागतो. )

**पद्मावतीः**—थांबा. थोडें विचारतें त्याचें उत्तर द्या. ही तुमची मुलगी कलावती माझ्याजवळ उभी आहे आणि तो विद्याधर माझा पत्रलेखक आहे. माझ्या मतें या दोघांचें जोडपें चांगलें शोभतें. तथापि मुलगी तुमची. तेव्हां तुम्ही ठरवाल तेंच खरें. तुझाला कसें वाटतें ?

**गणकः**—छे छे, राणीसाहेब, माझ्या मुलीकरतां विद्याधर हा वर मला पसंत करवत नाहीं.

**पद्मावतीः**—( हसत ) कां बरें ? विद्याधराची विद्या चांगली आहे ह त्याच्या नांवावरून नाहीं का कळत ?

**विद्याधरः**—( स्वगत ) डोंगर जसा धरणीधर अथवा गंगाधर, तसे आम्ही विद्याधर !

**गणकः**—त्याची विद्या चांगली असेल. पण नुसती विद्या मला काय करायची ? वराच्या बाबतींत तीन प्रकार ठरवतां येतात. ज्याला विद्या नाहीं आणि द्रव्य नाहीं तो अधम, ज्याला विद्या आणि द्रव्य भरपूर अनुकूल आहेत तो उत्तम. आणि ज्याला नुसती विद्या आहे तो मध्यम.

**विद्याधरः**–अहो, मध्यम तोच उत्तम ! मध्यमपांडव तोच उत्तमपांडव ! एरवीं देवानें धर्माला सोडून त्या मध्यमपांडवाला गीता कशाला सांगितली असती ?

**गणकः**–अरे वाचाळपंचानना ! मलादेखील एखादी गीता सांगायची असती तर तुलाच उत्तम श्रोता झटलें असतें. पण इथे द्यायची आहे मुलगी ! पोटचा गोळा परक्याच्या पदरांत बांधायची गोष्ट फार न्यारी आहे बाबा ! असा उतावळा होऊं नकोस. तूं सर्व विद्यांचा सारसंग्रह केला असशील. पण दारसंग्रह करायची विद्या तुला अजून शिकायची आहे !

**पद्मावतीः**–( हंसत ) अहो, त्याला असे झिटकारूं नका. या गोष्टीचा स्वस्थपणानें विचार करा.

**गणकः**–आतां कुठचा विचार सुचतो आहे या दुर्दैवी गणकाला ! मी रात्रंदिवस निराळ्याच घोरांत पडल्यामुळें कलावतीच्या लग्नाचा विचार मला कांहीं एक सुचत नाहीं. माझ्यांही राशीला महाराजांप्रमाणें आठवा मंगळ आलेलाच आहे !

**पद्मावतीः**–होय. तें तुम्ही पूर्वीं बोललां होतां. आतां आणखी अस्वस्थता उत्पन्न करण्याजोगें नवीन काय झालें आहे ?

**गणकः**–काय सांगावें राणीसाहेब ! महाराजांप्रमाणें मलासुद्धां यंदां द्वितीयभार्येचा योग आहे असें गणितावरून नुकतेंच कळलें !

**पद्मावतीः**–( आश्चर्यानें ) काय ! या उतारवयांत तुम्ही नवी बायको करणार ?

**गणकः**–इथे कुणाला नव्या बायकोची हौस आहे ! पण आभाळांतल्या ग्रहांनीं एकदां आग्रह धरला म्हणजे आम्हां पृथ्वीवरच्या मानवांचें चालतें आहे कुठे ? अस्मानी सुलतानी ह्मणतात ती हीच ! ते वर, आम्ही खालीं ! ते झाले वरिष्ठ आणि आम्ही ठरलों कनिष्ठ ! वरिष्ठांच्या हुकमापुढें कनिष्ठांना मान वांकवलीच पाहिजे ! आतां ही नवी बायको वरिष्ठांच्या हुकमानें आम्हांकडे येणार. ती केव्हां येऊन मानगुटीस बसते याचा नाहीं नेम ! या अरिष्टांतून धडपणें एकदांचा सुटलों म्हणजे मग कलावतीच्या लग्नाचा विचार कर्तव्य आहे. तेथपर्यंत मला कांहीं सुचत नाहीं. ( जातो. )

**विद्याधरः**—देवी, या जोशीबुवांचा मतलबसिंधु फार खोल आहे. मुलगीची विक्री करून बायकोची खरेदी फुकटांत पाडायची हा यांचा कावा मला स्पष्ट दिसतो आहे.

**पद्मावतीः**—अरे, पण द्वितीयभार्येचा योग मला गणितावरून कळला असें ते म्हणताहेत ना ?

**विद्याधरः**—त्यांत काय आहे ? गणितांतून अमुक गोष्ट काढायचीच म्हटल्यावर वाटेल ती काढतां येईल. पण ती खरी नव्हे. दुसरें लग्न करावें या दुर्वासनेचें बिंब यांच्या मनांत कधींच उद्भवलें आहे आणि आतां त्या बिंबाचें प्रतिबिंब हे गणितांत पाडून स्वतःची वंचना करून घेत आहेत! कारण प्रतिबिंब हें केव्हांही खोटेंच असणार ! असो. कलावतीच्या बाबतींत यांनीं आज आपला देखील शब्द मानला नाहीं ! हरकत नाहीं. याउपर माझा विचार मीच पाहून घेतों. उगीच माझ्या हातून कुठे थोडें वेडें वांकडें झाल्याचा बोभाटा कानावर आला तर तिकडेमात्र कानाडोळा असावा म्हणजे झालें ! ( कलावती व विद्याधर जातात. )

**पद्मावतीः**—मंगळाच्या आठव्या स्थानाला मृत्युस्थान म्हणतात हे गणकाचे शब्द आठवले म्हणजे भयानें अंग थरारून जातें ! तथापि काय चिंता आहे ? महाराजांना अंतःपुराबाहेर न सोडण्याविषयीं जो मीं सावधपणा ठेवला आहे त्यांत कसूर होऊं दिली नाहीं म्हणजे आठवा मंगळ झाला तरी माझें काय करणार आहे !

**पद ७**

( राग बिहाग. ताल एका. )

**घाबरा नको होऊं माझ्या जिवा ।**
**भौम-रोष कैसा पतिला भया दावी ॥ ध्रु० ॥**
**गळां हार तसा नाथ राहो**
**वियोग नसो तुवां हा महोपाय करावा ॥**

( जाते. )

---

## प्रवेश दुसरा.

स्थळः–रतनपूर. राजवाड्यापुढचा रस्ता.

( ठाकूर रामसिंग येतो. )

**रामसिंगः**–आतां काय करावें या पंचाइतीला ? एक महिना होऊन गेला, राणीनें आमच्या महाराजांना अंतःपुरांतल्या विलासांत इतकें दंग करून सोडलें आहे कीं, आपण राजे आहों, प्रजासंरक्षणाचें कर्तव्य आपल्याला बजावलें पाहिजे, या गोष्टीचें त्यांना भानच राहिलें नाहीं असें वाटतें. बरें, त्यांना सावध करायला जावें तर राणीनें चौकीपहाऱ्याचा असा कडेकोट बंदोबस्त केला आहे कीं, कुणाची गांठ नाहीं, भेट नाहीं, दाद नाहीं, फिर्याद नाहीं! राज्यकारभाराचें गाडें सारें सुरळीत चाललें असतें तर राजाराणीच्या या लालझगड्यांना कोण विचारीत होतें म्हणा ! पण इकडे राज्यावर आली आहे परचक्राची धाड आणि तिकडे महाराज अंतःपुरांत दडी देऊन बसले ते तोंड बाहेर काढीनात ! याला काय उपाय करावा ? विषयलंपट होऊन स्त्रीचा दास झालेल्या या राजाला धिक्कार असो !

### पद ८.

( राग–मुलतानी. ताल–त्रिवट. )

**मृग–नयना निर्दयतमा होय परिहासीं पंडिता धिगधिग**
**तथा नाचवी भ्रुकुटि–तांडवें बुध न तो लाजला ॥ ध्रु० ॥**
**भाषा–कोविद कारि गुरु तिजला । कर–पल्लव–भाषा शिकला ॥**

आज कसेंही करून राजेसाहेबांची गांठ घेतलीच पाहिजे आणि परचक्राचा मजकूर त्यांच्या कानावर घातलाच पाहिजे. पण त्यांची गांठ पडावी कशी ? ( पाहून ) हो, हा राणीसाहेबांचा कारकून विद्याधर इकडेच येतो आहे. याचीच पूजा बांधावी आणि याच्या वशिल्यानें आपलें कार्य करून घ्यावें. कोणा नागरिकाबरोबर हा विद्याधर कांहीं बोलत येतो आहे. काय बोलतो आहे हें बाजूस उभे राहून ऐकूं या. ( बाजूस उभा राहतो. विद्याधर व नागरिक येतात. )

**नागरिकः**—अहो विद्याधर, कृपा करा आणि कसेंही करून महाराजांची आणि माझी एक घटकाभर गांठ घालून द्या. मागाल तेवढें द्रव्य देतों. द्रव्यांची रास ओततों तुमच्यापुढें !

**विद्याधरः**—अहो द्रव्याला काय करतां घेऊन ! महाराज ज्या ठिकाणीं आहेत तेथपर्यंत जरी तुम्हीं मोहरांचा पूल बांधून त्यावर हिऱ्यांची फरसबंदी केलीत, तरी सुद्धां तुमचा प्रवेश तिथे होणार नाहीं.

**नागरिक**—द्रव्यानें काम होत नसेल तर दुसरी कांहीं अजब युक्ति सांगा !

**विद्याधरः**—अजब युक्ति ? त्यालाहो काय तोटा ? तुम्ही असे विचारणारे व्हा ! हव्या तितक्या एकाहून एक अजब युक्त्या ! महाराजानीं आपण होऊन तुमची दाद घ्यावी अशाच माझ्या अजब युक्त्या आहेत. मात्र तसल्या युक्त्या करून पाहणाऱ्यांच्या अंगीं करामतसुद्धां तशी अजब पाहिजे !

**नागरिकः**—हो. त्याला आहे आपली कबुली ! जर महाराजांची भेट होत असेल तर सांगाल तसली अवघड करामत करून दाखवतों कीं नाहीं पहा !

**विद्याधरः**—हां हां. मग ठीक आहे. आजकाल गाणें बजावणें ज्याला येत नसेल त्याला अंतःपुराच्या दरवाजाकडे पहाण्याचीसुद्धां मनाई आहे. तुम्हांला कांहीं गायला येतें आहे का ?

**नागरिकः**—तें नाहीं बुवा आपल्याला कांहीं येत. पण त्याखेरीज काम होत नसेल तर काय करायचें ! गाईन कांहींतरी !

**विद्याधरः**—हें पहा. समोर शिकारखाना आहे त्यांत सारंगांचे म्हणजे हरणांचे कळप चरताहेत ते तुम्हाला दिसताहेत का ? इथून पहा त्या उघड्या फाटकांतून. दिसतात ?

**नागरिकः**—होय. दिसताहेत. बरें मग ? सारंगांच्या कळपांचा आणि हुजूरच्या भेटीचा काय हो संबंध ?

**विद्याधरः**—तुम्हाला मी अंतःपुरांत नेऊन सोडतों. तिथे गेल्याबरोबर सारंग राग गायची सुरुवात करा. असें दिव्य गायन कराल, असें दिव्य

गायन कराल, कीं जें कानावर पडतांच या गानलुब्ध सारंगानीं धांवत येऊन अंतःपुरांत घुसावें ! मग काय विचारतां हो ! गाण्यांतला राग सारंग, साथ करणारी सारंगी, ती वाजविणारा सारंग्या. आणि श्रोतेसुद्धां सारंगच ! असें हें सारंगांचें चतुरंग सैन्य पहातांच तिथल्या सारंगनयनांची मोठी तारांवळ होईल. आणि हा अद्भुत चमत्कार पाहिल्याबरोबर महाराज आपण होऊन तुम्हांला विचारतील कीं अहो तुम्ही कोण ? असें स्वर्गीय गान ऐकवणारे चित्रसेन गंधर्व कीं मिथ्या तानसेन कीं आहां तरी कोण ?

**नागरिकः**—आम्ही आहों कोणी तरी ! आम्हांला या गप्पा कशाला सांगतां हो ? गाणें ऐकवून हरणें मोहित करण्याची कला कलियुगांत नष्ट झाली आहे. हें कलिवर्ज्यांतलें प्रकरण आमच्या काय उपयोगाचें ? अशी माझी चेष्टा नका करूं बुवा !

**विद्याधरः**—ही चेष्टा वाटते तुम्हाला ? बरें. राहूं द्या. दुसरी युक्ति घ्या. तुम्हांला बीन वाजवितां येतो का बीन ?

**नागरिकः**—थोडा ! अगदीं थोडा ! कधीं मधीं बसतों वाजवायला.

**विद्याधरः**—मग झालें काम! मी तुम्हाला महाराजांपुढें नेऊन बसवतों. तिथे बिनाचे असे मृदु मृदु करुण कोमल सूर छेडाल कीं जे ऐकतांच जमिनीच्या काळजाचें पाणी पाणी होऊन अंतःपुराचें एकदम सरोवर बनावें ! तसें झालें म्हणजे माणसें लागतील बुडायला ! बुडूं देत ! बुडूं देत ! बिनाच्या दोन भोपळ्यांतला एक बांधा महाराजांच्या कमरेला आणि एक घ्या तुम्हीं. आणि या दोघे निसटून बाहेर ! मग ते आपण होऊन तुम्हाला विचारतील कीं आम्हाला जीवदान देणारे असे तुम्ही परोपकारी महात्मे आहां तरी कोण ?

**नागरिकः**—काय म्हणावें तुमच्या निष्ठुरपणाला ! नका हो अशी थट्टा करूं ! मी फार संकटांत सांपडलों आहें हो !

**विद्याधरः**—ही युक्ति सुद्धां नाहीं मानवत ? बरें. गाणें बजावण्यांतली युक्ति नको असली तर राहूं द्या. आतां काय बरें दुसरी अजब युक्ति काढावी ? हो. तुम्हाला जारणमारणादि मंत्रांची सिद्धि असेल, तर उच्चाटन म्हणून जें विधान सांगितलें आहे त्याचा प्रयोग करून महारा-

जांना आसनासकट जे आभाळांत उडवून द्याल ते नेमके तुम्हांपुढें या या ठिकाणीं आणून सोडा. मग ते आपण होऊन तुम्हाला विचारतील कीं मच्छिंदरनाथ गोरखनाथांप्रमाणें अद्भुत सामर्थ्याचे योगी तुम्हीं आहां तरी कोण ?

**नागरिकः**—अडचणीनें नाडलों आणि भावार्थीनें तुम्हांला विचारायला आलों तों तुम्हाला माझी टर उडवायचीच लहर लागली ! दुर्दैव माझें ! जातों आतां.

**विद्याधरः**—तुमची टर उडवूं नको तर काय करूं ? तुम्ही आहां कुठे ? इथे काय चाललें आहे याची वार्ता तरी तुम्हांला आहे काय ? अहो, मोठमोठे मंत्री, अधिकारी, पालखीपदस्थ बडे बडे लोक राजद्वारीं प्रहरान्प्रहर लोंबकळत असतात त्यांची दाद लागत नाहीं, ती तुमची हो कुठून लागेल ?

## पद ९

( चाल—गजल. )

**चाले वसंत राजा । आस्ते ! कदम मुलाजा !।**
**संगें जनानि फौजा । रंगेल ढंग मौजा ॥ ध्रु० ॥**
**सरकार राव रंभा । शृंगार करी तावा ।**
**कार्या इथे न थारा । वर्दी न अर्जदारा ॥**

**नागरिकः**—तर मग ही बेबंदशाही संपणार तरी केव्हां ?

**विद्याधरः**—धीर धरा. हल्लीं वसंतोत्सव चालला आहे हा बंद होईल तेव्हां राजवाड्याचे दरवाजे आणि सरकारी कामाचीं दप्तरें खुलीं होतील. सतार सारमंडळाचे बोल थांबतील तेव्हां तुम्हांसारख्या अर्जदार मंडळाचे बोल उमटूं लागतील. नर्तकींच्या पायांतले चाळ मुके होतील तेव्हां न्यायसभेला वाचा फुटेल. तेथपर्यंत स्वस्थ बसून रहा. जा ! ( जातात. )

**रामसिंगः**—समजलें कपाळ ! या विद्याधराजवळ बोलायला गेलों तर माझीसुद्धां हा अशीच संभावना करणार. मग उगीच शब्द खर्चून अपमान करून घ्यावा यांत काय मौज आहे ? हुजूरच्याजवळ रहाणाऱ्या या लोकांच्या डोक्यांवर काय मद चढला आहे पहा ! पण यांत आश्चर्य तें कसलें ? सरकारच्या हत्तींना मस्ती येते तिला कांहीं तरी मुदतीचा

निर्बंध आहे. पण राजाजवळ राहणाऱ्या सेवकांना मस्ती बारमहांची! असो. परचक्राची वर्दी महाराजांपर्यंत नेण्याचा इलाज तर हा असा फसला. आतां पुढें करावें काय? ( विचार करून ) हो, ही युक्ति ठीक आहे. शत्रूनें आम्हांला मारलें, लुटलें, असा आक्रोश करीत हजारों रयत राजधानीला आले आहेत. त्यांना जिथे महाराज असतील तिथे जबरदस्तीनें जाऊन आपली दाद लावून घ्या म्हणून देतों वीर भरून! आम्हीं तरी काय करावें? होऊं द्या काय होईल तें! (जातो.)

---

## प्रवेश तिसरा.

( वेत्रवती येते. )

**वेत्रवतीः—**

### पद १०

चाल गजल.

**बंधांत सदा प्यारा । मानी सखी असावा । शृंगार खुले**
**ल्याला । वाटे जिवा विसावा ॥ ध्रु० ॥**
**कमलिनीस अलि जो मोहे । ठेविला स्वकोशीं ।**
**तो कोणत्या प्रदेशीं । गेला पुसा तियेला! ॥**

( जाते. )

---

## प्रवेश चवथा.

**स्थळः**—रत्नपूर. पद्मावतीचा बाग.

(लक्ष्मणसिंग झोंपाळ्यावर बसला आहे. पद्मावती त्यास पंख्यानें वारा घालीत आहे. )

**लक्ष्मणसिंगः**—पद्मावती, हा वसंतोत्सव आतां मोठ्या बहारींत आला आहे. नाहीं बरें? किती दिवस झाले सुरू होऊन? हो, आजच महिना झाला.

**पद्मावती**:–( सचिंत मुद्रेनें ) कां बरें? याचा कंटाळा येऊं लागला कीं काय?

**लक्ष्मणसिंग**:–कंटाळा? कंटाळ्याची गोष्टसुद्धां बोलूं नको! कंटाळा यावा कसा? महाकवीच्या प्रतिभेप्रमाणें तुझा सहवास प्रत्येक प्रसंगाला दरखेपेस नवें नवें रमणीयत्व आणीत आहे; आणि त्यामुळें अजून मला हा उत्सवाचा पहिलाच दिवस वाटतो आहे! बरें, पंख्यानें वारा घालीत उभी राहून शरीराला किती कष्ट देणार?

**पद्मावती**:–( हंसत ) मला नाहीं कष्ट वाटत!

**लक्ष्मणसिंग**:–कष्ट नाहीं वाटत? तर मग हें काय चाललें आहे? तुझा वस्त्रपल्लव कसा उडतो आहे पहा! जणु तुझी दया येऊन तोही तुला वारा घालण्यासाठीं पंख्याचें अनुकरण करीत आहे! तुझें वक्षःस्थलही थरथर हालतें आहे. अंगांत श्रमाचा उष्मा उद्भवल्यामुळें जणु काय इतक्यांतच वसंत जाऊन ग्रीष्म आला कीं काय या भयानें त्याला थरकांप सुटला आहे! तुझ्या देहप्रदेशीं अस्वस्थता उत्पन्न झाल्याबरोबर तुझा केशपाश गुलामगिरींत सांपडलेल्या काळ्या लोकांच्या राष्ट्राप्रमाणें बंधनोन्मुक्त होण्यासाठीं जोराची चळवळ करूं लागला आहे! इतकें असून वारा घालतांना मला कष्ट होत नाहींत हें म्हणतेच आहेस!

**पद्मावती**:–बरें. आपल्या सेवेंत एवढेसे कष्ट होत असले म्हणून काय झालें? त्यांत अपूर्व तें काय आहे?

**लक्ष्मणसिंग**:–अपूर्व आहे तर! वारा लागला म्हणजे वेली हालते हें ठीकच आहे. पण इथें वारा लागतो आहे मला, आणि हालते आहेस तूं! असली ही अपूर्व वेली आपण कुठे पाहिली नाहीं बुवा! पुरे झाले तुझे हे कष्ट! ये. बैस. ( तिला बळेंच ओढून जवळ बसवतो. ) सांग. उत्सवापैकीं आजचा कार्यक्रम कोणता योजला आहेस? उद्यांचा कोणता? अजून काय काय व्हायचें राहिलें आहे?

**पद्मावती**:–अजून किती तरी गोष्टी व्हायच्या आहेत! गायन, चित्र-दर्शन, पुष्पहारांचें प्रदर्शन, वक्रोक्तीचे संवाद, काव्यरचना, नाट्यप्रसंग, असे किती तरी प्रकार माझ्या यादींत अजून व्याहायचेच आहेत! लिहिले

आहेत त्यांपैकीं आजचें काम म्हटलें तर ( यादी पाहून ) नृत्यशाळेची परीक्षा. ती चार दिवस चालेल.

**लक्ष्मणसिंगः**—परीक्षक कोण ?

**पद्मावतीः**—दुसरें कोण ? स्वतःच परीक्षक व्हायला पाहिजे.

**लक्ष्मणसिंगः**—परीक्षेच्या वेळीं मी जवळ बसेन. पण परीक्षक व्हायची तूंच.

**पद्मावतीः**—बरं. आपली आज्ञाच तशी असेल तर मीच परीक्षा घेईन.

**लक्ष्मणसिंगः**—( हंसत ) परीक्षेचें काम आटोपलें म्हणजे मी परीक्षकाची परीक्षा निराळीच घेणार आहें.

**पद्मावतीः**—हें काय भलतेंच ! परीक्षकाची का परीक्षा कुणी घेतली आहे ?

**लक्ष्मणसिंगः**—यांत भलतेंच तें काय झालें ? पद्मावती, तूं केवळ नृत्यकलेचा अवतार आहेस असा तुझा लौकिक आहे, व तो यथार्थ आहे. तें तुझें नृत्यकौशल्य पाहून नेत्रसुखाची तृप्ति करावी अशी जर माझ्या मनाला इच्छा झाली तर तो दोष माझा नसून तुझ्या गुणगौरवाचा आहे !

**पद्मावतीः**—उत्तम आहे. तशीच आपली इच्छा असल्यावर ती तृप्त व्हायला माझ्याकडून कितीसा उशीर ? आज्ञा होईल तेव्हां नृत्य करून दाखवायला मी तयार आहें. मला परक्यासमोर थोडेंच नाचायचें आहे !

**लक्ष्मणसिंगः**—असो. चार दिवस नृत्यपरीक्षेंत गेले. पुढें काय ?

**पद्मावतीः**—पुढें चार दिवस आपला शुक पद्मनाभ नांवाचा आहे तो आणि माझी मंजुभाषिणी नांवाची सारिका यांचा लग्नसोहळा चालेल. खरें म्हटलें तर हें लग्न महिना पंधरा दिवस चालायला पाहिजे. पण आतां वेळ राहिला नाहीं म्हणून मीं आपलें चार दिवसांवरच आटोपतें घेतलें आहे.

**लक्ष्मणसिंगः**— ( हंसत ) आम्हाशीं सोयरीक जोडावी म्हणतां, पण वरपक्षाचें पारडें किती जड आहे याचा विचार नाहीं केलात ! आम्हांला हुंडा काय देणार ? बोला.

पद्मावती:—सोयरिकीच्यां कामांत एकदां अटीला, पैडल्यावर खर्चा-विचाला मी नाहीं हो मागें हटायची ! मागावा काय तो हुंडा !

लक्ष्मणसिंग:—नाहीं नाहीं. तुम्हीच बोला.

पद्मावती:— हिरा मोतीं पांच आणि माणिक असे माझे चार प्रकारचे अलंकार मी आपणाला मंजुभाषिणीच्या लग्नांत हुंडा म्हणून द्यायचें ठरवलें आहे.

लक्ष्मणसिंग:—ठीक आहे. नाहीं तरी अलंकारानीं तुझ्यां सौंदर्याला शोभा येत नसून तुझ्या सौंदर्यामुळें अलंकारानांच उलट शोभा येते. तेव्हां अलंकार गमावलेस तरी त्यांत तुझें नुकसान कोणतेंच होत नाहीं. हा लग्नाचा सोहळा उरकल्यावर पुढचें कलम कोणतें ?

पद्मावती:—पुढचें कलम द्यूत खेळण्याचें. तेंही चार दिवस चाललें पाहिजे.

लक्ष्मणसिंग:—हा द्यूतविनोद गाळून टाकला तर नाहीं का चालायचें ?

पद्मावती:—नाहीं नाहीं. तें द्यूत आपण माझ्याशीं खेळायचें आहे. तें मी चुकवूं देणार नाहीं ! माझे चार प्रकारचे दागिने मी चार दिवस आपणाकडून पणाला लाववणार आणि जिंकून घेणार !

लक्ष्मणसिंग:—( हंसत ) अरे वा ! आम्हीं दागिने हरायचे आणि तुम्हीं जिंकायचे हें सुद्धां यादींत लिहिलेलेंच आहे म्हणा ! बरें. द्यूतानंतर पुढें काय ?

पद्मावती:—पुढें आणखी पुष्कळ गोष्टी आहेत आणि प्रत्येकीला चार चार पांच पांच दिवस लागतील. जलक्रीडा, नौकागीत, दोलारोहण, वन-भोजनें, क्रीडापर्वतावरचे विहार, चित्रकथा—

लक्ष्मणसिंग:—थांब थांब. तुझी यादी इकडे दे पाहूं. ( घेऊन वाचूं लागतो. )

पद्मावती:—( स्वगत ) मंगळ नवमस्थानीं जायला अजून पंधरा दिवस आहेत तेवढे कसे तरी काढले पाहिजेत. तेथपर्यंत स्वारीला अंतःपुरांतून बाहेर सोडायची सोय नाहीं. मग मलाही दहावा मंगळ येतो आहे. जसें बनेल तसं पुढें पहातां येइल.

लक्ष्मणसिंगः—पद्मावती, तूं लिहिलीं आहेस एवढींसुद्धां कलमें उरका- यला दीड किंवा दोन महिने पाहिजेत. उत्सवाचे दिवस तर राहिले पंधरा. याचा विचार काय ?

पद्मावती—विचार कसला ! उत्सव पुढें आणखी महिनाभर लांबवा- यचा आणि सर्व कामें घाईघाईनें उरकून घ्यायचीं. दुसरें काय !

लक्ष्मणसिंग—पण तेथपर्यंत मला कसें तुझ्याजवळ रहातां येईल ? माझा राज्यकारभार मला पाहिलाच पाहिजे.

पद्मावती—आतां कां बरें राज्यकारभाराच्या गोष्टी ? वसंतोत्सवाकरितां मीं आपणाला राज्यापासून मागून घेतलें आहे. उत्सव संपेपर्यंत आपण मला सोडून जायचें नाहीं हें पूर्वींच ठरलेलें आहे. मग आतां कां बरें तकरार ? असें मध्येंच मला सोडून इथून निघून जायचें जर आपल्या मनांत येऊं लागलें तर मीं गरिबानें काय बरें करायचें ? छे छे ! अशी अनुचित गोष्ट आपल्या मनांत कधीं येणारच नाहीं व आणूंही नये.

पद ११.

कवाली.

**नाथा प्रसन्न व्हा । द्या सान मान बोला ॥ ध्रु० ॥**
**निशिदिन चरणां । तनमन दिधलें । मोहून फसवितां कांता ॥**

लक्ष्मणसिंगः—तूं म्हणतेस तें खरें. पण सरकारी कामाला अडथळा येऊं लागला तर तुझा आमचा करार तत्काळ रद्द समजावा असेंही ठर- लेलें आहे तें आठवतें आहे ना ?

पद्मावतीः—मग ? मी कुठे तें नाकबूल करतें आहें ? आपला कारभार मंत्र्यांच्या मार्फतीनें हा वेळपर्यंत तरी सुयंत्रपणानें चालला आहे कीं नाहीं ?

लक्ष्मणसिंगः—होय. तें मला कबूल केलेंच पाहिजे. जर माझ्या- वांचून नडलें असतें तर तीं तीं कामें घेऊन मंत्री माझ्याकडे आलेच असते.

पद्मावतीः—( स्वगत ) येतील पुष्कळ ! पण येऊं देतो कोण ? ( उघड ) झालें तर. आजपर्यंत चाललें असेंच पुढें चालेल तितके दिवस चालेल.

आपण स्वतःच केलें पाहिजे असें महत्त्वाचें कार्य ज्या दिवशीं उपस्थित होईल त्या दिवशीं आपण मला सोडून खुशाल जावें. मी रदबदल करायची नाहीं. (पडद्यांत 'फिर्याद फिर्याद' असा गलबला होतो.) (भयानें स्वगत) हा काय प्रकार आहे ?

**लक्ष्मणसिंगः**–फिर्याद? माझ्यापर्यंत घेऊन येण्याजोगी कुणाची काय फिर्याद असेल बरें ? अरे, कोण आहे बाहेर ? हा कशाबद्दल गलबला आहे ?

**पाहरेकरीः**–( प्रवेश करून ) महाराज, दूरच्या प्रांतांतले कोणी रहिवासी फिर्याद घेऊन आले आहेत आणि आमची दाद महाराजानीं आतांच घेतली पाहिजे असें ओरडत आहेत.

**पद्मावतीः**–( भयचकित मुद्रेनें स्वगत ) ही फिर्याद शत्रूच्या स्वारीची ! दुसरी कोणती असणार ? देवा ! हें काय अरिष्ट आणलेंस ? जें आजपर्यंत चुकवीत होतें तेंच शेवटीं कपाळाला आलें ! आतां कसें करूं ? ( उघड ) अरे, हें काय इथे सांगत आला आहेस ? त्या लोकांना धक्के मारून हांकून लाव ! आधीं हाकून लाव ! रयतेनें अशी अमर्यादा करणें म्हणजे काय गोष्ट आहे ! तुम्ही पहारेवाले निजून राहिलां होतां कीं काय ? या लोकांना तुम्ही येथपर्यंत आधीं येऊंच कां दिलेंत ? तुम्हांला याबद्दल शिक्षा केली पाहिजे.

**पहारेकरीः**–देवी, हे लोक आम्हांला न जुमानतां मारामारी करून बागेंत घुसले आहेत. बाहेरच्या दोन पहाऱ्यांवर यानीं असेंच केलें.

**पद्मावतीः**–इतकें असेल तर मी स्वतः येतें आणि पहातें हे लोक कसे बागेबाहेर जात नाहींत ते ! हत्तीच्या पायीं देण्याच्या लायखीचे गुन्हेगार लोक ! महाराज, हुजूरच्या समोर अशी दंगामस्ती करणाऱ्या या लोकांची फिर्याद आपण मुळींच ऐकून घेऊं नये !

**लक्ष्मणसिंगः**–छे छे, पद्मावती, हें तुझें बोलणें बरोबर नाहीं. त्यानीं दंगामस्ती केली असेल तर त्याचा विचार निराळा होईल. पण त्यांचें काय म्हणणें असेल तें मला ऐकलेंच पाहिजे. इतक्या लांबून हे लोक आले आहेत आणि दाद लावून घेण्यासाठीं असे बेताल होतात त्याअर्थी याचें कारणसुद्धां कांहीं बलवत्तर असलें पाहिजे. तें कसेंही असो. रयतेचें

गाऱ्हाणें ऐकून घेऊन त्यांच्या दुःखाचें निवारण करणें हें राजाचें पहिलें कर्तव्य आहे. पहारेवाले, अर्जदार लोकांपैकीं कोण पुढारी असतील त्यांना माझ्याकडे पाठवून द्या. ( पाहरेकरी जातो. )

**पद्मावती**:–मी म्हणतें, या लोकांच्या अर्जाचा निकाल परभारें मंत्र्यानीं केला तर नाहीं का चालणार ? मी माणसें बरोबर देऊन त्यांना मंत्र्यांकडे पाठवून देतें.

**लक्ष्मणसिंग**:–गप रहा. पद्मावती ! या कामांत मी तुझें कांहीं एक ऐकणार नाहीं. ( अर्जदार येतात व राजास मुजरे करून उभे रहातात. ) बोला तुमची फिर्याद. कुठले तुम्ही ?

**प० रयत**:–सरकार, सरहद्दीवरच्या शंभर गांवचे रयत आम्ही इथे आलों आहों. शत्रूनें आमचे गांव लुटले, जाळले, आम्हांला मारलें आणि अन्नाला मोताद केलें म्हणून सांगण्याकरितां सरकारच्या पायांपाशीं आलों आहों.

**लक्ष्मणसिंग**:–( क्रोधानें ) महाराजा लक्ष्मणसिंगाच्या रयतेकडे वक्र दृष्टीनें पहाण्याची आजपर्यंत कोणाही शत्रूची प्राज्ञा झाली नाहीं. असें असतां आज कोणता दुर्दैवी हरामखोर माझ्या प्रजेला उपद्रव देऊन मृत्यूला आव्हान करतो आहे ?

**दु० रयत**:–कुमार हिरासिंग.

**लक्ष्मणसिंग**:–हिरासिंग ? माणिकदुर्गाच्या भीमसिंगाचा मुलगा ?

**ति० रयत**:–होय होय. महाराज, त्या दुष्टाच्या फौजेनें आमच्या बायकापोरांची कत्तल करून आमच्या घरादारांची होळी केली याबद्दल आम्हीं धाय मोकलून रडत फिरावें, आणि ज्यांनीं आजपर्यंत पोटच्या पोरांप्रमाणें आमचें संरक्षण करून दिगंत कीर्ति संपादन केली ते आपण सांप्रत आमच्या या संकटकाळांत अंतःपुरांतल्या ऐषआरामांत दंग होऊन रहावें, ही काय विचित्र घटना आहे !

**लक्ष्मणसिंग**:–( स्वगत ) हा कडू बोलतो पण खरें बोलतो आहे बिचारा ! ( उघड ) अरे, जर एवढा तुमच्यावर कहर गुदरला होता तर तुम्हीं यापूर्वींच आम्हांला कां वर्दी दिली नाहीं ?

**च०रयत**:—काय सांगावें महाराज ! राजधानीला येऊन पंधरा दिवस झाले. परंतु राजद्वारीं आजपर्यंत आमची दाद कांहीं केल्या लागेना ! जिकडे जिकडे जावें तिकडे तिकडे शिवीगाळ आणि धक्काबुक्की !

**लक्ष्मणसिंग**:—( स्वगत ) नुसती माझ्या राज्यांत नव्हे, तर खुद्द माझ्या दारांत असली भयंकर अंदाधुंदी ! ही अशी रक्षकांना तक्षक होण्याची दीक्षा कोणीकडून बरें मिळाली असावी ? यांत राणीचा हात असावा असा भास होतो. ( उघड ) होय. इकडे तुमची दाद नसेल लागली. पण मंत्री, दिवाण, सरसुभे वगैरे अधिकारी होतेच कीं नाहीं ? त्यांना हा मजकूर कळवायचा होता.

**प० रयत**:—कळवला. कळवला. त्यांचेही उंबरठे झिजवून झिजवून दमलों ! त्यांनीं सांगितलें कीं, महाराजांची गांठ पडल्याखेरीज आम्हांला स्वबुद्धीनें कांहीं करतां येत नाहीं आणि हुजूरची गांठ पडावी म्हणून आम्हीं करायचे तेवढे प्रयत्न करून थकलों. आमचा इलाज चालत नाहीं. मग उगीच आमच्या दारांत ओरडा करीत बसतां, यांत तुम्हांला काय फायदा ?

**लक्ष्मणसिंग**:—( स्वगत ) झाली खात्री. हें पद्मावतीचेंच काम !

**ति०रयत**:—सरकार, घरादारांला आणि बायकामुलांना पारखे होऊन मुलूखभर रडत फिरायचा आम्हांला कंटाळा आला आहे आणि हा जीव नकोसा झाला आहे. आमचें संकट असें आहे कीं, ज्याचा परिहार फार ‌वरेनें किंबहुना आजच्या आज झाला पाहिजे. तसें होईल तरच आमचा तरणोपाय आहे आणि तसें होत नसेल तर याउपर आम्हांला प्राण ठेवायचे नाहींत. ही पहा पदरांत पांच पांच तोळे अफू बांधून आणली आहे. ही खाऊन आपल्या देखतच मरून जातों !

**लक्ष्मणसिंग**:—हां हां ! असा वेड्यासारखा भलताच त्रागा करूं नका. धीर धरा. विचारानें वागा. मनांत खात्री असूं द्या कीं, तुम्हांला उपद्रव दिल्याबद्दल शत्रूचें चांगलें शासन करीन इतकेंच नाहीं, तर त्याच्याकडून तुमचें नुकसान भरपूर भरून देववीन. स्वस्थ असा. जा.

**च० रयत**:—जातों महाराज ! दुःख एवढेंच वाटतें कीं, आमची प्राणांतिक अवस्था आणि संकटाचें निवारण होणार तें विलंबानें होणार !

**लक्ष्मणसिंगः**–विलंबाच्या गोष्टी कोण बोलतो आहे ? विलंब काय म्हणून ? आम्ही आजच्या आज स्वारीला निघणार. आज इथे अन्न घेणार नाहीं. समजलांत ? तुम्ही घरीं पोंचण्यापूर्वींच शत्रूचा विध्वंस झाल्याची बातमी ऐकाल. जा.

**पद्मावतीः**–( स्वगत ) हाय हाय ! घांत झाला !

**सर्व रयतः**–महाराजांचा जयजयकार असो!(मुजरे करून रयत जातात.)

**लक्ष्मणसिंगः**–पद्मावती, या दुबळ्या गरीब रयतेची गोष्ट राहो; परंतु मंत्री, अधिकारी वगैरे प्रधानपुरुषांचीसुद्धां माझ्याशीं गांठ पडूं नये अशी ही राज्यांत धुंदी माजवणारी दुष्टपणाची तरतूद कुणीं केली ? (पद्मावती थर थर कांपूं लागते. ) हां. समजलों. हा सारा खेळ तूंच केलास एकूण ! शत्रूच्या स्वारीची बातमी तूं माझ्यापासून छपवून ठेवलीस इतकेंच नव्हे, तर ती बातमी दुसऱ्या कोणाकडून मला कळूंच नये अशीसुद्धां कारवाई केलीस, आणि लक्षावधि रयतेचा तळतळाट विनाकारण माझ्या माथीं मारलास ! पापिणी ! चेटकिणी ! चंडाळणी ! काय हा माझा सत्यानास पाडलास ! माझी दैना दैना करतांना थोडीसुद्धां करुणा तुझ्या मनाला शिवली नाहीं ! नेत्रांच्या कटाक्षांनीं मला घायाळ करतां करतां अंजनानें तोंडाला काळें फांसलेंस ! गळ्याला प्रेमानें हाताचा विळखा घालतांना हळूच श्वासानें माझ्या मनांतली विवेकाची जागती ज्योत मालवलीस ! कोमल हास्याचें चांदणें पसरून माझ्या नजरेची चकभूल केलीस त्यामुळें रक्तबंबाळ झालेली माझी राज्यलक्ष्मी करुणा भाकण्यासाठीं माझ्या डोळ्यापुढें उभी ठाकली असतां ती मला दिसली नाहीं ! पण यांत तुझा तरी काय दोष ? हा आत्मघाताचा अपराध माझा मींच केला नव्हे काय ? धर्माधर्माच्या आणि पापपुण्याच्या चिंतनांत अहर्निश गढून जाणारा मी आपण होऊन तुझ्या स्वाधीन झालों आणि पंचशराच्या पिंजऱ्यांत कोंडला जाऊन कामिनीचें खेळणें होऊन बसलों ! धनुष्याचा टणत्कार करण्याच्या प्रसंगीं नूपुरांच्या झणत्काराला माना डोलवणारा बाइलेचा बैल बनून राहिलों ! धिःकार धिःकार असो मला ! ( पद्मावती रडूं लागते. ) पद्मावती ! इतका अनर्थ करून सवरून आतां कां रडते आहेस ? विषयाच्या कर्दमांत सूकरीप्रमाणें लोळावें आणि मलाही

सूकराप्रमाणें लोळवावें ही तुझी दुर्वासना पूर्ण झाली नाहीं म्हणून रडते आहेस कीं काय ?

**पद्मावती**:–( स्फुंदत ) नाहीं नाहीं ! महाराज ! महाराज ! असे निर्दय होऊं नका ! असा अन्याय करूं नका ! केवळ तुच्छ विषयवासनेच्या तृप्तीसाठीं अंतःपुरांत आपणाला गुंतवून ठेवणारी अघोर बुद्धीची मी दुष्ट राक्षसी आहें असें आपण कां समजतां ? बाहेरची वार्ता मुळीं आपल्या कानीं पडूं नये असा बंदोबस्त मी केला खरा, पण त्यांत आपल्या प्राणांचें–माझ्या सौभाग्यसंपत्तीचें–संरक्षण करावें यापेक्षां माझा दुसरा हेतु कोणताच नव्हता.

**लक्ष्मणसिंगः**–माझें संरक्षण ? माझें संरक्षण तूं काय करायचें आहेस ?

**पद्मावतीः**–महाराज, आपल्या राशीला आठवा मंगळ आला तो येतांना परचक्राची वावटळ बरोबरच घेऊन आला, हें पहातांच माझ्या तोंडचें पाणी पळालें ! आपण युद्धाचा उद्योग केल्यास आम्हांवर कांहीं दुर्निवार संकट ओढवेल या चिंताज्वरानें माझें हृदय व्याप्त झालें. मग वसंतोत्सवाचें निमित्त करून आपणाला अंतःपुरांत राहून घेतलें आणि नानाप्रकारच्या ललित लीलांनीं आपलें मन रमवीत रमवीत आजपर्यंत दिवस काढले. हेतु एवढाच कीं, तो उग्रमंगळ साधेल तर दशमस्थानचा होईपर्यंत, निदान नवम स्थानीं जाईपर्यंत, आपलें युद्धाला जाणें थांबवून धरावें. मीं अपराध केला खरा, परंतु तो सद्बुद्धीनें सुचवला आणि निस्सीम प्रेमानें घडवून आणला. या अपराधाची मला क्षमा असावी.

**लक्ष्मणसिंगः**–अस्सें अस्सें ! तुझ्या अपराधाला दुष्टपणा हें कारण नसलें आणि मूर्खपणा हें कारण असलें तरी त्याचा काय उपयोग ! माझी हानि व्हायची ती होऊन गेलीच आहे. मंगळाच्या बाधेपासून माझा बचाव करण्याच्या उद्देशानें तूं मला अंतःपुरांत लपवून ठेवलेंस एकूण ! या तुझ्या अजागळपणाबद्दल हंसावें कीं रडावें हें समजत नाहीं ! पद्मावती, आकाशांत राहून भूलोकच्या प्राण्यावर सत्ता चालवावी हें ज्यांचें सामर्थ्य, त्या ग्रहांच्या पीडेपासून माझें रक्षण करावें म्हणून तूं जरी मला गिरिगव्हरांत अथवा समुद्राच्या तळाशीं लपवून ठेवलेंस तरी त्याचा काय उपयोग होणार आहे ? तो अप्रयोजक बडबड्या जोशी पदरीं बाळगला

आहेस त्याच्या शिकवणीवरून तूं या अविचाराला प्रवृत्त झालीस असें वाटतें. पण त्यामुळें केवढा अनर्थ झाला पहा! जोशी, वैद्य, मांत्रिक यांचें फाजील स्तोम वाढूं दिलें म्हणजे असेंच व्हायचें! ग्रहांची पीडा प्रारब्धानें प्राप्त होते. ती कुणालाही टळत नाहीं. तिच्या भयामुळें संसारचक्राचे फेरे थांबूं शकत नाहींत. त्यांतून त्या त्या ग्रहांच्या अनुकूलतेसाठीं जप, अनुष्ठानें, दानें वगैरे शास्त्रांत सांगितलीं आहेत तीं करावीं; म्हणजे त्यांची पीडा कमी होते. तें सर्व सोडून ग्रहांच्या काळजीनें आपल्यां धर्म्य आचाराचा त्याग करावा म्हटलें तर जगाची रहाटी कशी चालेल? असो. आतां बोलायला वेळ नाहीं. कबूल केल्याप्रमाणें मला निघालेंच पाहिजे.

**पद्मावती**:–मी हात जोडून प्रार्थना करतें कीं, स्वारीला निघण्याचा बेत तूर्त रहित करावा. ही स्वारी म्हणजे मला मोठें प्राणसंकट वाटतें आहे.

**लक्ष्मणसिंग**:–त्यांत कसलें आहे संकट? भीमसिंग हा हेंकट, दुर्बळ आणि मूर्ख राजा आहे. त्याचा मुलगा हिरासिंग आमच्या राज्यावर स्वारी करून आला आहे तो चैनी, विषयी, आणि नेहमीं मृगयेच्या व्यसनांत गर्क होऊन रहाणारा माणूस आहे हें प्रसिद्ध आहे. समरांगणांत या माकडांनीं माझ्यासमोर काय टिकाव धरायचा आहे? एकाच लढाईंत त्यांचा धुव्वा उडवून त्यांना नाकदुराया काढायला लावतों आणि पंधराव्या दिवशीं परत येतों! विजयोत्सवाच्या तयारीला आजपासूनच लाग. वसंतोत्सव संपला कीं विजयोत्सवाला सुरुवात!

**पद्मावती**:–पंधरावा दिवस! महाराज, आपण दृष्टीआड झाल्यावर पुढच्या क्षणीं जगण्याची जिला भ्रांति, त्या हतभागी पद्मावतीनें पंधरावा दिवस पहाण्याची आशा कशाला धरावी? मी आपले पाय स्मरून सांगतें कीं, मी प्रार्थना करतें ही माझ्यासाठीं खचित खचित नाहीं. आपल्या संकटाचें निवारण व्हावें म्हणून मी विनवणी करीत असतां तीं आपण कां ऐकत नाहीं? घटकेपूर्वीं माझ्या शब्दापुढें आपणाला नवखंड पृथ्वीचेंही मोल वाटत नव्हतें आणि आतां तोच माझा शब्द आपणाला कवडीमोल कां वाटतो?

## पद १२

( चाल गजल )

न जाणो पावला । कल्पांत देखा राजराजेंद्रा ।
मनाची हांव कां धांवे । अशी हो आज ही नाथा ॥ ध्रु० ॥
विलंबें काळही वांके । विलंबें सांकडें धाके ।
नये भीमा करूं बाधा । धरावा पंथ हा साधा ॥

आणखी पंधरा दिवस तरी निघण्याचें थांबवून धरावें. याप्रमाणें करणें होईल ना ?

**लक्ष्मणसिंग**:—पंधरा दिवस ? आतां इथे क्षणभरसुद्धां रहाणार नाहीं ! आजचा मुक्काम इथून पांच कोसांवर ! पद्मावती, इंद्रियसुखासाठीं हपापलेला मी एक कामी जन आहें, असें अद्यापि समजतेस यांत चुकते आहेस आणि व्यर्थ आयास पावते आहेस ! अजूनसुद्धां मी तुझ्या मोहपाशांत सांपडेन आणि स्वधर्माला पराङ्मुख होईन ही आशा ठेवूं नकोस ! मी सावध झालों आहें. मी राजा आहें. सर्व सुखाला लाथ मारून राजाचें कर्तव्य मला केलेंच पाहिजे. प्रजेचें रक्षण करणें हा राजाचा सामान्यधर्म सांगितला आहे. तुझ्या नादीं लागून मी त्या सामान्य धर्माचीसुद्धां उपेक्षा केली याबद्दल मला फार फार पश्चात्ताप वाटतो आहे. शत्रूच्या छळानें गांजलेले हजारों प्रजाजन माझ्या दारीं येऊन दीन गाईप्रमाणें तारस्वरानें आक्रोश करीत असतां तिकडे मीं दुर्लक्ष केलें म्हणून त्यांचे ते आक्रोश व्यर्थ गेले असें मानूं नकोस ! त्या आक्रोशांच्या आघातानें माझ्या स्वर्गसोपानाच्या पायऱ्या धडाधड कोसळून पडल्या असतील आणि त्याच आघातानें माझ्याकरतां नरकाचीं कवाडें खाड खाड उघडलीं गेलीं असतील ! या अपराधाची निष्कृति ताबडतोब झालीच पाहिजे, अशी अंतर्यामीं परमेश्वराची प्रेरणा होत असतां मी स्वस्थ कसा राहीन ? ( जाऊं लागतो. )

**पद्मावती**:— ( थांबवून ) जातां ? नका नका जाऊं ! महाराज ! महाराज ! पुढचें मरण मला डोळ्यांपुढें धडधडीत दिसत असतां मी कशी हो जाऊं देऊं ? ( मिठी घालते ) नाहीं मी जाऊं देणार !

**लक्ष्मणसिंग:**—सोड. सोड. पद्मावती ! मी राजा आहें ! पत्नीचें प्रेम आणि राजाचें कर्तव्य यांची गांठ जर सुधेपणानें सुटत नसेल तर ती तरवारीनें तोडणारा मी न्यायनिष्ठुर राजा आहें.

**पद्मावती:**—तर मग प्राणेश्वरा ! घाला तरवारीचा घाव आणि करा पद्मावतीचे दोन तुकडे ! म्हणजे पुढचें दुःख पहाणें तिच्या कपाळीं यायला नको ! महाराज ! जातां तर एकटे जाऊं नका. हे पंचप्राण वाटेचे पांच सोबती म्हणून बरोबर घेऊन चला !

**लक्ष्मणसिंग:**—हा मायेचा पाश यावेळीं तोडलाच पाहिजे. ( तिला ढकलून देतो. ती मूर्छा पावते. दासी धांवत येतात व तिला वारा घालूं लागतात. ) करा, तिला सावध करा. मी राजा आहें. मी न्यायनिष्ठुर राजा आहें. मी प्रजावत्सल धर्मपरायण राजा आहें.

( जातो. )

( पडदा पडतो. )

---

**अंक पहिला समाप्त.**

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला

**स्थळ**:—रतनपूर. गणकाचें घर.

( विद्याधर व कलावती येतात. )

**कलावती**:—विद्याधर, काल राणीसाहेब चंद्रशेखराच्या मंदिरांत रहायला गेल्या तेव्हां त्यांच्या स्वारीबरोबर तुम्ही गेलां होतां ना ?

**विद्याधर**:—होय. तिकडून आतांच परत आलों.

**कलावती**:—कुठेसें आहे तें चंद्रशेखराचें मंदिर ?

**विद्याधर**:—तें मंदिर इथून चार पांच कोसांवर एका जंगलांत आहे. या राज्याची चंद्रशेखर ही देवता आहे. महाराजांच्या पराक्रमाला यश यावें म्हणून राणीसाहेब तिथे राहून मोठी खडतर देवसेवा करणार आहेत.

**कलावती**:—होय ना ? विद्याधर, आमच्या राणीसाहेबांप्रमाणें महापतिव्रता स्त्री या युगांत कुठे दृष्टीस पडायची नाहीं, बरें का ! किती हो त्यांचा बाणेदार करारी स्वभाव ! महाराजांची स्वारी निघून गेल्याबरोबर राजवाड्यांत त्या पाणी प्यायलासुद्धां राहिल्या नाहींत ! एवढें वैभव पायाशीं लोळत असतां तें तुच्छ मानून त्यांनीं त्याच क्षणीं वनवास पतकरला ! केवढें त्यांच्या वैराग्याचें दिव्य तेज ! त्या गेल्यापासून मला तर अगदीं क्षणभरसुद्धां चैन पडेनासें झालें आहे.

**विद्याधर**:—कांहीं काळजी करूं नकोस आणि खिन्न होऊं नकोस. कबूल केल्याप्रमाणें महाराज पंधराव्या दिवशीं राणीसाहेबांना बरोबर घेऊनच परत येतील आणि जिकडे तिकडे पुन्हां आनंदीआनंद होईल. या लढाईचा राणीसाहेबांना कां एवढा मोठा धाक वाटतो

आहे तें समजत नाहीं. पण खरें विचारशील तर या धामधुमींत मला कांहींच तात्पर्य दिसत नाहीं !

**कलावती**:—म्हणजे ?

**विद्याधर**:—अग कसली लढाई आणि कसलें काय घेऊन बसली आहेस ? भीमासिंगासारखें क्षुद्र घुंगुरटें तें काय आणि तें आम्हांबरोबर लढतें आहे काय ! चार आठ दिवसांतच पहाशील कशी मजा होते आहे ती ! असो. हा सरकारी कारभार जसा ठाकठीक चालायचा तसा चालतोच आहे. मला पंचाईत पडली आहे काय ती आमच्या घरगुती कारभाराची. हें बघ, तूं तिकडे राणीसाहेबांजवळ रहायला जाणार असशीलच.

**कलावती**:—होय. मला गेलेंच पाहिजे.

**विद्याधर**:—ठीक आहे. महाराजांना युद्धांत जय मिळावा म्हणून राणीसाहेब उपोषणें करणार आहेत. त्यांबरोबरच तूंही उपास करीत जा !

**कलावती**:—मी उपास करूं ? तें हो कशाकरतां ?

**विद्याधर**:—मला युद्धांत जय मिळावा म्हणून !

**कलावती**:—तुम्ही कशाकरितां युद्ध करणार ?

**विद्याधर**:—चांगली बायको मिळावी म्हणून !

**कलावती**:—तुम्हांला कुठली तरी चांगली बायको मिळावी म्हणून मी उपास करायचे ? वा ! हा खासा न्याय म्हणायचा !

**विद्याधर**:—अग तसें नव्हे. मी उत्तम बायको मिळवावी म्हणतों आहें ती दुसरी कोण ! तूंच !

**कलावती**:—एकूण माझ्यासाठीं तुम्हीं युद्ध करणार. मग बरोबर आह. पण हें युद्ध तुम्हीं करणार कुणाशीं ?

**विद्याधर**:—तुझे वडाल गणकाचार्य यांच्याशीं माझें युद्ध सुरू होणार आहे. समजलीस ?

**कलावती**:—( हंसत ) एकूण आतां युद्धापर्यंत मजल आली म्हणायची ! बाकीचे उपाय हरले वाटतें !

**विद्याधर**:—एक. सांगतों. शत्रूला कबज्यांत आणण्यासाठीं साम, दान, दंड आणि भेद असे चार उपाय योजायचे असतात. त्यापैकीं

सामांत राम राहिलाच नाहीं ! दान म्हणशील तर मी निष्कांचन. मी काय देणार ? गालिप्रदान लागल तितकें देईन पाहिजे तर ! पण तुझ्या बापाला तें नकोच आहे. चवथा उपाय भेद म्हणजे फितूर.तो शत्रु अनेक असले म्हणजे चालतो. आमचा शत्रु पडला एकटाच. तेव्हां तोही उपाय चालत नाहीं. शेवटीं राहतां राहिला दंड ! आणि दंडाचाच उपयोग करण्याचा विचार मीं ठरवला आहे.

**कलावती:**—अस्सें काय ! हें तुम्हीं आगाऊ सांगितलेंत म्हणून बरें झालें. मी आतां आधीं वडिलांना जाऊन सांगतें कीं, विद्याधर तुमच्या डोक्यांत बडगा घालून तुम्हांला ठार मारणार आहेत. संभाळून असा. ( जाऊं लागते. )

**विद्याधर:**—अग थांब थांब. अशी भलतीच समजूत करून घेऊं नकोस. सरळपणानें प्रतिस्पर्ध्यासमोर जाऊन त्याच्या डोकींत बडगा घालणें हा लढाईचा डाव गांवढळपणाचा आहे. तो अविद्याधराला शोभतो. मला विद्याधराला शोभत नाहीं. विद्याधर अशी गांवढळपणाची लढाई मारीत नसतो. तो गनिमा काव्यानें लढणारा मर्द गडी आहे. समजलीस?

**कलावती:**—गनिमी कावा ? गनिमी कावा तें काय असतें ?

**विद्याधर:**—गनिमी कावा ही पंधरावी विद्या आणि पांसष्ठावी कला आहे. तें काय प्रकरण आहे हें इतक्यांत नाहीं तुला कळायचें.

**कलावती:**—तुमचा गनिमी कावा तूर्त बाजूला ठेवा आणि मी एक गोष्ट सांगतें तेवढी ऐका. ऐकाल का ?

**विद्याधर:**—ऐकतों. काय म्हणतेस तूं ?

**कलावती:**—तुम्ही वडिलांजवळ माझ्याबद्दल आणखी एकदां मागणी करा.

**विद्याधर:**—ती आजपर्यंत अनेक वेळां केली आहे. पण अर्धचंद्राखेरीज मला कधीं काय मिळालें आहे ? छे बुवा, मी नाहीं पुन्हा त्या भानगडींत पडायचा !

**कलावती:**—तुम्हीं अनेक वेळां मागणी केलीत हें मी कुठे नाहीं म्हणतें ? पण तुमची मागणी एकदांसुद्धां पद्धतशीर झाली नाहीं एवढेंच माझें म्हणणें.

**विद्याधरः**–पद्धतशीर मागणी ? ती कशी काय करायची ?

**कलावतीः**–जेव्हां जेव्हां तुम्ही येतां तेव्हां तेव्हां त्यांनीं नाहीं म्हटल्यावरोबर त्यांच्याशीं भांडायला आणि वादळायला लागतां. हें हो कसलें तुमचें करणें ! तुम्हांला जें पाहिजे आहे तें नम्रतेनें मागितलेंत तरच तुम्हांला मिळेल. एरवीं कसें मिळेल ?

## पद १३

( राग बागेसरी. ताल त्रिवट. )

**याचना जपुनिच आचरा। सुविनय धरा। वरुनि घ्या स्ववर ॥ध्रु०॥**
**दिनमणि वरदहि। निजात्मजा। देतो प्रखरता। बघुनि चरण-**
**परिचर नर ॥**

तुम्हांला मागायचें आहे. देणारे ते आहेत. याचकाचा हात खालीं आणि दात्याचा हात वर असतो. याचकानें जें मागायचें तें अदबीनें गरीबीनें मागावें लागतें. कारण दात्याची योग्यता फार मोठी आहे. ‘ दाता पंचदशं रत्नं ’ ! दाता हें पंधरावें रत्न आहे बरें पंधरावें रत्न !

**विद्याधरः**–अग, तें तुझं पंधरावें रत्न हातीं लागतें आहे कुठे ? आधीं चवदाव्या रत्नाची गांठ पडते त्यांतून निभावल्यावर पुढें पंधराव्याची गोष्ट बोलायची !

**कलावतीः**–पंधराव्याशीं नीटपणानें वागलें नाहीं म्हणजे चवदावेंच मिळायचें ! आज आतां असें करा. मी त्यांना बोलावून आणतें. आज आणखी एकदां गोष्ट काढा. अगदीं गोगलगाईप्रमाणें गरीबी धरून मागणी करा, आणि ते जें जें बोलतील त्याला बरें बरें एवढेंच उत्तर देत चला. त्यांनीं लुच्चा आहेस म्हटलें तरी आपण म्हणावें ‘बरें !’ मुलगी देत नाहीं म्हटलें तरी सुद्धां तेंच उत्तर ! चालता हो म्हटलें तरी तेंच ! त्यांचा शब्द किती कठोर असला तरी वेडेंवांकडें उत्तर देण्यापेक्षां नुसतें ‘बरें बरें’ म्हणत गेल्यानें अखेरीस बरें झाल्याशिवाय खचित व्हाणार नाहीं. एवढें आज माझ्यासाठीं करा आणि पहा काय चमत्कार होतो तो !

**विद्याधरः**–तुझ्या बापाजवळ मागणी करायची ती गरीबीनें करायची आणि त्यानें शिव्या दिल्या तरी ‘ बरें बरें ’ असें म्हणत रहायचें.

एवढेंच ना ? केलें तुझ्यासाठीं कबूल. जा. तुझ्या बापाला घेऊन ये. ( कलावती जाते व गणक येतो. ) अहो गणक महाराज ! आपण आपली कन्या कलावती मला द्यावी अशी मी नम्रपणानें आपणाला प्रार्थना करतों.

**गणकः**— माझी मुलगी तुला फार आवडली आहे ! नाहीं बरें ?

**विद्याधरः**—( आशेच्या मुद्रेनें ) बरें ! बरें !

**गणकः**—पण ती तुला मुळींच मिळायची नाहीं !

**विद्याधरः**—( खिन्न मुद्रेनें ) बरें ! बरें !

**गणकः**—कारण, तिचें पाणिग्रहण करण्याची पात्रता तुझ्या अंगीं नाहीं.

**विद्याधरः**—( प्रश्नाच्या स्वरानें ) बरें ? बरें ?

**गणकः**—या कामांत बोलायला माझ्या घरीं येत जाऊं नको.

**विद्याधरः**—( अनास्थेच्या स्वरानें ) बरें ! बरें !

**गणकः**—आलास तर चांगला अंगभर मार खाशील. सांगून ठेवतों आहें.

**विद्याधरः**—( मागें सरून घाबऱ्या स्वरानें ) बरें ! बरें ! बरें ! बरें !

**गणकः**—माझी पक्की खात्री झाली आहे कीं तूं लुच्चा माणूस आहेस.

**विद्याधरः**—( ऐटीनें अंगावर चालून येऊन दरडावणीच्या मुद्रेनें ) बरें ! बरें !

**गणकः**—तुझ्या अंगांत कांहीं एक अक्कल नाहीं !

**विद्याधरः**—( मिशीवर ताव देऊन ) बरें ! बरें !

**गणकः**—चावट माणूस ! मघांपासून पहातों आहें, बरें बरें काय लावलें आहेसरे ? ( थोबाडींत मारतो. )

**विद्याधरः**—( मुळुमुळू रडत ) बरें बरें !

**गणकः**—अरे पुन्हां तेंच ! ( आणखी मारतो. )

**विद्याधरः**—( मोठ्यानें आक्रोश करीत ) बरें बरें ! ( गणक चरफडत निघून जातो व कलावती हंसत येते. ) उतरलों तुझ्या परीक्षेला ? झाली तुझी हौस ? हा तुझा गनिमी कावा वाटतें ! बापाकडून थोबाडींत मारवावयाच्या होत्या तर तूंच कां नाहीं चार भडकावल्यास ?

**कलावतीः**— ( हंसत ) आज एक नाहीं तुमच्या मनाजोगें काम झालें म्हणून काय झालें ? उद्यां पुन्हां असेंच करायचें. रोज रोज याप्रमाणें टकळी लावलीत म्हणजे ते तरी कांय करणार ? त्यांना तुमचा अर्ज मंजूर केलाच पाहिजे !

विद्याधरः—बरें बरें ह्मणायचें आणि थोबाडींत खायच्या ! समजली समजली तुझी अक्कल ! आजपासून या विद्याधरानें तुझ्या बापाशीं गनिमी काव्याची लढाई पुकारली हें पक्कें समज ! पहा तुझ्यावर कसा अचानक छापा घालतों तो ! पण तुला एक सांगून ठेवतों. लांडग्यानें कोंकरावर छापा घातला म्हणजे जसें कोंकरूं गुपचूप लांडग्याच्या हवालीं होतें, त्याप्रमाणें मी छापा घालीन तेव्हां निमूटपणें माझ्या स्वाधीन हो बरें का! नाहीं तर बोक्यानें कोंबडीवर छापा घातला म्हणजे ती पंख फडफडावते आणि कलकलाट करते तसें करायला जाशील, आणि मग सारीच मसलत नासून टाकशील आणि माझी फटफजीती करशील. याकरतां आगाऊच सूचना देऊन ठेवली आहे. कोंबडी होऊं नकोस. कोंकरूं हो. काय व्हायचें सांगितलें ?

**कलावती:**—कोंकरूं.

विद्याधरः—होय. कोंकरूं हा खुणेचा शब्द ध्यानांत ठेव. जा आतां कोंकरा ! मीही जातों. ( कलावती जाते. ) हो ! पण माझा डाव तडीला जायला आमच्या वडिलांची मदत जरूर घेतली पाहिजे, आणि ते तर राहिले आपल्या गांवीं ! हरकत नाहीं. त्यांना बोलावून आणतों आणि देतों या गणकाला दणका ! या कोल्ह्याची आणि आमच्या जांबुवंताची गांठ घालून दिल्याखेरीज आमचा गनिमी कावा कुठला साधायला ! ( किंचित् थांबून ) कलावती सुंदर आहे, सुशील आहे, आणि माझ्यावर अनुरक्त आहे. तिच्याविषयीं प्रार्थना केली असतां हा गणक मला धुडकावून लावतो काय ? बरें आहे म्हणावें बच्चंपेरी ! माझ्याशीं प्रसंग आहे ! समजून रहा. पहा तुझ्या हातावर तुरी देऊन तुझी मुलगी कशी हिसकावून घेतों ती !

पद १४

( राग कालंगडा. ताल त्रिवट. )

दयिता सुखदा सुम-कोमलांगी । महनीयशीला रमणी—बाला

नटली सदा मम रागरंगीं ॥ ध्रु० ॥

धुडावीन निभ्रांत कांतीतिकाला। विद्याधराला ती घालि माला।

( जातो. )

## प्रवेश दुसरा.

( वेत्रवती येते.)

वेत्रवतीः—

### पद १५

( चाल लावणी. )

कशासीं बुडाया करिसी नरा ढंग नाना ॥ ध्रु० ॥
फुका दिमाखें मिरविसि प्रौढी सूत्रधार हरि हें उमजेना रे ॥
लटपट तोरा डळमळ जोरा ध्यानीं दयाघन ना आणा ना माना
प्राण्यारे न आणा न माना ॥

( जाते. )

---

## प्रवेश तिसरा.

स्थळः—जंगल. चंद्रशेखराचें देवालय.

( स्नान केलेली व शुभ्र वस्त्रें परिधान केलेली पद्मावती देवाजवळ बसली आहे. कलावती अंतरावर उभी आहे. )

**कलावतीः**—देवी, आपली ही कडकडीत उग्र तपश्चर्या पाहून रडूं येतें ! नेहमीं त्रिकाल स्नान, त्रिकाल शिवपूजा, देवावर दुग्धधारेचा अभिषेक, शिवनामाचा जप, अहोरात्र जागर आणि केवळ प्राणरक्षणापुरतें गोमूत्र व दुग्ध यांचें सेवन, इतक्या प्रकारांनीं अव्याहत उपासना चालवून आपला कोमल देह झिजवीत आहां; तरी सुद्धां या चंद्रशेखराला करुणा येत नाहीं. तेव्हां याला देव म्हणूं कीं पाषाण म्हणूं ?

### पद १६

( राग जोगी कालंगडा. ताल त्रिवट. )

विफलाच प्रार्थना । शंभुला ॥ ध्रु० ॥
हा श्वशुरगृहीं सुखें वसाया । लोभला ॥ १ ॥
अन्न तसें मन प्रस्तर हृदयें । जाहला ॥ २ ॥

**पद्मावती**:–कलावती, उगीच कां बरें देवाला दोष देतेस ? आपली निष्ठा कसोटीला लागल्याखेरीज त्यानें तरी करुणा कां करावी ?

## पद १७

( राग देशी. ताल त्रिवट. )

**भाव भला भजकाचा । साधी प्रभुदया ॥ ध्रु० ॥**
**कायिक वाचिक नच याग निभावे । हृदयिं रिघे देव ॥**

ह्याच्या मनांत आलें तर आपला भाग्योदय व्हायला उशीर का लागणार आहे ? पंधराव्या दिवशीं परत येतों म्हणून महाराज कबूल करून गेले तो आजचा पंधरावा दिवस. चंद्रशेखराची कृपा होईल तर त्यांचा मुखचंद्र माझ्या दृष्टीस पडल्याखेरीज आजचा सूर्य तो मावळूंच देणार नाहीं ! जा. मार्गावर उभी राहून उत्तरेच्या दिशेला दूरवर नजर लाव, आणि स्वारी परत आल्याचा कुठे कांहीं मागमूस दिसतो आहे का पहा बरें ! ( कलावती जाते व पहाते. )

**कलावती**:–देवी, आपला अजमास खरा ठरला. सैन्य तर इकडे येतांना दिसतें आहे. ( आणखी निरखून ) पण तें या वाटेनें न येतां दुसऱ्याच वाटांनीं फुटून फुटून राजधानीकडे चाललें आहे हें काय बाई आश्चर्य ! एक घोडेस्वार मात्र फार त्वरेनें दौड करीत इकडे येतो आहेसा वाटतो आहे.

**पद्मावती**:–( हर्षानें ) किती वेडी आहेस ! म्हणे कोणसा स्वार येतो आहे ! अग खुद्द हुजूरची स्वारी इकडे येते आहे हें नाहीं का तुला तर्कानें समजत? मोहीम करून परत येतांना या राज्यदेवतेचें दर्शन घेतल्याखेरीज राजधानीला जायचें नाहीं ही त्यांची वहिवाटच आहे. म्हटल्याप्रमाणें पंधराव्या दिवशीं ते परत यायचे हें मला ठाऊकच ! अहाहा ! केवढा हा उल्हासाचा दिवस ! ( पंचारती हातांत घेऊन त्वरेनें पुढें येते. ) कलावती, मला पुढें होऊं दे, त्या अमृतमेघाची वृष्टि सर्वांआधीं या चातकीवर होऊं दे !

**कलावती**:–थांबा. देवी, हे महाराज नव्हत ! हा दुसराच कोणी माणूस दिसतो आहे.

**पद्मावती**:–अरेरे ! चातकीनें पर्जन्यासाठीं तोंड पसरलें तों त्यावर गारांचा मात्र मार बसला ! ( दासीजवळ आरती देऊन ) येणारा माणूस कोण असावा हें ओळखतें आहे का ?

**कलावती**:–होय, हे ठाकूर रामसिंग येताहेत. पण सांगायला भय वाटतें कीं, ठाकूरजींचा आजचा नूर कांहीं ठीकसा दिसत नाहीं !

**पद्मावती**:–(सचिंत मुद्रेनें) काय अशुभ वार्ता घेऊन येतो आहे कुणाला ठाऊक ! मना, कठोर हो ! तुला या वेळीं वज्रापेक्षांही कठोर व्हायला पाहिजे बरें ! ( रामसिंग येतो, मुजरा करतो, व खालीं मान घालून उभा राहतो. ) ठाकूरजी, राज्याचे धनी खुशाल आहेत ना ?

**रामसिंग**:–खुशाल आहेत.

**पद्मावती**:–झालें. झालें. ते खुशाल आहेत एवढ्यांतच माझ्या सर्व मनोरथांचें भरपूर माप माझ्या पदरीं पडलें. बोला आतां आणखी काय वर्तमान असेल तें !

**रामसिंग**:–( खेदानें ) काय सांगूं ? कसें सांगूं ! आपल्या नितांत कोमल हृदयावर निखाऱ्यांचा वर्षाव कसा करूं ?

**पद्मावती**:–रामसिंगजी, पद्मावती शरीरानें नाजूक आणि दुर्बळ आहे, मनानें कोमल आणि भित्री आहे, सुखाची भुकेली आणि संकटाला कचरणारी आहे, अपार ऐश्वर्याची भोक्ती आणि ललित विलासांची ज्ञाती राजपत्नी आहे,या समजुती मनांत धरून तुम्हीं माझ्याशीं भीत भीत जपून बोलणार आहां,पण तसें करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं.भर्त्यांच्या सहवासांत ते गुण शोभत होते व त्यांचें कौतुक होत होतें ! त्यांचा वियोग झाल्याबरोबर मींही माझ्या अंगच्या त्या त्या गुणांचा बलात्कारानें त्याग केला आहे आणि मनाला तपश्चर्येची धगधगीत आंच लावून त्याचें जडत्व आणि मालिन्य घालवून टाकलें आहे. आतांची पद्मावती असंग, निर्भय व निर्विकार असून ती प्रत्येक लाभहानीची गोष्ट विवेकाच्या तराजूंत तोलून तिचें मोल ठरवित. पुरुषांनीं दया करण्याजोगा स्त्रीस्वभावाचा कोणताही विशेष हिच्यांत आतां राहिला नाहीं. हें सर्व समजून काय तुम्हांला दुष्ट वर्तमान सांगायचें असेल तें एकदम सांगून टाका. कचरूं नका.

**रामसिंगः**—आज्ञेप्रमाणें एकदम सांगायची वार्ता एवढीच कीं. महाराजांची स्वारी हल्लीं कैदेंत सांपडली आहे.

**पद्मावतीः**—( आश्चर्यानें ) कैदेंत सांपडली आहे ? कुणाच्या कैदेंत ?

**रामसिंगः**—माणिकदुर्गवाला भीमसिंग याच्या.

**पद्मावतीः**—हा अनर्थ कसा घडून आला ?

**रामसिंगः**—भीमसिंगाचा पुत्र हिरासिंग याचें पारिपत्य करण्यासाठीं महाराज सैन्य घेऊन गेले.

**पद्मावतीः**—हें प्रसिद्धच आहे. बरें मग ?

**रामसिंगः**—पहिल्याच लढाईंत पराजय करून महाराजानीं त्याची दुर्दशा केली.

**पद्मावतीः**—लढाईचा परिणाम तसाच होणार हें सर्व लोकांनीं आधींच ताडलें होतें. बरें. पुढें काय झालें ?

**रामसिंगः**—हिरासिंगाच्या नाड्या आंवळल्या तेव्हां तो [illegible] होऊन महाराजांना शरण आला. तव्हां त्यानीं प्रसन्न होऊन त्याचा गुन्हा माफ केला.

**पद्मावती**—(अभिमानानें) शरणागतावर कृपा करणें हें वीरांचें ब्रीदच आहे!

**रामसिंगः**—याप्रमाणें उभयपक्षीं सौरस्य झाल्यावर भेटी, नाचरंग वगैरे समारंभ वारंवार घडून आले. शेवटच्या दिवशीं हिरासिंगानें मेजवानीचें निमित्त करून महाराजांना बोलावून नेलें आणि विश्वासघात करून त्यांना कैद केलें !

**पद्मावतीः**—हाय हाय ! केवढा अजिंक्य मोहरा ! आणि विश्वासघातामुळें हिरासिंगासारख्या क्षुद्र शत्रूच्या हातांत सांपडला ! ( उसास टाकून ) विश्वासघात ! विश्वासघात ! धिःकार असो विधात्याच्या विश्वासघातकी कर्मकौशलाला ! तो सज्जनांच्या मनासाठीं म्हणून जें धैर्याचें कवच निर्माण करतो त्यावर शत्रूच्या पराक्रमाची तरवार चालत नाहीं खरी, पण त्याच कवचांत अशी एक मुद्दाम पोकळ जागा राखून ठेवलेली असते कीं, जिथून विश्वासघाताची सुरी सहज भोंसकली जाते ! बरें.

शत्रूनें असा दगा केला असतां सैन्यांत तुम्हांसारखे रथी महारथी होते! धन्याला सोडवण्याचा तुम्हीं कोणींच कसा उद्योग केला नाहीं?

**रामसिंगः**—मोठी शरमेची गोष्ट! देवी, तेंच आमच्या मनाला जन्माचें शल्य होऊन बसलें आहे! त्या प्रसंगांत आम्हांला मृत्यु येता तर किती बरें झालें असतें! हें लाजिरवाणें तोंड आपणापुढें दाखवण्याचें तरी आमच्या नशीबीं आलें नसतें! काय करावें? ज्या वेळीं शत्रूनें महाराजांना धरलें त्याच वेळीं त्याची फौज आम्हांवर एकदम चालून आली. आम्हीं बेसावध होतों. आम्हांकडून लढाईची तयारी कांहींच नव्हती. आणि अकस्मात् अशी गर्दीची वेळ गुदरली तेव्हां सर्वांचाच धीर सुटला; आणि मोठ्या शर्तीनें सैन्याचा बचाव करून आम्ही निघून आलों. देवी, या मोहिमेचा हा असा एकंदर वृत्तांत कसा घडून आला हें एक मोठें अतर्क्य गूढ वाटतें. हें एखादें भयंकर स्वप्न पडलें म्हणावें तर त्याचा प्रत्यक्ष अनुभव आम्ही भोगतोंच आहों. महाराज एवढे कर्ते ज्ञाते असून त्यांना अशी भुरळ कशी पडली? युद्धकार्यांत जागरूक असणारे आम्ही याच खेपेस बेफाम कसे राहिलों?

## पद १८

( राग सोनी. ताल त्रिवट. )

**घाव डाव अवचित चुकला। सकलहि मतिबल विफल होय**
**धैर्य जाय येतां घाला ॥ ध्रु० ॥**
**नवनव भयकर सदैव कुदैव कृति करि कवणा कळेल ठाव ॥**

**पद्मावतीः**—( उसासा टाकून ) आठवा मंगळ! आठवा मंगळ! ठाकुरजी! हा सारा आठव्या मंगळाचा प्रताप बरें! माझीच दशा पहाना, महाराजांना अंतःपुरांत राहून घेण्यासाठीं मीं किती किती युक्त्या लढवल्या? कुठे बाहेर त्यांचें लक्ष जाईल म्हणून पोटांत धास्ती असे, त्यामुळें रात्रंदिवस टपून रहावें लागे. त्या वेळीं जिवाचें कितीहो रान करून घेतलें! पण फुकट फुकट! शेवटीं कुणी दुष्टानें अर्जदार लोकांना बागेंत घुसून महाराजांपुढें जाण्याची बुद्धि शिकवली आणि माझा घात केला!

**रामसिंगः**—( स्वगत ) मीच मीच तो क्रूरकर्मा राक्षस! हे साध्वी! तुझाच काय, पण सर्व राज्याचा घात मींच केला!

**पद्मावती**:—मग स्वारीला निघण्याचा बेत ठरला तेव्हां जाऊं नका, पंधरा दिवस दम धरा, म्हणून परोपरीनें विनवणी केली; पराकाष्ठेचा त्रागा केला, तरी सुद्धां कोणी पिशाचानें ओढून न्यावें त्याप्रमाणें निघून गेले! आणि आतां स्वतः अघोर संकटांत पडले आहेत आणि आम्हांला घोरांत घातलें आहे! अंतःपुरांतून निघाले ते थेट शत्रूच्या कारागृहांत शिरले! कुणाचेंच पुण्य कसें हो त्यांच्या मार्गांत आडवें आलें नाहीं! म्हणून म्हणतें, रामसिंगजी, ही अतर्क्य करणी आठव्या मंगळाची आहे.

**रामसिंग**:—देवी, हे अस्वस्थतेचे दिवस. धनी जाग्यावर नाहींत त्यामुळें राज्याला परचक्राचें आणि अंतःक्षोभाचें भय आहे. आपण इथें अरण्यांत रहाणें सुरक्षित नाहीं. याकरितां राजधानीला चलावें.

**पद्मावती**:—( खिन्न मुद्रेनें ) राजधानीला येऊं म्हणतां ? कशी येऊं ? कोणत्या तोंडानें येऊं ? तिथें काय काय सुखाचे डोंगर माझ्यासाठीं वाढून ठेवले आहेत म्हणून येऊं ? ज्या क्षणीं माझा मानसविहारी राजहंस माझ्या नजरेच्या टापूबाहेर उडून गेला याच क्षणीं सारें जग मला शून्य झालें ! त्याच क्षणीं मला तो राजवाडा स्मशानासारखा अमंगळ व भयंकर दिसूं लागला, आणि तिथले ऐश्वर्यभोगाचे विलास वमनाप्रमाणें किळसवाणे वाटूं लागले ! त्यामुळें तर मी इथे एकांतवासांत येऊन राहिलें. आणि आतां परत कशाकरतां बोलावतां !

## पद. १९

( राग—बागेसरी. ताल—त्रिवट. )

**केंसि पाहुं गेहा। गमे सांकडें मोठें। मनिं भय दाटे ॥ ध्रु० ॥**
**शुक साश्रु मैना। केव्हां नाथ येई। मला पुसतिल त्यां वदुं काई॥**

माझ्या सौभाग्याचा चिंतामणि माझ्या हातून गमावला आहे, तो ज्या दिवशीं माझ्या हातीं परत येईल त्या दिवशीं तो घेऊनच मी समारंभानें राजधानीला परत येईन बरें ! मी विदेही वनवासी तपस्विनी ! माझ्या वाटेला कोण जायला बसलें आहे ! मोठें आश्चर्य आहे कीं माझ्या सुरक्षितपणाबद्दल तुम्हा सर्वांना एवढी काळजी वाटावी, आणि ज्यांच्या चरणांशीं माझे प्राण गुंतले आहेत ते राज्याचे धनी कसे सुटतील हा विचार कोणींच बोलूं नये ! मला तर त्या प्रयत्नाला या क्षणापासून

लागायचें. तर सांगा, मंत्री व मुत्सद्दी यानीं हा उद्योग कसा कसा करावा म्हणून ठरवलें आहे ?

**रामसिंगः**—मंत्री व मुत्सद्दी आपणाला असा सल्ला देणार आहेत कीं, शत्रूशीं समेट करावा आणि महाराजांना सोडवून घ्यावें.

**पद्मावतीः**—समेट करावा ? ( स्वगत ) समेटाचें कारस्थान दुर्गावतीचें ! तें माझ्या स्वभावाला आवडत नाहीं. असो. ( उघड ) कसा कसा समेट करावा म्हणतात ?

**रामसिंगः**—त्यांचें म्हणणें असें आहे कीं, शत्रु मागेल तें द्यावें तो करील तो अपमान सोसावा, त्याला शरण जावें, आणि—

**पद्मावतीः**—पुरे पुरे. समजली त्यांची अक्कल ! हे मुत्सद्दी अगदीं नादान बनून गेले ! यांच्या नादीं लागून परिणाम नाहीं. रामसिंगजी, मनुष्यानें एकदां आत्मविश्वास गमावला म्हणजे कसा तो गाजीचा पाजी बनतो पहा ! भीमसिंग हा एक भिकार संस्थानिक, जातां येतां सहज पायाखालीं चिरडतां येण्याजोगा तुच्छ माणूस, आणि म्हणे महाराज लक्ष्मणसिंगांच्या पत्नीनें त्याला शरण जावें म्हणून हे शहाणे मुत्सद्दी सल्ला देतात ! पद्मावती विदेही झाली, तिनें संसारांतून मन काढलें, तेव्हां तिला काय, आपण सांगूं तो मानहानीचा अथवा कसलाही मार्ग ती स्वीकारील असें या मुत्सद्यांना वाटतें आहे ! पण विदेही माणसालासुद्धां कर्मयोग सुटला नाहीं, त्यानें सुद्धां आपल्या श्रेष्ठ पदाचा अधिकार यथान्याय चालविलाच पाहिजे, हें गीतारहस्य या प्राकृत लोकांना काय ठाऊक ! क्षत्रियावरचें संकट क्षत्रियेनें निवारण करावयाचें, तें तरी क्षात्रवृत्तीनेंच निवारण केलें पाहिजे. ठाकुरजी ! महाराजांना कारागृहांतून सोडवणें हें आतां माझ्या आयुष्याचें कर्तव्य होऊन बसलें आहे. त्या कर्तव्याची अनास्था करून आळसांत घालवलेला एक एक क्षण मला युगासमान भासतो आहे. शत्रूवर स्वारी करून महाराजांना मुक्त करावें इतकेंच नव्हे, तर शत्रूच्याही मुसक्या आंवळून त्याला रतनपुरास आणावें; आणि सूड घ्यावा, असा मी सिद्धांत ठरवला आहे. तुम्हां सर्व सरदार लोकांना माझी अशी आज्ञा आहे कीं, आजचा दिवस आपल्या फौजांना विश्रांति

देऊन उद्यां सर्वांनीं माझ्याबरोबर स्वारीला निघालें पाहिजे. माझ्या सैन्याचें सेनापत्य मी स्वतःच करणार.

**रामसिंगः**–( विस्मयानें ) काय ! देवी पद्मावती ! आपणच सेनापति होणार ?

**पद्मावतीः**–कां बरें ? स्त्रियांना सेनापतीचा अधिकार चालवता येणार नाहीं म्हणतां कीं काय ? मी बायको माणूस असलें तरी तुमच्याच विद्येंत तुम्हांपेक्षां कांकणभर अधिकच करामत करून दाखवीन, एवढी खात्री असूं द्या !

**रामसिंगः**–तें कांहीं माझें म्हणणें नाहीं. आपण धनीच आहां. आपण सांगाल ती कामगिरी जिवाची पर्वा न ठेवतां करून दाखवूं आणि आपली मोहीम यशस्वी करूंच करूं अशी आम्हाला हिम्मत आहे. मात्र आपण एका गोष्टीची तजवीज आगाऊ पाहून ठेवावी.

**पद्मावतीः**–कोणती तजवीज म्हणतां ?

**रामसिंगः**–देवी, आपली स्वारी हा एक निर्वाणींचा बाण आहे. हा हटकून काम करील यांत शंकाच नाहीं. तथापि जर पीछेहाट झाली तर राज्याचा बचाव पुढें कसा कसा करायचा हें एव्हांपासून ठरवून ठेवलेलें बरें. दूरदर्शी ज्ञाते लोक आहेत ते भावी प्रसंगाबद्दल असाच बंदोबस्त ठेवीत असतात.

**पद्मावतीः**–( स्मितपूर्वक ) अहो दूरदर्शी ज्ञाते लोक ! आपण इतकी दूरवर नजर टाकण्याचें कारणच नाहीं. उद्यांपासून माझ्या राशीला दहावा मंगळ येतो आहे तो युद्धांत विजयश्रीची वेणी धरून तिला ओढीत माझ्या पायांपाशीं आणून सोडील ही माझी खात्रीच आहे. याकरतां प्रथम योगेश्वर श्रीकृष्णाच स्मरण करून उत्साहानें युद्धकार्याला प्रवृत्त व्हा.

## पद २०

( राग भूप. ताल त्रिवट. )

**संग्रामाच्या संरंभा । योगें यो शोभा । म्हणुनी स्वधर्मो-**
**धारा । योगेश्वरातें ध्यानीं आणा ॥ ध्रु० ॥**
**मायाविला माया । दावा रणीं शौर्या । विजय दे सुपथ हा जाणा ॥**

( जातात. )

# प्रवेश चवथा.

स्थळः—पद्मावतीची छावणी.

( गणक विचार करीत आहे. )

**गणकः**—आतां तर बुवा आपला जीव मेट्टाकुटीला आला ! दररोज सैन्याचें कूच ! एक दिवस देखील निवांतपणें बसून राहीन म्हटलें तर चैन पडूं देत नाहींत! दररोज सामानसुमान भरा भरा भरा, पळा पळा पळा, उतरा उतरा उतरा, हीच गर्दी ! आतां तर शत्रूच्या मुलखांत आलों; तेव्हां कुणीकडून काय संकट येतें ही काळजी नवीनच उद्भवली ! मला कांहीं पद्मावती राणीसाहेबांच्या सैन्याबरोबर भटक्या मारीत फिरायचें कारण नव्हतें. राजधानींत स्वस्थपणानें मिष्ट शाल्योदन भक्षण करून मजेनें ग्रंथ चाळीत बसणारा मी ! पण करणार काय ? कलावतीची नोकरी राणीसाहेबांजवळ, आणि राणीसाहेब रहाणार सैन्यांत ! आणि सैन्य म्हटलें म्हणजे सारा सोटभैरवांचा कारभार ! राणीसाहेबांजवळ झालें तरी तरणीताठी एकटी पोरगी सैन्यांत ठेवूं कशी ? तेव्हां मलाही तिच्याबरोबर हिंडायलाच पाहिजे. काय करावें या पीडेला ! तरी बरें, तो लांडगा विद्याधर माझ्या घरीं फेऱ्या घालघालून कंटाळला म्हणून निभाव लागला आहे. नाहीं तर तो माझ्या कोंकराला—माझ्या कलावतीला—केव्हांच झपाटून गट्ट करायचा ! तरी पण एकंदरींत कलावतीला एकटीला राणीसाहेबांकडे पाठवावें लागतें हें ठीक नाहीं. तिच्या सोबतीला दुसरी एखादी बायको जरी मिळाली असती तरी किती बरें झालें असतें ? दुसरी बायको ! कोणच्याना कोणच्या तरी निमित्तानें ती दुसरी बायको पहा कशी माझ्या जिभेवर नाचत असते ती ! यंदां मला द्वितीय भार्येचा योग आहे म्हणून गणित बोलतें आहे त्याचा विचार काय ? मला तर या नव्या बायकोचा रात्रंदिवस ध्यास लागला आहे. लोकांना झोपेंत स्वप्नें पडतात आणि मला तर जागेपणीं तिचीं स्वप्नें पडत असतात ! जेव्हां तेव्हां ती समोर येऊन उभी राहिल्याचा भास होतो आहे ! लग्नाचा योग तर आहे. आतां मुहूर्तही पुष्कळ आहेत. नवरीसाठीं दागिने तयार करून

ठेवलेच आहेत. पण मी नवरा मुलगाच लष्कराबरोबर भटकतों आहें, तेव्हां इथे मला नवरी मिळणार कशी ? पण ही काळजी मला पाहिजे कशाला ? माझ्या कुंडलींत हे अघळ पघळ आसनें घालून शनि मंगळ शुक्रचंद्रादि प्रतिष्ठित बुड्ढे लोक बसले आहेत हीं काय लहान सामान्य प्रकरणें आहेत ? यांचा प्रभाव इतका अद्भुत आहे कीं, माझ्या नवरीला ते इथे लष्करांतसुद्धां माझ्या बिऱ्हाडीं आणून पोंचती करतील ! ( मोहिनी येते. ) ओ हो ! पोंचती करतील म्हणून बोलतों आहें तों खरोखरच त्यानीं नवरी आणून पोंचती केली म्हणावें कीं काय ? होय होय. मी म्हणतों तेंच खरें. वा ! कशी नीट नेटकी साजिरी गोजिरी गोरी गोमटी छान छबकडी दिसते आहे हो ! या माझ्या नवीन बायकोचें नांव मी मोहिनी ठेवतों. बस्स ! मोहिनी हेंच नांव ! ( मोहिनीमागून घटखर्पर येतो. ) अरे ! पण मोहिनीच्या पाठीस लागलेल्या भस्मासुराप्रमाणें हा कोण अर्बुज अमंगळ माणूस येतो आहे ? ( घटखर्पर जवळ येतो व मोहिनीस मागें सारून गणकापुढें उभा राहतो. ) कुठले हो तुम्ही ? तुमचें नांव काय?

**घटखर्पर**:—आम्ही काशीचे रहाणारे.

**गणक**:—हां. अस्सें. ( स्वगत ) काशीकर म्हणजे लबाड हें प्रसिद्धच आहे.

**घटखर्पर**:—आमचें नांव घटखर्पर.

**गणक**:—काय बेटें अगडबंब नांव तरी ! अर्थ पहायला जावें तों घट म्हणजे मडकें आणि खर्पर म्हणजे खापर ! ( हंसत उघड ) अहो, तुमचे नांव आम्हांला अवघड वाटतें ! आम्ही तुम्हाला खापरभट म्हटलें तर चालेल कीं नाहीं ?

**घटखर्पर**:—अहो खापरभट म्हणा, कोपरभट म्हणा, कीं ढोपरभट म्हणा ! आमचें काम करा म्हणजे झालें. हो, आमचें काम अडलें म्हणून आम्ही तुमच्या घरीं आलों. मग तुम्ही बरें वाईट बोललांत तर त्याचा राग कशाला ? म्हणच आहे, ' अडला नारायण गाढवाचे पाय धरी ! ' काय समजलांत ? अं ? ( गणकाचा हात ओढून जोरानें टाळी मारतो. ) हां !

**गणकः**–( स्वगत ) बोलतां बोलतां यानें आम्हांला गाढव तर ठरव-लेंच ! आणखी काय काय पूजा करतो आहे कोणाला ठाऊक ? (उघड) बरें, बोला तुमचें काय काम तें !

**घटखर्परः**–या मुलीच नांव मोहिनी.

**गणकः**–( चपापून स्वगत ) अरेच्या, मीं जें हिलां हौसेनें नांव ठेवलें तेंच हिचें खरें नांव ठरलें एकूण ! हा कांहीं अघटित योग दिसतो. हिला मीं माझी नवरी म्हटलें आहे त्याप्रमाणें या भस्मासुरानें जुळवून दिलें म्हणजे काम झालें !

**घटखर्परः**–ही मुलगी मीं हिच्या बापापासून हजार रुपयांना विकत घेतली.

**गणकः**–हजार रुपयांना ? अबबब ! ( स्वगत ) आतां या पोरीबद्दल मी इतके रुपये याला द्यायचे का !

**घटखर्परः**–मीं तुम्हाला खासगी सांगतों.

**गणकः**–( आशेनें ) खासगी सांगा.

**घटखर्परः**–मी तुम्हाला खरें सांगतों.

**गणकः**–हो ! खरें असेल तेंच सांगा. व्यापारी भाषा नको !

**घटखर्परः**–मीं हिची किंमत एक हजार रुपये दिले. मी जर नऊशें नव्याण्णव रुपये पंधरा आणे अकरा पै दिल्या म्हणून तुम्हाला सांगितलें असतें, तर तुम्हीं माझें काय केलें असतें ? पण एक पैसाठीं मी कशाला बाबा खोटें बोलूं ? मी आपले एक हजार रुपये रोख दिले आहेत हो ?

**गणकः**–( स्वगत ) काय लेकाचा थापा मारतो आहे खापऱ्या ! घरा-धर हजार खापऱ्यासुद्धां नसतील, आणि म्हणे यानें हजार रुपये दिले ! आणि म्हणे खासगी सांगतोय् आणि खरें सांगतोय् !

**घटखर्परः**–तुम्ही अनोळखी झालां म्हणून काय झालें ! कुणाशीं झालें तरी सचोटीनेंच वागलें पाहिजे. 'सत्यापरता नाहीं धर्म' असें शास्त्रच बोलतें आहे ! काय समजलांत ? अं ? ( गणकाच्या पागोट्यावर टाळी मारतो. ) हां !

गणकः–( रागानें पागोटें सांवरीत ) हें हो काय तुमचें! डोचक्यावर कसली टाळी मारतां! काय एकेकाला त्रासदायक विचित्र खोड्या लागलेल्या असतात पहा! आतां मला आडव्या तिडव्या चापट्या मारूं नका. तुमचें म्हणणें मीं कबूल केलें. तुम्हीं आणलेली ही मुलगी मी पतकरली. मी हिला ठेवून घेतों. ज्या दिवशीं हिचें माझ्याशीं लग्न होईल त्या दिवशीं मी तुम्हाला हजार रुपये देईन. आतां झालेंना? जा आतां

घटखर्परः–मी तुम्हांला खासगी सांगतों.

गणकः–खासगी सांगा, सरकारी सांगा, हळूच सांगा, अगर घराच्या कौलारावर चढून ओरडून सांगा, काय तें थोडक्यांत सांगा म्हणजे झालें!

घटखर्परः–मी तुम्हाला खरें सांगतों.

गणकः–एवढा वेळ खोटेंच बोलत होतां एकूण! बरें, आतां खरें असेल तेंच सांगा! मी कबूल करतों!

घटखर्परः–तुम्ही मुर्दाड आहां!

गणकः–( रागानें ) कां हो शिवी देतां?

घटखर्परः–हें पहा, मीं तुम्हांला मुर्दा म्हटलें असतें तर तुम्ही माझें काय केलें असतें? पण एका अक्षरासाठीं मी कशाला बाबा खोटें बोलूं? मी आपला म्हणतों, तुम्ही मुर्दाड आहां. अहो, ही मुलगी मी तुम्हांला देण्यासाठीं आणलेली नसतां तुम्ही हिचा अभिलाष धरिलात त्या अर्थी तुम्हाला मुर्दाड कां म्हणूं नये? मोहिनी! इथे नाहीं आपलें जमायचें! तुला हवालीं करण्याजोगें हें विश्वासाचें कूळ नव्हे! आपण दुसरीकडे जाऊं. चल.

गणकः–( स्वगत ) अरेच्या! हें घबाड हातांतून निसटून चाललें कीं!–(उघड) अहो घटखर्परमहाराज! गैरसमज झाल्यामुळें माझी चूक झाली! ज्या हेतूनें तुम्हीं मोहिनीला माझ्या घरीं आणलें असेल तोच तुमचा हेतु माझ्याकडून पूर्ण होईल. जाऊं नका. मी असा बेअब्रूचा माणूस नाहीं. माझ्यावर खुशाल विश्वास टाका बरें!

घटखर्परः–अगदीं इमानपूर्वक सांगतां?

गणकः–होय. इमानपूर्वक सांगतों.

घटखर्परः–तुम्हीं हिला मुलगी म्हटलें पाहिजे!

**गणकः**—म्हणेन. तसेंच म्हणेन ! ( स्वगत ) ही मुलगीच आहे. मी कुठे हिला मुलगा म्हणतों आहें ?

**घटखर्परः**—हिला तुमच्या घरीं आणण्यांत माझा काय हेतु आहे तो सांगतों. मला एक मुलगा आहे त्याचें लग्न व्हायचें आहे. त्यासाठीं ही नवरी मीं खरेदी केली. तो मुलगा इथून लांब रहातो, आणि तिकडे चोरांचा सुळसुळाट फार आहे म्हणतात; तेव्हां हिला बरोबर घेऊन तिकडे कसा जाऊं ? बरें, इथे सैन्यांत ठेवावी तर ठेवायची कुणाजवळ ? तेव्हां म्हटलें मुलग्यालाच इथे घेऊन यावें, आणि तुमच्याच मार्फतीनें लग्नाचा समारंभ उरकून टाकावा. आणि म्हटलें, मुलग्याला घेऊन येई-पर्यंत हिला तुमच्याच घरीं ठेवावें. असलें हें द्रव्य ठेवून घ्यायला तुम्हासारखे पापभीरु, सच्छील, सत्पात्र ब्राम्हण मिळणार आहेत कुठे ? काय समजलांत ? अं ? (गणकाच्या पाठीवर टाळी मारितो.) हां !

**गणकः**—सच्छील सत्पात्र ब्राम्हणाची पाठ चांगलीच थोपटलीत म्हणायची ! असो. तुम्ही परत याल तोंपर्यंत मोहिनीचा सांभाळ माझ्याकडे लागला बरें ! अगदीं खुशाल निर्धास्तपणानें जा आणि तुमच्या मुलाला घेऊन या. हिच्या सोबतीला माझ्या घरांत माझी मुलगी आहेच. ती राणीसाहेबांकडे नोकरीला असते. ती राणीसाहेबांकडे जाईल तेव्हां हिलाही तिच्या सोबतीला पाठवीत जाइन.

**घटखर्परः**—अवश्य पाठवा. राणीसाहेबांची ओळख आणि मेहरबानी झाल्यावर आणखी काय हवें ! मी कांहीं तुम्हांला फारशी तसदी पडूं द्यायचा नाहीं. आणखी वीस दिवसांनीं परत येतों.

**गणकः**—ठीक आहे. जा आतां.

**घटखर्परः**— मी तुम्हांला खासगी सांगतों.

**गणकः**—( त्रासून स्वगत ) लागला पुन्हां चऱ्हाट वळायला !

**घटखर्परः**—मी तुम्हांला खरें सांगतों.

**गणकः**—अहो खोटेंच कां सांगाना ! खोटें सांगितलेंत तरी कांहीं धर-णीकंप व्हायचा नाहीं ! दर खेपेस खरेंच कशाला सांगत असतां हो ?

**घटखर्परः**—मी आपला वीस दिवसांनीं परत येणार. मी एकोणीस दिवस, एकूण साठ घटका, आणि एकूण साठ पळांनीं येईन असें म्हटलें

असतें तर तुम्हीं माझें काय केलें असतें ? पण एक पळासाठीं मी कशाला बाबा खोटें बोलूं ? मोहिनी, संभाळून रहा बरें. गणकमहाराज, येतों आतां. नमस्कार. यावत्पुनर्दर्शनम्. काय समजलांत ? अं ?

**गणकः**–( दूर पळतो. ) समजलों समजलों ! या खेपेला सावध आहें.

**घटखर्परः**–काय समजलांत ? अं ? ( आपल्याच पोटावर टाळी मारतो.) हां ! ( जातो. )

**गणकः**–गेली एकदांची ब्याद. काय वेड्यानें उच्छाद मांडला होता ! मोहिनी, त्या खापऱ्याच्या तावडींतून सुटून तूं माझ्या पदरीं पडलीस याबद्दल मी तुझें अभिनंदन करतों. आमचा सहवास तुला आनंदकारक व मंगल-दायक होवो ! इथे रहायला तुझी खुषी आहेना ? तूं उत्तर देत नाहींस तथापि खालीं मान घालून हंसते आहेस; यावरून तुझी मर्जी प्रसन्न आहे हें स्पष्ट होतें. ती तुझी मर्जी अधिक प्रसन्न होण्यासाठीं तुझी आणि तुझ्या सखीची गांठ घालून देतों. कलावती, ( कलावती येते. ) ही मोहिनी तुझ्या सोबतीकरितां मुद्दाम घरांत राहून घेतली आहे. हिला नीट जपत जा बरें ! जा घेऊन तिला घरांत.

**मोहिनीः**–( कलावतीच्या गळ्याला मिठी मारून ) अहाहा ! धन्य धन्य माझी प्राणप्रिया !

**कलावतीः**–( घाबरून ) अगबाई ! हा कुठचा मेला–

**मोहिनीः**–( हळू स्वरानें ) गप ! गप ! कोंकरूं ! कोंकरूं !

**गणकः**–कायग झालें कलावती ? ही प्राणप्रिया कुणाला म्हणते ? हिची धन्य धन्य होणारी प्राणप्रिया कोण ? आणि तूं हा कुठचा मेला असें कायसेंसें बोललीस त्याचा ग काय अर्थ ?

**कलावतीः**–तसें नव्हे बाबा, या मोहिनीला नवऱ्याचें वेड लागलें आहे. ही मलाच प्राणप्रिया म्हणून हांक मारायला लागली आणि धन्य धन्य माझी असें स्वतःचेंच वर्णन करूं लागली ! तेव्हां मीं हिला म्हटलें, अग बाई, हा कुठचा मेला वेडगळ छंद तुला लागला आहे ?

**गणकः**–एवढेंच ना ? मी अगदीं गडबडून गेलों ! म्हटलें इतक्यांत झालें तरी काय ?

**मोहिनीः**–( गणकास ) ही मला नवरा म्हणते. मी हिला बायको म्हणेन ! मी बरी सोडीन !

**गणकः**–अरेरे ! नवऱ्याचा ध्यास लागल्यामुळें हिचें मन अगदीं बहकून गेलें ! काय करील बिचारी ! कलावती, जा तिला घेऊन. जा. चार गोष्टी बोलून तिचें समाधान कर. तुझा नवरा जवळच आहे आणि तो तुला लवकरच मिळेल अशी तिची समजूत घाल. तिची मर्जी काडीमात्र मोडूं नकोस हो ! जा. ( मोहिनी व कलावती जातात. ) हा घटखर्पर बडा लफंग्या दिसतो. गुलामानें कुणाची तरी मुलगी पळवून आणली आणि सरकारचे शिपाई पाठीस लागले तेव्हां तिला माझ्या घरांत सोडून पळून गेला ! हजार रुपये दिले आणि मुलासाठीं नवरी आणली वगैरे सारी झूट बात आहे ! मिळून काय, ग्रहांनीं कुठून कशी कां होईना, पण मला बायको आणून दिली खरी ! आतां शुभमंगल सावधान व्हायचें तेवढेंच राहिलें. तेंही लवकरच उरकून टाकतों.

( जातो. )

---

## प्रवेश पांचवा.

( वेत्रवती येते. )

**वेत्रवतीः**–

### पद २१.

चाल–गजल.

हा काल मेघ गरजे । समशेर घोर परजे ॥ ध्रु० ॥
बिजली नभांत तळपे । करिसी कशास गमजे ॥ १ ॥
खळ पापराशि जे जे । त्यां धुंडिते स्वतेजें ॥ २ ॥
बिजली शिरीं कडाडे । तुज मारणार उमजें ॥ ३ ॥

( जाते. )

---

## प्रवेश सहावा.

स्थळः—जंगल-हिरासिंगाची छावणी.

( हिरासिंग, दिवाणजी व चौघे दरबारी बसले आहेत. अंतरावर हुजऱ्या उभा आहे. )

हिरासिंगः—

### पद २२

( राग-मिय्याचा मल्हार ताल त्रिवट. )

मानिते वसुंधरा । पति भय हरिता । जन-हिता करिता ॥ध्रु०॥
क्लेश-लेश मज होय असह्यसा । बहुविध भोग मना सुखावा ।
भोग-सुखा जो अंतरवी । राज्यभार मज न सहे भलता ॥

दिवाणजीः—कुमार, बंदिवान राजे लक्ष्मणसिंग यांना माणिकदुर्गावर नेऊन पोंचतें केलें, आणि तिथल्या बंदिखान्यांत त्यांची स्थापना झालेली डोळ्यांनीं पाहून आलों.

हिरासिंगः—ज्ञानमंडपांत जाऊन बसले एकदांचे ! चांगलें झालें ! केवढा त्यांचा तो ताठा ! काय ती घमेंड ! किती तो चढेलपणाचा तोरा ! आतां तें सगळें मावळून जाईल आणि आम्हांशीं कसें वागायचें तें त्यांना शिकवायला कैदखान्याच्या भिंतीच बोलक्या होतील ! बस्स ! कांहो दरबारी ? एक महिन्याची मोहीम आणि त्यांत किती किती कामांचा निकाल करून टाकला पहा ! शत्रूच्या मुलखावर स्वारी केली, त्याच्याशीं लढाई केली, त्याला कैद करून बाबासाहेबांकडे पाठवून दिलें आणि पुन्हां मौजा मारायला मोकळे ते मोकळेच ! कां हो बोलाना ? तुम्हांला काय वाटतें ?

प० दरबारीः—हें काय विचारावें कुमार ! युद्धाच्या कार्यांत असली तडफ आपल्या तर बुवा कुठे पहाण्यांत नाहीं !

दु० दरबारीः—कुमार, आपल्या प्रतापाचा लखलखाट पाहून जग दिपून गेलें आहे दिपून ! त्याचा महिमा आम्ही पामरांनीं काय वर्णायचा आहे !

ति० दरबारीः—खरोखर सांगतों, आपल्या भालपट्टिकेवर दिग्विजय लिहिलेला मला स्पष्ट दिसतो !

च० दरबारीः—जें एखाद्या नामांकित सेनापतीला बारा वर्षांत सुद्धां व्हायचें नाहीं तें काम आपण एक महिन्यांत करून दाखवलें, तेव्हां निदान एक वर्षभर तरी चैनीनें दिवस घालवण्याचा आपणाला निर्विवाद हक्क मिळाला आहे !

हिरासिंगः—मी म्हणतों एक वर्ष राहिलें; पण एक महिना तर खरा ! बस्स. ठरलें ! आतां आपण एक महिनाभर या डोंगरगडच्या रानांत स्वच्छंदानें शिकार करणार.

दिवाणजीः—कुमार, वाटेनें येतां येतां आपण फौजेला निरोप दिल्याचें वर्तमान मला कळलें, आणि इथे येऊन पहातों तों खरेंच ! बरें, ही गोष्ट महाराजांना कळवून करावी तेंही आपण केलें नाहीं !

हिरासिंगः—कळवूं सावकाश ! फौजेचें काम संपलें, तिला निरोप दिला ! हें बाबासाहेबांना अंमळ उशीरानें कळलें तरी काय बिघडतें आहे ?

दिवाणजीः—छे छे, या कामांत फार घाई झाली. मोठी चूक होऊन [illegible] आपण आतां होईल तितक्या जलदीनें पुन्हा फौज गोळा केली [illegible], आणि हा शिकारीचा नाद सोडून लढाईच्या तयारीला लागलेंच प[illegible].

हिरासिंगः—तें कां बुवा ? राजा लक्ष्मणसिंग कैदेंतून पळून गेला आणि पुन्हा आम्हाशीं झूज घ्यायला तयार झाला असें तर नाहींना घडलें ?

दिवाणजीः—नाहीं. तसा कांहीं प्रकार घडलेला नाहीं. पण लक्ष्मणसिंगाची राणी पद्मावती सैन्याची तयारी करून आम्हांवर चालून येण्याच्या उद्देशानें निघाली आहे अशी दाट बातमी पसरली आहे.

हिरासिंगः—( बावरल्याचा आविर्भाव दाखवून ) अरे बापरे ! केवढी हो भयंकर बातमी सांगतां ही ! आपण तर अगदीं घाबरून गेलों बुवा ! काय सांगतां दिवाणजी ! राणी लढाईला येणार त्यासाठीं म्हणे मी शिकार बंद ठेवायला पाहिजे ?

प० दरबारी:—अहो दिवाणजी, जी बातमी नवीन म्हणून तुम्ही सांगतां ती कुमारांच्या कानावर यापूर्वींच आली आहे.

दिवाणजी:—तसें असेल तर ही उपेक्षा फारच घातुक आहे असें म्हटलें पाहिजे.

हिरासिंग:—आतां आम्ही राणीशीं लढायला कंबर बांधली पाहिजे म्हणतां? हो हो हो हो! (हंसतो.) कुणीकडे सेनापति हिरासिंग आणि कुणीकडे लक्ष्मणसिंगाची राणी!

प० दरबारी:—कुणीकडे इंद्राचा ऐरावत आणि कुणीकडे शामभटाची तटाणी!

दु० दरबारी:—कुमार, दिवाणजींना राणीच्या लढाईचें भय वाटतें तें उगीच नाहीं! तिला लढाऊपणाचा बाणा मिरवण्याची हौस आहे हें तिच्या रणजोडव्यांवरूनच नाहीं का समजत?

ति० दरबारी:—दिवाणजी उगीच नाहीं घाबरायचे! कुमारांच्या सैन्याचा एकच गोट असतो आणि तेवढ्याचीच सत्ता त्यांच्या हातांत असते. पण राणीच्या हातांत चार गोटांची सत्ता! यावरून ती कुमारांपेक्षां चौपट लढाऊ कशी नाहीं ठरणार!

च० दरबारी:—ती चौपट लढाऊ आहे हेंच खरें! कारण कुमारांना बंदूक पेटवायची तर त्यांच्या हातांत एकच तोडा शिलकावलेला असतो. आणि तिकडे पद्मावतीकडे पहावें तर तिचे चार तोडे झळकत असतात! दोन हातांत दोन आणि शिवाय दोन पायांत दोन!

प० दरबारी:—फौज चालली असतां डाव्या उजव्या बाजूनें शत्रूचा मारा होईल म्हणून कुमारांना बंदोबस्तानें त्या बाजू बंद कराव्या लागतात. पण राणीच्या पराक्रमाची शिताफी काय वर्णावी? तिनें नुसता दंड उचलला कीं बाजूबंद दृष्टीला पडणारच!

दिवाणजी:—(तुच्छतेनें स्वगत) अहाहा! काय पण अलंकारांवर अलंकार चालले आहेत! एकाहून एक शहाणे आहेत म्हणावें नी दुसरें काय?

दु० दरबारी:—आणि दिवाणजी, राणीला सैन्यांत पैशाची तूट पडायचें कधींच कारण नाहीं! आमच्या लष्कराबरोबर खजिन्याच्या

पेट्या भरून गाडे चालवावे लागतात. आणि राणी तर लाखों रुपयांच्या पेट्या गळ्यांतच बांधून हिंडत असते !

**हिरासिंगः**—अहो दरबारी ! तुम्ही इतकें सारें बोललांत खरें, पण पद्मावतीच्या लढाईचा भयंकरपणा दिवाणजींना वाटतो आहे त्याचें कारण निराळेंच आहे. इतर शिपायांप्रमाणें तिच्याही कमरेला पट्टा असतोच, आणि शिवाय ती गजगतीनें चालणारी ! हत्तीची मजल दिवसांतून चाळीस कोस ! केव्हां येऊन छापा घालील आणि कत्तल करील याचा नेमच नाहीं ! पण कायहो दिवाणजी, राणी युद्धाला उभी रहाणार तेव्हां तिचा आणि तिच्या शिपायांचा वेष कोणता? पुरुषांचा कीं बायकांचा ? मला वाटतें कीं ती स्वाभिमानी बायको आहे. सेनापतीचें काम पुरुषांचें असलें तरी ती आपला स्त्रीवेष नाहीं टाकायची. उलट ती आपल्या सरदार शिपायांनाच लुगडीं नेसवून लढाईला आणणार असेल !

**दिवाणजीः**—हा थट्टेचा विषय नसतां याची थट्टा होते आहे हें फार वाईट आहे. याचा परिणाम भयंकर होईल. कुमार, मी खरोखरच बजावून सांगतों कीं आपण या क्षणापासून युद्धाच्या तरतुदीला लागलेंच पाहिजे.

**हिरासिंगः**—काय राव गोष्टी सांगतां आहां ! दिवाणजी, तुमच्या ऐन उमेदींतसुद्धां वीरश्री तुम्हांजवळ फारशी रहात नव्हतीच. पण आतां म्हातारे झालांत तेव्हां तिनें तुम्हाला अगदीं काडीच मोडून दिली वाटतें !

**दिवाणजीः**—माझें बोलणें आपणाला कडू लागतें आणि त्याची थट्टा करावीसें वाटतें ! उपाय नाहीं. हा देह आपल्या अन्नाचा आहे, त्याअर्थी सावधपणाचा घोष आपल्या कल्याणासाठीं आपल्या कानाशीं चालू ठेवणें हें या देहाचें कर्तव्य आहे.

**हिरासिंगः**—पुरे बुवा आतां ! तुमच्या कर्णकठोर घोषानें आमच्या कानाला दुखणें आलें. एखाद्या सुंदर कलावंतिणीच्या गळ्यांतून निघालेल्या चार गोड गोड लकेऱ्या हेंच या दुखण्यावरचें औषध ! पण तें यावेळीं इथे कुठचें मिळायला ! वारांगनेचें गायन ही अवर्णनीय आल्हाद देणारी काय अजब चीज आहे ! वाहवा !

## पद २३

(राग–जिल्हा. ताल दादरा)

**वारांगना रतिगानें। दे वंशीरवा प्रमोदा ॥ ध्रु० ॥**
**भुलविति सूर। मधुर अनुरागें। करिति रसिक मन बावरें॥**

(एक सरदार प्रवेश करितो.)

**सरदार:**–( मुजरा करून ) सरकार ! आज छबिन्याला हिंडत असतां गोटाच्या हद्दींत बिगरपरवाना हिंडणारी एक कलावंतीण सांपडली. तिचें नांव बिजलीजान. तिच्याबरोबर तिचा ताफा आहे त्यांत आणखी कलावंतिणी व त्यांचे साजिंदे वगैरे पुष्कळ लोक आहेत. आपण कामरूप देशाहून आलों आणि नाथद्वारीं जाणार असें ती सांगते. तिला तिच्या सर्व लोकांसह पकडून आणलें आहे. हुकूम होईल तर हुजूरच्या सेवेला सादर करीन.

**हिरासिंग:**–वाहवा ! कलावंतिणीची वर्दी फार योग्य वेळेवर आणलीत ! तीच गोष्ट आम्हांला यावेळीं पाहिजे होती. आम्हांला त्या कलावंतिणीची हजेरी जरूर घ्यायची आहे. घेऊन या तिला आंत. पण हें पहा, मूर्खांचे कान पिळवटल्याप्रमाणें हे गुणी लोक गाणें सुरू करतांना तंबुऱ्याच्या खुंट्या पिळवटीत असतात आणि दक्षिणेसाठीं पुढें घुसणाऱ्या उतावीळ आगंतुकाच्या तोंडावर चापट्या माराव्या त्याप्रमाणें तबल्याच्या तोंडावर थापट्या मारीत असतात. त्यामुळें वेळ फार जातो आणि त्रास होतो. याकरतां त्या बिजलीजानकडून तंबुरा, तबला, सारंगी, वगैरे सर्व साज तयार करवून मग तिला इथें आणून सोडा. क्षणाचाही विलंब आम्हाला सोसणार नाहीं. ती आल्याबरोबर गाणें सुरू झालें पाहिजे.

**सरदार:**–सरकारचा हुकूम व्हावा आणि मागून नोकरानें त्याची बजावणी करावी, यांत नोकराच्या धूर्ततेची शिताफी ती काय राहिली ? असा आपला हुकूम होईल हें ओळखून आगाऊच सर्व तयारी ठेवली आहे.

**हिरासिंग:**–तर मग येऊं द्या तिला लवकर !

( सरदार जातो व बिजलीजान प्रवेश करिते. तिच्या बरोबर दुसऱ्या कलावंतिणी, सारंगे व तबलजी येतात. बिजलीजान हिरासिंगास मुजरा करते व हात जोडून उभी रहाते. )

**बिजलीजानः**—मै बंदी सरकारके खिदमतमे दिलोजानसे हाजिर हूं. इरशादकी उमेदवार हूं. हुकूम फर्माईये.

**हिरासिंगः**—बिजलीजान ! मेरे कान तेरा सुरेला दिलरुबा गाना सुननेके लिये निहायत अर्जुमंद है. और तेरा नृत्य देखनेको मेरी आंखें इंतिजार है. नृत्यगायन करके हमारा दिल खुष करो.

**बिजलीजानः**—हां जी हुजूर ! ( सारंगे व तबलजी यांस खूण करते. ते वाद्यें सुरू करूं लागतात. )

**दिवाणजीः**—कुमार, पद्मावती राणीशीं युद्धप्रसंग होण्याचा समय प्राप्त झाला असतां तो विचार बाजूस ठेवून आपण या कलावंतिणीच्या गाण्यांत गुंग होऊन जावें हें मला आवडत नाहीं व पहावत नाहीं !

**हिरासिंगः**—( त्रासून ) काय हा म्हातारा खोकड भलत्याच वेळीं पद्मावतीच्या लढाईची बढाई मारीत सुटला आहे! तुझी पद्मावती लढायला येऊं दे, कीं रडायला येऊं दे, त्यान काय व्हायचें आहे? आमच्या वाड्यांत पांचशेंसाठ बटकी आहेत त्या पांचशें एकसष्ट होतील! आणखी काय होणार आहे? या सुंदर अप्सरेचें गाणें तुला मानवत नसेल तर चालता हो. हो चालता ! जा. (दिवाणजीस घालवून देतो.) हां. बिजलीजान ! शुरूमेनाच होने दो.

**बिजलीजानः**—( स्वगत ) हे मायावतारी परमात्मन् ! प्राणनाथांच्या मुक्ततेकरितां मला लाचारीमुळें इथे जें जें करावें लागतें आहे तें तें तुझ्याच चरणीं अर्पण असो !

( नाचते व हावभाव करते. )

**हिरासिंगः**—वाहवा ! बहोत खूब ! ये तेरा नाच देखकर मेरा दिल बहुती खूष हवा ! अब एक ठुंबरी सुना दो. मगर देखो बिजलीजान ! मेरे नजरमे ऐसा आता है के तूं खुले दिलसे आदा नखरा नही करती. येह अच्छा नही.

**बिजली०**:—परवरदिगार ! इस मजलिसमे आदा करने को दिलमे शरम पैदा होती है.

**हिरासिंग**:—हां. ऐसा ? तो मैं इन लोगोंको निकलवा देतां हूं. दरबारी लोक ! चला. चालते व्हा इथून. हा हुजऱ्या मात्र माझ्याजवळ राहूं दे. ( दरबारी जातात. )

**बिजली०**:—

**ठुंबरी.**

**छाडो छाडो बिहारि नार देखे सगरी ॥ ध्रु० ॥**
**ना मै बोली ना मै चाली अब नाहक नाहक रार करे रे ॥ १ ॥**
**मै जल जमुना भरन गयी सखि । रिपट झिपट छिनि मोरि घगरिया ॥ २ ॥**

**हिरासिंग**:— वाहवा ! वाहवा ! बहोतही मजा किया ! क्या तेरी तारीफ कहूं ? तूने मुझे बेदामू मोल लिया !

**बिजली०**:—हुजूर ! फिलहालका नाच जैसा ब्रिजनाचमे गोप और गोपी मिलके करते है उसमोजिब करनेका है. नाच बहोत बहारीका है. यहांपर गोपी तो है, मगर गोप बाहेर रहे गये. उनको अंदर बुलवानेकी परवानगी चाहती हूं.

**हिरासिंग**:—कुच हरकत नही. तेरे सब साथीदार आनेदे. मगर नाच उमदा होने चाहिये. ( नाचणारे पुरुष व त्यांच्याबरोबर आणखी सारंगे व तबलजी येतात. )

**हुजऱ्या**:—( एका सारंग्याजवळ जाऊन ) अरे, इथे इतके तबलजी आणि सारंगे कशाला आलांत रे ?

**सारंग्या**:—तुला काय कळतें आहे गांवढळा ! सूरभरणा नको का व्हायला ?

**हुजऱ्या**:—( चरफडत ) हा काय सूरभरणा म्हणायचा कीं असुरभरणा ! ( हिरासिंगास ) सरकार, या गुणी बाळांची फार गर्दी झाली इथे ! कांहीं लोकांना काढून लावूं का ?

**हिरासिंग**:—गप्प बैस बैला ! हां. बिजलीजान ! चलना दो !

( बिजलीजान व तिचे सर्व लोक गातां गातां व नाचतां नाचतां हिरासिंगाजवळ येऊं लागतात. तोफांचे बार होतात. दिवाणजी घाबऱ्या घाबऱ्या ओरडत प्रवेश करितो. )

**दिवाणजी**:—कुमार ! कुमार ! उठा. उठा लवकर ! पळा आणि आपला जीव वांचवा !

**हिरासिंग**:—( त्रासून ) हे दुर्लक्षणी घुबडा ! आज तूं असा माझा पिच्छा कां पुरवला आहेस ?

**दिवाणजी**:—अहो शिव्या द्यायच्या त्या सावकाश द्या ! आधीं पळा आणि जीव जगवा ! पद्मावतीच्या फौजेनें येऊन गोटावर छापा घातला आणि कत्तल करून चोहोंकडें दाणादाण केली ! ( पडद्यांत गलबला होतो. ) ऐका. ऐका ही ओरड. ही पद्मावती राणी तुम्हांला पकडायला आलीच समजा ! पळा !

**हिरासिंग**:—( अतिशय घाबरून उठतो. ) कुठे आहे ? कुठे आहे पद्मावती ?

( कलावंतिणीचा वेष टाकून पद्मावती प्रकट होते. तिचे लोकही आपापले वेष टाकून प्रकट होतात. )

**पद्मावती**:—ही ही पहा पद्मावती ! तुझी पांचशें एकसष्ठावी बटीक ! सरदार हो, बांधा या हिरासिंगाच्या आणि त्याच्या नोकरांच्या मुसक्या ! ( ठाकूर रामसिंग येतो. )

**रामसिंग**:—देवी पद्मावती, शत्रूचा सर्व गोट लुटून फस्त केला. ज्यांनीं हत्यार उपसलें त्यांची कत्तल केली आणि ज्यांनीं दांतीं तृण धरलें त्यांना गिरफदार करून ठेवलें आहे. पुढें काय हुकूम ?

**पद्मावती**:—वाहवा ! वाहवा ठाकूरजी ! तुम्ही पराक्रमाची शर्त करून दाखवलीत ! या हिरासिंगाला धरल्याची बातमी याच्या बापाला कळण्यापूर्वींच त्याच्या राजधानीला आपला शह बसविला पाहिजे, याकरतां तुम्ही आपल्या फौजेनिशीं अतित्वरेनें जाऊन तें काम आधीं करा. त्या राजधानीला चोहोंकडून ताण बसवा. रस्ते रोखा. आंत बाहेर माणूस फिरकायचें बंद करा. बाहेरून अन्नसामग्री, बातमी, निरोप, चिठीचपाटी वगैरे कांहीं एक

आंत पोंचूं नये असा बंदोबस्त ठेवा. इतकें तुम्ही करतां तों बाकीचें सैन्य घेऊन मी मागोमाग येतेंच आहें. जा.

**रामसिंगः**—फार उत्तम आहे. आज्ञेप्रमाणें आतांच फौजेची मजल चालू करतों. ( जातो. )

**हिरासिंगः**—पद्मावती देवी ! तूं राजकन्या व राजपत्नी असतां हलकट नर्तकीचा वेष घेऊन माझ्यापर्यंत प्रवेश केलास आणि मला कैद केलेंस, हें कुलस्त्रीच्या शालीनतेला शोभतें का ?

**पद्मावतीः**—आणि तूं महाराजांना शरण येऊन त्यांच्यापुढें लोटांगणें घातलींस, आणि नीचा ! मेजवानीच्या निमित्तानें बोलावून नेऊन विश्वासघात केलास, आणि त्यांना कैद केलेंस; हें तरी तुझ्या कुलीनपणाला शोभतें का ? बावा ! आतां रडून काय उपयोग ? जसें करावें तसें भरावें ! मला तूं नर्तकी म्हणून जाणलेंस आणि माझ्या बरोबरच्या लोकांना साजिंदे आणि नाचे समजलास ! पण मूर्खा, हे सर्व लोक माझ्या केंसालाही धक्का लागला असतां प्राण द्यायला तयार असणारे तुझ्याच दर्जाचे कुलीन पराक्रमी सरदार आहेत! छाप्याच्या वेळीं तूं पळून जाशील याकरतां आम्ही सर्वांनीं ही शक्कल लढवून तुला आगाऊ घेरून ठेवलें आणि वेळ आली तेव्हां कैद केलें ! यांत आम्ही कांहीं अन्याय केला असें तुला तरी म्हणतां येणार नाहीं. कारण ‘ शठंप्रति शाठ्यं ’ हें लोकमान्यांचें वचन प्रसिद्धच आहे. सरदार हो, चला या लोकांना घेऊन !

**विद्याधरः**—( हुजऱ्यास धक्का मारून) चल रे चोरा ! शठंप्रति लाठ्यं ! ( सारंगीचा गज त्याच्या पाठीवर मारतो. )

(पडदा पडतो.)

---

**अंक दुसरा समाप्त.**

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—माणिकदुर्ग. बंदीखाना.

( रुप्याची बिडी घातलेला लक्ष्मणसिंग विचार करीत उभा आहे. )

**लक्ष्मणसिंगः**—या कारागृहवासापेक्षां मला शत्रूचा सहवासच अधिक कंटाळवाणा वाटतो. स्वतः भीमसिंग व त्याचीं माणसें इथे माझ्याजवळ सारखीं बसून जो उपद्रव देत असतात त्याला कांहीं सीमाच नाहीं! कोणी मला धीर देतो, कोणी भय दाखवतो, कोणी समजूत घालतो, अशा अनेकांच्या अनेक तऱ्हा! खुद्द भीमसिंगाची तऱ्हा सर्वांहून वेगळी! त्याच्या तुणतुण्याचा आपला एकच सूर कीं माझा वरिष्ठपणा कबूल करा! रोज रोज तेंच तेंच बोलणें ऐकून जीव अगदीं कंटाळून गेला बुवा! आज आणखी भीमसिंग येऊन काय त्रास देणार आहे देव जाणे. ( दुर्गावती येते. ) हें काय आश्चर्य? नागाच्या भयंकर दर्शनाऐवजीं हें नागकन्येचें रमणीय दर्शन! ही सात्विक शांत वृत्तीची सुंदर कुमारी इथे कोणत्या हेतूनें आली असेल बरें! ( उघड ) आर्ये, तूं वाट चुकून भलत्याच ठिकाणीं आलीस असें वाटतें.

**दुर्गावतीः**—ठिकाण भलतेंच असलें तरी भल्याचा सहवास नेहमीं निर्भय असतो हें जाणूनच मी आपल्या भेटीकरतां आलें आहें. आपल्या प्रत्यक्ष परिचयाचा लाभ मला झालेला नाहीं, तरी माझें नांव आपल्या परिचयांतलें आहे. मी भीमसिंग राजाची कन्या दुर्गावती.

**लक्ष्मणसिंगः**—देवी दुर्गावती? पद्मावतीची परमप्रिय सखी दुर्गावती? पद्मावती जिच्या अनेक सद्गुणांच्या आठवणी काढून स्वतःच्या आणि माझ्या मनाला रिझवीत असते ती महोदार वात्सल्यशील दुर्गावती?

**दुर्गावती**:—होय. तीच मी. मात्र माझ्या सामान्य नामाला आपण एवढालीं गुणवृद्धीचीं विशेषणें लावतां हें ठीक नाहीं. बाबासाहेबांनीं कांहीं महत्वाच्या कामाकरतां मला आपणाकडे धाडलें आहे.

**लक्ष्मणसिंग**:—बाबासाहेबांची खासा स्वारी स्वत: न येतां तुझ्याकडे सोंपवून भागण्याजोगें कार्य तरी कोणतें ? कार्य कोणतेंही असो, तूं पद्मावतीची सखी आहेस त्या अर्थी माझ्या स्नेहाला आणि आदराला पात्र आहेस. सांग तुझें काय काम असेल तें. तुझ्या बापानें माझ्या पायांत बिडी घातली तेव्हां मलाही माझ्या जिभेला बिडी घालावी लागली. परंतु तुझ्याशीं वागतांना ती जिभेची बिडी मी काढून टाकतों.

**दुर्गावती**:—आणि आपल्या पायांतली बिडी सुद्धां मी आजच काढून टाकावी म्हणतें. ही बिडी पहातांच माझें पित्त भडकलें आणि मला फार दु:ख झालें.

**लक्ष्मणसिंग**:—( उपरोधानें )असें म्हणूं नकोस. हा सुतकांतला शृंगार माझ्या अंगावर तुझ्या बापानें चढवलेला आहे. नीट निरखून पहा. बिडी रुप्याची आहे.

**दुर्गावती**:—रुप्याची बिडी ! या रुपेरी बिडींत कांहीं विलक्षण जादू आहे हें खरें आहे. कारण ती ज्याच्या पायांत अडकवावी तो देवाजवळ प्रार्थना करीत असतो कीं, देवा, जीवाचा आणि देहाचा वियोग होईपर्यंत देहाचा आणि या रुपेरी बिडीचा वियोग कधींही न होवो ! ही रुपेरी बिडी ज्याला लाभेल त्याचे पाय आंखडतात, हात पसरतात, मनाची धांव थांबते, जिभेची धांव लांबते, धनुर्वात झाल्याप्रमाणें अंग जागोजाग मोडत असतें, हिंवताप भरल्याप्रमाणें अंगांत कांपरें शिरतें, असे आणखी नानाप्रकारचे चमत्कार होतात. पण जो मनानें किंवा धनानें दरिद्री असेल त्याला या गोष्टी लागू आहेत. आपणासारखे स्वत:-सिद्ध ऐश्वर्यवान् आहेत त्यांच्या पायांत रुप्याची नव्हे, सोन्याची बिडी घातली तरी ती घालणाऱ्याचा उपहास झाल्याशिवाय कसा राहील ?

**लक्ष्मणसिंग**:-कदी राजांच्या राजेपणाचा बोज इतर भिकार कैद्यांत रहावा म्हणून ही रुप्याची बिडी माझ्या पायांत जखडलेली आहे, असें तुझ्या

बाबासाहेबांच्या सांगण्यावरून मला कळलें. तसें त्यांचें खरोखरीचें मत असेल तर ते दूरदर्शी आहेत असें म्हटलें पाहिजे.

**दुर्गावतीः**—तें कसें काय ?

**लक्ष्मणसिंगः**—माझ्या पायांतून निघाल्याबरोबर हीच बिडी आपल्या पायांत पडायची आहे हें भीमासिंगानीं ताडलें आहे, आणि आपल्या राजेपणाचा बोज राखण्याची तरतूद आगाऊच करून ठेवली आहे !

**दुर्गावतीः**—( डोळ्यांत आंसवें आणून ) महाराज, बाबासाहेबांविषयीं असले विचार आपण याउपर केव्हांही मनांत ठेवूं नयेत अशी प्रार्थना करण्याकरतांच मी आलें आहें.

**लक्ष्मणसिंगः**—जिथे शत्रुत्व आहे तिथे परस्परांच्या घातपाताचे असले हे विचार चालायचेच. ते मनांतून कसे काढतां येतील ?

**दुर्गावतीः**—पण असल्या दुर्विचारांचें जाळें माजवणाऱ्या शत्रुत्वाचें मूळच मुळीं उपटून टाकावें म्हणून बाबासाहेब आपणाला कैदेंतून सोडून देणार आहेत.

**लक्ष्मणसिंगः**—काय ? इतक्यांतच आम्हांला कंटाळले ? असें कां बरें ? दुर्गावती, मी एक प्रश्न विचारतों त्याचें प्रांजलपणानें उत्तर दे. इथे माणसें येतात जातात त्यांच्या भाषणांतून केव्हांतरी ध्वनि निघतात त्यांवरून आणि तुझ्या बापाच्या वर्तनांत थोडी चलबिचल दिसून येते त्यावरून मीं असा तर्क केला आहे कीं माझ्या सैन्यानें या राज्यावर स्वारी करून लढाई सुरू केली असावी. हा माझा तर्क खरा आहे काय?

**दुर्गावतीः**—होय. आपला तर्क अगदीं बरोबर आहे. रतनपूरचें सैन्य या राज्याचा संहार करीत इथून एक मजलीवर आलें आहे. आणि त्याची एक टोळी या किल्ल्याभोवतीं घिरट्या घालीत फिरत आहे.

**लक्ष्मणसिंगः**—इतकें सांगितलेंस त्यासारखी आणखी एका गोष्टीबद्दलची माझी उत्कंठा तृप्त कर. माझ्या फौजेंत सेनापतीच्या अधिकारावर आरूढ झालेल्या सरदारांचें नांव काय ?

**दुर्गा०ः**—(हसत) सरदाराचें नांव ? सरदाराचें नांव देवी पद्मावती !!! तिनेंच या मोहिमेची उठावणी करून सैन्याची तयारी केली आणि येथपर्यंत मजल मारली.

**लक्ष्मणसिंगः**—अरेरे ! जिचा मीं धिःकार आणि अव्हेर केला, ती गरीब बिचारी पद्मावती ! त्या करुणास्पद अबलेला माझी करुणा येऊन ती मला सोडवण्याकरतां धांवून आली ना ? एवढ्या माझ्या बलाढ्य राजमंडळांत अखेरीस ती एकटीच तेवढी माझ्या उपयोगीं पडली आं ? ( किंचित् थांबून ) या वेळीं माझ्या मनांत आनंद, अभिमान, करुणा, खेद, लज्जा या विकारांच्या लहरींनीं जो हलकल्लोळ माजवला आहे त्याचें वर्णन कोण करूं शकेल ? भवितव्यते ! जर पराक्रमाच्या बाबतींत तुला एका स्त्रीकडून माझी मान जमिनीपर्यंत वांकवावयाची होती, तर माझ्या शौर्याचा एवढा डंका पृथ्वीवर कशाला माजवला होतास ? पद्मावतीचा युद्धप्रसंग म्हणजे हा एक दैवनिर्मित विचित्र काव्यप्रसंग होय ! देवी दुर्गावती, जर तूं काव्यरसिका म्हणवीत असशील तर या प्रसंगाचा रस कोणता तो सांग बरें ? अथवा शास्त्रांत ज्याचें वर्णनच नाहीं तो तूं तरी काय सांगणार ? मला वाटतें हा वीरविरहित वीर म्हणून नवीनच रस मानला पाहिजे. कारण असल्या प्रसंगाचा दाखला जगाच्या इतिहासांत कुठेच सांपडायचा नाहीं.

**दुर्गावतीः**—नाहीं. तसें नाहीं. मी तर असें मानतें कीं, हा जुनाच एक प्रसंग भिन्नरूपानें पुन्हां व्यक्त होत आहे ! पूर्वीं नायकानें लंकेपर्यंत शत्रूचा पिच्छा पुरवून नायिकेला सोडवलें. हल्लीं नायिकेनं नायकाला सोडवण्याकरतां या राजधानीपर्यंत शत्रूचा पिच्छा पुरवला आहेच कीं नाहीं ? नायकनायिकांनीं आपापल्या जागा बदलल्यामुळें आरशांतल्या प्रतिबिंबाप्रमाणें हा ऐतिहासिक प्रसंग उलटा दिसतो, म्हणून काय झालें ? त्याचें पर्यवसान शत्रूचा राज्यनाश आणि कुलक्षय हें एकच असून तें निश्चयानें घडून येणार असें मला दिसतें आहे; आणि त्यामुळें माझा जीव रात्रंदिवस तळमळ करीत आहे. महाराज, सांप्रत चालू असलेल्या या अभिनव रामायणांत नायकनायिकांनीं ज्याप्रमाणें आपापल्या कामांची अदलाबदल केली, त्याप्रमाणें यांतल्या कथेचाही अनुक्रम उलटासुलटा कां होऊं नये ?

**लक्ष्मणसिंगः**—तूं काय म्हणतेस तें लक्षांत येत नाहीं.

**दुर्गावतीः**—मी असें म्हणतें कीं, युद्धकांडाच्या यातना आजपर्यंत झाल्या तितक्या पुरे झाल्या. आतां याची रचना इतकीच सोडून

स्नेह जोडणाऱ्या सुंदरकांडाची रचना आपण हातीं घ्यावी. बाबासाहेब आपणाला बिनशर्त सोडून देतात. आपणही त्यांचे व माझ्या बंधूचे अपराध बिनशर्त माफ करावे, आणि त्यांशीं स्नेहभाव धरावा.

**लक्ष्मणसिंगः**—तूं सांगतेस तें घडून येणें फार अवघड आहे. त्यांतून भीमसिंगानें क्षमेची याचना केली असती तर गोष्ट निराळी होती. पण तसेंही त्यानें केलेलें नाहीं.

**दुर्गावती:**—आणि आपण तरी मुक्ततेबद्दल कधीं याचना केली आहे ? मी म्हणतें, याचना कुणीच कुणाची करूं नये.

**लक्ष्मणसिंगः**—दुर्गावती, तुझें म्हणणें कबूल करणें या वेळीं सोपें आहे. पण त्याप्रमाणें वागण्याची वेळ येईल तेव्हां त्यांतल्या अडचणी पदोपदीं नडवूं लागतील.याकरतां हा आग्रह धरून मला संकटांत घालूं नकोस. शिवाय ज्या अर्थीं पद्मावतीनें या युद्धाचा भार प्रामुख्यानें उचलला आहे त्या अर्थीं तिला विचारल्याखेरीज मला कांहीं एक करतां येणार नाहीं.

**दुर्गावती:**—( स्वगत ) हे पद्मावतीची सबब मला कशाला सांगताहेत ! तिची मुद्रिका माझ्याजवळ आहे ती दाखवून यांचें तोंड बंद करूं काय ? छे ! नको पण ! वासवी शक्तीप्रमाणें या मुद्रिकेचा उपयोग एकदांच करायचा आहे. इतक्यांतच हें अमोघ अस्त्र हातचें गमावून बसावें हें योग्य नाहीं. हे इथून जातपर्यंत आणखी कोणता प्रसंग येतो कुणाला ठाऊक ? ( उघड ) महाराज, ज्या योगानें लक्षावधि लोकांच्या अश्रुधारा थांबणाऱ्या आहेत, अशा या विश्वकल्याणाच्या पुण्यकर्माला माझी पद्मावती कधींही नको म्हणणारी नव्हे. मग उगीच तिचें नांव कशाकरतां सांगतां ? सर्व मुखत्यारी आपणाकडे आहे. अपल्या धर्माला अनुसरून बापाचे आणि भावाचे अपराध माफ करण्याविषयीं आपली विनवणी करीत आहें तिचा अव्हेर करूं नका.

## पद २४

राग तोडी. ताल आडा चौताल.

**उपजो करुणा मनीं कोप उपशम संप्राप्त पावो ॥ ध्रु० ॥**
**क्लेश अशेष दुरावा जनता प्रमुदित तव यश मंगल गावो ॥**

**लक्ष्मणसिंगः**–(स्वगत ) ही म्हणते त्याप्रमाणें भीमसिंगाच्या हातून होणें नांहीं, जाणें नाहीं, कांहीं नाहीं ! मग उगीच हिच्या मनाचा हिरमोड तरी कशाला करावा ? ( उघड ) देवी दुर्गावती, काय करूं ? तुझी भीड मला मोडवत नाहीं. फक्त तुझ्यावर नजर देऊन मी तुझी प्रार्थना मान्य केली आहे.

**दुर्गावतीः**–( हर्षानें ) केली ? मोठे उपकार झाले. मी धन्य झालें. ( भीमसिंग व त्याचे नोकर व अमात्य येतात. ) हे बाबासाहेब आले. फार चांगलें झालें. बाबासाहेब, आपण लक्ष्मणसिंग महाराजांना बिनशर्त सोडून द्यावें, आणि त्यानीं आजपर्यंत झालेल्या सर्व गोष्टी विसरून आमच्या घराण्याशीं स्नेहानें वागावें, असें मीं ठरवलें आहे. हें आपणाला कबूल आहे ना ?

**भीमसिंगः**–मी जर त्याच कामाकरतां तुला यांच्याकडे पाठवलें तर मला कबूल आहे ना म्हणून काय विचारतेस ?

**दुर्गावतीः**–बाबासाहेब, यांच्या अब्रूला धक्का न पोंचतां आणि कशाही प्रकारें यांचा अपमान न करतां यांना आपण गौरवानें निरोप द्यायचा आहे.

**भीमसिंगः**–हें काय सांगायला पाहिजे ? तूं म्हणतेस तसेंच होईल. त्याची शंका नको.

**दुर्गावतीः**–( लक्ष्मणसिंगाकडे वळून ) कसें काय महाराज, आपलें काय म्हणणें ?

**लक्ष्मणसिंगः**–भीमसिंगानीं आपल्या बाजूचा करार पुरा केला तर माझ्या बाजूचा करार मी खचीत पूर्ण करीन. पण बोलल्याप्रमाणें भीमसिंग वागतील कशावरून ? त्याला कोणी तरी जामीन पाहिजे.

**भीमसिंगः**–आणि मी सख्य करायला कबूल झालों तर पद्मावती लढाई थांबवील हें तरी कशावरून ? त्यालाही कोणी तरी जामीन पाहिजेच ! कारण आतां उभयपक्षीं मैत्री झाली त्याअर्थीं लढाईचा उपसर्ग बंद झालाच पाहिजे.

**दुर्गावतीः**–पद्मावतीकरतां मी जामीन होतें.

**भीमसिंगः**—पद्मावतीबद्दल तुझी जामीनगत मला पटली. आणि माझ्या वर्तनाबद्दल जामीन मी तुलाच देतों. त्याखेरीज राजेसाहेबांची खात्री पटायची नाहीं.

**दुर्गावतीः**—बरें आहे. बाबासाहेब, तुम्ही आज्ञा करतां तर मी तुम्हा-करतां जामीन होतें.

**लक्ष्मणसिंगः**—भीमसिंगांबद्दल तूं जामीन होतेस त्याला मी हरकत घेऊं इच्छीत नाहीं.

**दुर्गावतीः**—( हर्षानें भीमसिंगास ) तर तोडा यांची बिडी ! या क्षणीं तोडा ! यांना कैद केलें त्यावेळीं यांच्या अंगावर पोषाख जवाहीर हत्यार पात्यार काय होतें तें यांचें यांच्या हवालीं आत्तांच करा. यांच्या परि-वारापैकीं जे मानकरी वगैरे लोक अटकेंत आहेत त्यांना मोकळे करून यांच्याकडे पाठवून द्या.

**भीमसिंगः**—परिवारापैकीं लोक कैदेंत असतील त्यांना सोडून देतों आणि यांच्याकडे पाठवतों. बाकी गोष्टी तुझ्या माझ्या समक्षच करवतों. त्याला कितीसा उशीर ? ( नोकरांस खूण करतो. ते लक्ष्मणसिंगाची बिडी काढतात. आणि त्यास पोषाख तरवार वगैरे आणून देतात. ) दुर्गावती, लक्ष्मण-सिंगराजे बंदिवान होते ते आतां आमचे पाहुणे झाले. त्यांची आमची मैत्री झाली हें सर्व लोकांना जाहीर करण्याकरितां आठ दिवसांनीं एक दरबार भरवूं आणि समारंभानें त्यांना मार्गस्थ करूं.

**दुर्गावतीः**—आतां आणखी आठ दिवसांचा खोळंबा कशाकरतां ?

**भीमसिंगः**—खोळंब्याचें वास्तविक कारण कांहींच नाहीं. पण तुझा भाऊ इथे हजर नाहीं. त्याच्या येण्याकरितां हा खोळंबा. हे राजेसाहेब आणि कुमार हिरासिंग एकदां प्रेमानें भेटलेले मीं पाहिले म्हणजे निश्चिंत झालों ! तितक्या मुदतींत हिरासिंग आला नाहीं तर राजेसाहेबांना तसाच निरोप देणें भागच आहे. हें झालें माझ्या बाजूचें. आतां पद्मावतीला तूं जामीन राहिली आहेस त्यापक्षीं युद्धाचें कोणतेंही कृत्य याउप्पर तिच्या हातून होऊं नये हा बंदोबस्त करणें तुझें काम आहे. तर तूं तिला तसें पत्र लिही. आणि त्यांत असाही मजकूर आण कीं, लक्ष्मणसिंगराजे

मोकळे झाले आहेत. त्यांना इथून आठ दिवसांनीं रवाना करण्यांत येईल. तुला पुढें येण्याचें कारण राहिलें नाहीं. पत्र पावतां क्षणीं तूं आपलें सैन्य घेऊन स्वदेशाला निघून जा.

**दुर्गावती**:—बरें आहे. मी पद्मावतीला तसें पत्र आतांच लिहून पाठवतें.

**भीमसिंग**:— अमात्य, या राजेसाहेबांच्या इतमामाला साजेल अशी यांच्या बिऱ्हाडाची सोय लावली पाहिजे. तर त्याची तरतूद करूं या. चला. ( भीमसिंग, अमात्य व नोकर जातात. )

**लक्ष्मणसिंग**:—दुर्गावती देवी! आम्हांशीं स्नेह जोडण्याची मूळ प्रवृत्ति भीमसिंगाची नसून तुझी आहे. या कार्याला तूं आतुर होतीस तरी आजपर्यंत तुझें कांहीं चाललें नाहीं. आज बापानें सांगितलें तेव्हां तीच पडत्या फळाची आज्ञा घेऊन तूं माझ्याकडे धांवत आलीस असें उघड उघड दिसतें आहे. खरें ना हें ?

**दुर्गावती**:—( लाजून ) विचारतां तर चोरून कशाला ठेवूं ? आपण म्हणतां हें सर्व खरें आहे. आणि आपल्या भेटीला येण्याची मला बुद्धि सुचली ही मोठी सुदैवाची गोष्ट मी समजतें.

## पद २५

राग कानडी. ताल त्रिवट.

**मजला भला । सुखलाभ झाला ।**
**शम लाभला । स्वकुला विशाला ॥ ध्रु० ॥**
**फल-काल आला । मम वासनेला ।**
**चरितोज्वला । यश हें तुम्हांला ॥**

**लक्ष्मणसिंग**:—पुढें मागें तुझें मन एकदम खट्टू होऊं नये म्हणून तुला आगाऊच सूचना देऊन ठेवतों कीं करारप्रमाणें वागायचें म्हणजे मला सोडून द्यायचें तुझ्या बापाच्या मनांत मुळींच नाहीं !

**दुर्गावती**:—( आश्चर्यानें ) मुळींच नाहीं !!! आणि त्यांनीं आपल्या संकटांचें वर्णन किती हृदयद्रावक केलें ! आणि तुझ्या मध्यस्थीवांचून मला तरणोपाय नाहीं म्हणून किती किती अगत्यानें सांगितलें !

**लक्ष्मणसिंगः**—तो लबाडीचा कारभार ! सारा कपटाचा दुष्ट खेळ !

**दुर्गावतीः**—आणि त्यानीं मला जामीन दिलें कीं !

**लक्ष्मणसिंगः**—हे कारस्थानी म्हणवणारे लोक एखादा क्षुल्लक हेतु साधण्याकरतां आपले आईबापसुद्धां बाजारांत विकायला मांडतील. मग पोटचें पोर जामीनगतीला देऊन आपला कावा साधून घेतील हें सांगायला पाहिजे कशाला ? पद्मावतीचें प्रेम व माझें कल्याण जर तुला इष्ट असेल तर बापानें सांगितल्याप्रमाणें पद्मावतीला पत्र लिहूं नको.

**दुर्गावतीः**—तर तिला कसें पत्र लिहूं ?

**लक्ष्मणसिंगः**—असें लिहून पाठव कीं, लढाई तहकूब ठेऊन आठ दिवस वाट पहा. त्यानंतर तूं बेधडक माणिकदुर्गावर चालून ये. मी सुटलों तर ठरल्याप्रमाणें मैत्री होतेच आहे. तसें घडलें नाहीं तर भीमसिंगाचा समाचार तिला तत्काळ घेतां येईल.

**दुर्गावतीः**—बरें आहे. तिला तसेंच लिहितें. मात्र एकच गोष्ट सांगून ठेवतें कीं, बाबासाहेबांच्या मनांतून जरी माझ्या जामीनगतीचा पोरखेळ करायचा असला तरी मी त्यांना तसें करूं देणार नाहीं; आणि कराराप्रमाणें त्यांना अक्षरशः वागवल्याशिवाय सोडणार नाहीं.

( जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—माणिकदुर्ग. राजवाडा.

( भीमसिंग व अमात्य येतात. )

**भीमसिंगः**—आतां कसें काय अमात्य ? पद्मावतीनें केवढें मोठें लढाईचें काहूर माजवलें होतें ! पण तिनें लढाई बंद करून निमूटपणें आपल्या देशाला निघून जावें अशी मी बसल्या बसल्या छान शक्कल काढली कीं नाहीं?

**अमात्यः**—होय महाराज. पद्मावतीचें आर्जव करायला लागलें नाहीं. एक पैसा खर्च पडला नाहीं,आणि सारें काम देवी दुर्गावतीच्या मध्यस्थीवरच उरकलें.

**भीमसिंगः**—अहो कसली मध्यस्थी आणि कसलें काय घेऊन बसलांत? ती दुधखुळी पोरटी तह करा, तह करा, म्हणून एकसारखी टकळी लावून बसली होती. तिची हौस मला एकदां पुरवायची होती ती पुरवली आणि त्यांतच हें आपलें काम साधून घेतलें. बाकी बोलल्याप्रमाणें आपल्याला थोडेंच वागायचें आहे! बुद्धिबळाच्या डावांत प्यादें पुढें सारून राजावर मात करतात. पण मी जो हा बुद्धिबळाचा डाव खेळलों त्यांत माझें दुर्गावतीचें प्यादें पुढें सारून मी नुसती राजावरच काय, पण राणीवरसुद्धां मात केली आहे! याला म्हणावें कारस्थान! मुलीची हौस पुरवली, राजाला चकवलें आणि राणीला ठकवलें; असा हा तिरंगी सामना मीं एकदम एकाच डावांत जिंकला आहे!

**अमात्यः**—हें सर्व खरें आहे. पण एवढ्यानें लढाईबद्दलचें माझ्या पोटांतलें भय अद्यापि जात नाहीं, त्यामुळें एक शंका विचारावीशी वाटते.

**भीमसिंगः**—विचारा. विचारा. तुमच्या जेवढ्या शंका असतील तेवढ्या विचारून घ्या, म्हणजे तुमच्या मनाचें समाधान होईल आणि तुम्ही निर्धास्त व्हाल! माझी कारस्थानी अशी लेचीपेची नाहीं. सर्व भयें पाहून ठेवून त्यांच्या निराकरणाची तजवीज मीं आगाऊच केलेली आहे असें पक्कें समजा. काय म्हणतां तुम्ही?

**अमात्यः**—मी असें म्हणतों कीं, दुर्गावतीदेवीच्या मध्यस्थीचा विश्वास पद्मावतीला पटला नाहीं आणि तिनें स्वदेशाला परत जाण्याचें नाकारलें तर पुढें कसें?

**भीमसिंगः**—असें सहसा घडणार नाहीं. कारण त्या दोघींचा स्नेह किती अकृत्रिम व गाढ आहे तो मला चांगला माहीत आहे; आणि म्हणूनच माझें कारस्थान सिद्ध करण्याकरितां मीं त्या स्नेहाचा उपयोग करून घेतला आहे. तथापि दुर्गावतीची मध्यस्थी फुकट गेली असेंही आपण समजलों तरी त्यानें काय नुकसान व्हायचें आहे? तुझ्या नवऱ्याला आठ दिवसांनीं सोडून देतों असें पद्मावतीला मीं आमिष दाखवलें आहे त्याअर्थीं तितके दिवस तरी ती लढाई बंद करीलच. त्या मुदतींत कुमार हिरासिंग राजधानीजवळ येऊन ठेपतोच आहे. कारण

आपण लवकर येऊन पोंचतों अशीं त्याचीं स्वदस्तुरचीं पत्रें वारंवार येत आहेत. आठ दिवसांत तरी तो येईलच कीं नाहीं ? तो येतांच पद्मावतीशीं लढाई करून तिच्या सैन्याचा विध्वंस करूं आणि तिलाही कैद करूं म्हणजे झालें.

**अमात्यः**—पण कुमार वेळेवर येऊन हजर झाले नाहींत आणि पद्मावती राजधानीवर चालून आली तर काय गत होईल ?

**भीमसिंगः**—माझ्या राजधानीवर चालून येण्याचें साहस ती कदापि करायची नाहीं. आणि यदाकदाचित् तिनें तसें केलेंच तरी तिला पळवून लावण्याचा माझ्याजवळ एक उत्तम उपाय आहे. तो मी तुम्हांला इतक्यांत सांगत नाहीं. तो उपाय निर्दयपणाचा असला तरी बिनतोड असल्यामुळें त्याचा उपयोग मी खचित करीन. त्याबद्दल अगदीं निर्धास्त रहा. झालें कीं नाहीं आतां तुमचें समाधान ?

**अमात्यः**—होय. झालें. आतां एकच प्रश्न विचारायचा राहिला. आणि तो हा कीं, लक्ष्मणसिंगाला सोडून द्यायचें आपल्या मनांत नाहीं, त्यापेक्षां त्याला निरोप देण्याकरतां दरबार भरवण्याचें आपण बोललां तें अर्थातच रद्द समजावयाचें ना ?

**भीमसिंगः**—नाहीं नाहीं. त्या राजाला जो अमर्याद अहंकाराचा रोग जडला आहे तो घालवण्याकरतां मला जे उपाय करायचे आहेत त्यांतलेंच हें दरबाराचें कलम असून तें कायम आहे. त्या दरबारासंबंधें तजवीज करायची ती अशी करा. ( कानांत सांगतो. ) याप्रमाणें [illegible]. समजलांत ?

**अमात्यः**—ठीक आहे. आज्ञेप्रमाणें व्यवस्था ठेवतों.

( जातात. )

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळः**—पद्मावतीच्या छावणीजवळ एका खेड्यांतलें एक पडकें घर.

( घाबरलेली मोहिनी सैरावैरा धांवते आहे. गणक तिला धरूं पहात आहे. )

**मोहिनीः**—कलावती ! कलावती ! कुठे गेलीस मला टाकून ? आतां कसें करूं ! मला फार भय वाटूं लागलें आहे बाई ! माझ्या सोबतीला इथे कुणी नाहीं आणि ही कुणीकडे निघून गेली ?

**गणकः**—तुला सोबत पाहिजे एवढेंच ना ! मग त्याला कलावतीच कशाला पाहिजे ? कलावतीनें तुझी सोबत केली नाहीं तर तिचा बाप करील ! हा मी तिचा बाप इथे हजर आहें.

**मोहिनीः**—मला कस्तुरी पाहिजे, हरिण नको. मला कमलिनी पाहिजे, कर्दम नको. माझी कलावती मला पाहिजे. तिचा बाप मला नको आहे.

**गणकः**—अस्सें अस्सें ! कलावती तेवढी झाली कस्तुरी आणि कमलिनी, आणि आमच्या अदृष्टाला दृष्टांताचा भाग आला तो हरिणाचा आणि कर्दमाचा ! एकूण तुझ्या दृष्टीनें मी पशूसारखा बुद्धिहीन आणि पायाखालीं तुडवायचा चिखल ठरलों ना ?

**मोहिनीः**—तसें कांहीं मीं म्हटलें नाहीं. माझें ध्यान होतें कलावतीकडे. त्यामुळें सहजच मी कस्तुरी, कमलिनी, कलावती असे ककार जुळवले. तुमचा अपमान मी कशाला करूं आजोबा !

**गणकः**—तूं ककार जुळवलेस त्याबद्दल मी चकार बोलत नाहीं. पण आजोबा म्हटलेंस एवढ्यानें माझ्या छातींत सुरी खुपसलीस ! मोहिनी ! नको नको ! आजोबा नको ! ' अंगं गलितं पलितं तुंडं ' असा मी वांकलेला जर्जर म्हातारा का ग तुला दिसतों ? छे छे ! खरा प्रकार तसा नाहीं बरें ! मी चपळ आहें. साहसी आहें. बलाढ्य आहें. कोण तुझा ऐन उमेदींतला उमदा जवान असेल तो माझ्यापुढें आण आणि पहा मी कसा त्याला उचलून अधांतरीं धरतों आणि जमिनीवर आपटतों तो ! काय ? तुच्छतेनें माना उडवतेस ? मी बोलतों तें खोटें वाटतें होय ? बरें. तुलाच आतां चेंडूसारखी उचलतों आणि प्रत्यक्ष प्रचीत दाखवतों. मग तरी माझ्या बळाची खात्री होईल कीं नाहीं ?

मोहिनीः—नको नको. तुमच्याबद्दलची काय खात्री व्हायची ती होऊन चुकलीच आहे. आणखी खात्री करायच्या भरीस कशाला पडतां ? आतां इथून जा आणि मला निवांत एकटी तरी बसूं द्या, नाहीं तर माझी प्राण-सखी कलावती मला आणून द्या.

गणकः—अस्सें, अस्सें. कलावती तेवढी झाली प्राणसखी आणि मी कोण ? उठल्या बसल्या तुला कलावती कशाला पाहिजे असते ग ? रात्रंदिवस खोलींत बसून तिच्याजवळ कसल्या गुलगुल गोष्टी करीत असतेस ? कांहीं केल्या तिची खोली सोडायची नाहीं, बाहेर पडलीस तरी तोंडावरचा बुरखा धडपणें काढायचा नाहीं, माझ्या हारींमोरींसुद्धां उभें रहायचें नाहीं, हा धंदा करायला सोकावली आहेस नव्हे का ? आज भली एकटी सांपडली आहेस. तुझ्याशीं बोलायला संधी मिळावी म्हणून किती तरी दिवस टपलों आहें. आतां कुठे जाशील ! ऐक आतां. अशी समोर उभी रहा.

मोहिनीः—उभी रहातें. पण मोर कुठचा आणूं ?

गणकः—असा शब्दच्छल करून मला छळूं नकोस. काय म्हणतों तें ऐकून घे. मीं तुझ्याशीं लग्न करायचें ठरवलें आहे. मुहूर्तनिश्चय करायचा तेवढा राहिला आहे तो तुला विचारून करायचा.

मोहिनीः—मुहूर्ताचा निश्चय राहूं द्या, पण लग्नाचा तरी निश्चय ठरला आहे का ?

गणकः—तो न ठरून सांगतो आहे कुणाला ? माझ्या नशीबीं द्वितीय भार्येचा योग गणितानेंच सांगितला आहे. तो मला चुकणार कसा ?

मोहिनीः—दुसऱ्या बायकोचा योग गणितानें तुम्हांला सांगितला असेल याबद्दल वाद नाहीं. पण त्या गणिताला असें विचारा कीं, जी बायको तुम्हीं योजिली आहे तिला दुसऱ्या नवऱ्याचा योग आहे कीं काय ? तसें असल्यावर मग बोलणेंच नाहीं. द्रौपदीला पांच नवरे होते तसे माझ्या कपाळीं दोन नवरे आहेत म्हणावें आणि स्वस्थ बसावें !

गणकः—( चपापून ) दोन नवरे ? दोन नवरे म्हणायला तुझा पहिला नवरा आहे कुठे ? तुझें लग्न कधीं झालें आहे ?

433 नाट्य

**मोहिनी:**—लग्न झालें नसलें म्हणून काय झालें ? ज्यानें मला विकत घेतलें त्याच्या मुलाशीं माझें लग्न ठरलेलें आहे. तें ठरलें काय, आणि झालें काय, अर्थ एकच आहे.

**गणक:**—भलतेंच नाहीं तें ! असें कसें होईल ? रुक्मिणीचें देखील शिशुपाळाशीं लग्न ठरलें होतें. पण अखेरीस झालें कृष्णाशीं ! त्यांतलीच ही गोष्ट आहे. नुसता लग्नाचा ठराव झाला एवढ्यानें कांहीं तो खापऱ्याचा मुलगा तुझा नवरा होत नाहीं.तुझें लग्न व्हायचें तें माझ्याशीं, हें ब्रह्मलिखित आहे. तें चुकायचें नाहीं. उगीच आढेवेढे घेऊन मला त्रास देऊं नकोस.

**मोहिनी:**—छे छे ! तुम्ही सांगतां हें मोठें पाप आहे. तें करायला मी कशी कबूल होईन? तुम्ही स्वतःला गणक म्हणवतां, पण गणिका म्हणवून घ्यायला मी नाहीं तयार व्हायची !

**गणक:**—काय हा मूर्खपणा ! मी इतकें सांगतों आहें हें खोटेंच वाटतें ? मोहिनी, माझ्याएवढा शास्त्रवेत्ता पापभीरु ब्राम्हण तुला कुठेंही पहायला सुद्धां सांपडायचा नाहीं! माझें सांगणें निःशंकपणानें खरें मान. विवाह-होम आणि सप्तपदी झाल्याखेरीज कुणी कुणाचा नवरा नव्हे आणि बायको नव्हे. समजलीस? माझी स्त्री होण्याला तुला कोणताच प्रत्यवाय नाहीं. उगीच विलंब लावूं नकोस. निमूटपणानें कबूल हो.

**मोहिनी:**—( उसासा टाकून ) मी दुर्बळ अनाथ मुलगी, आणि तुम्हीं मला एकटीला गांठलेंत, तेव्हां तुमच्या जोरजबरीपुढें माझें काय चालणार ? देवा ! कायरे हें संकट आणलेंस !

**गणक:**—संकट ? यांत कसलें संकट आहे ? मला मोठा चमत्कार वाटतो आहे तुझा !

**मोहिनी:**—अहो, संकट नव्हे तर काय ? तरण्या बायकोनें म्हातारा नवरा पतकरणें म्हणजे कडुकीचा काढाच तो !

**गणक:**—पहा पहा हे शेंफारलेल्या पोरींचे चोचले ! मी म्हणे कडुकीचा काढा वाटतों हिला ! बरं, असलों कडुकीचा काढा म्हणून काय झालें ? त्यांत मी प्रेमाची खंडोगणती साखर घातल्यावर कडूपणाचें स्मरण देखील तुला व्हायचें नाहीं. मला तूं सामान्य मनुष्य समजूं नकोस. मी राणीसाहे-बांच्या खासदिमतीचा ज्योतिषी आहें. माझा वशिला आणि माझा अधिकार फार मोठा आहे. तूं अष्टपुत्री नेसायला कबूल हो. तुला आठ

मुलगे होतील ते सरकारच्या आठ सुभ्यांवरचे अधिकारी होऊन अष्ट दिग्पाळांप्रमाणें शोभतील ! वेडी कुठची ! तुझ्यासारखें ऐश्वर्य मिळायचें आहे कुणाला ?

**मोहिनी:**—बरें तर. पण हो, माझ्या देशांतला एक शिष्टाचार आहे तो तुम्ही पाळीत असाल तर मी कबुली देईन.

**गणक:**—तूं सांगशील तें करायला मी एका पायावर तयार आहें.

**मोहिनी:**—आमच्या देशांत अशी चाल आहे कीं, एकदां ठरलेलें लग्न मोडून मुलीचें दुसरें लग्न करायचें असलें म्हणजे त्या नवीन नवऱ्यानें नवरीला गुढघे टेंकून नमस्कार करायचा असतो. तो तिकडे सर्वमान्य शिष्टाचार आहे. तुम्ही त्याप्रमाणें वागत असाल तर तुमचें माझें लग्न होईल.

**गणक:**—हा शिष्टाचार जरा वेडगळपणाचा दिसतो. पण त्याखेरीज लग्नच व्हायचें नाहीं म्हणतेस, मग काय करायचें ? हा पहा तूं सांगतेस त्याप्रमाणें तुला नमस्कार करतों. ( नमस्कार करितो. )

**मोहिनी:**—( स्वगत ) कामवासनेमुळें वेडा होऊन हा माणूस अगदीं पशु बनला आहे ! आज हा माझ्या अंगाला झोंबल्याखेरीज सोडीत नाहीं हें स्पष्ट आहे. तर मग ती वेळ येण्यापूर्वी इथून पळून गेलों तर बरें नव्हे का ? नको पण ! पुन्हां याची अशी मौज करायचा प्रसंग जन्मांत कधीं यायचा नव्हे, तो फुकट कां घालवावा ?

**गणक:**—झालें आतां तुझ्या मनाप्रमाणें ?

**मोहिनी:**—बाकी सर्व ठीक झालें. पण नमस्कार चुकला. कक्कुड-कुंभ्याला नमस्कार करतात तसा नमस्कार करायला पाहिजे.

**गणक:**—इतकेंच ना ? कुक्कुडकुंभ्याचा नमस्कार घे ! इथे काय ! ( हातांचा विळखा करून नमस्कार करितो. ) आतां तरी तुझा शिष्टाचार बरोबर झाला ना ?

**मोहिनी:**—ऊं ! यांत काय आहे ? मीं फुकाचा नमस्कार करायला सांगितला तेवढा करून दाखवलात. पण आतां आली आहे बाब खर्चाची. आतांच तुमच्या प्रेमाची खरी परीक्षा आहे. मी तुमची बायको झाल्यावर माझ्या अंगावर पुष्कळ दागिने घालायला पाहिजेत.

**गणकः**—दागिन्यांना काय तोटा ? ते तयार करून ठेवलेलेच आहेत. लग्न होऊं दे. मग हवे तितके दागिने घालतों.

**मोहिनीः**—तसें नाहीं. आधीं दागिने द्या. मग लग्नाचें बोला.

**गणकः**—आधीं दागिने द्या ! असें कसें बरें ? लग्न पहातांना ज्योतिषी आधीं कन्या आणि मागून धन मोजीत असतात.

**मोहिनीः**—पण लग्न करतांना तेच ज्योतिषी आधीं लक्ष्मीपूजन आणि मागून घरभरणी करीत असतात.

**गणकः**—छे बुवा ! तुझ्यापुढें बोलायला बृहस्पति सुद्धां टिकायचा नाहीं ! काय म्हणतेस? दागिने पाहिजेत ना ? हे घे दागिने. तुझ्याकरतांच ते तयार केलेले आहेत. पुढें तूंच घालायची ती आजच कां घालीनास ? ( दागिने आणून देतो. ) घाल ते अंगावर. कशी दिसतेस पाहूं ?

**मोहिनीः**—हां. आतां ठीक आहे. ( दागिन्यांची गांठोडी पोटकुळीला लावून ) तूर्त राहूं द्या हे तसेच. अंगावर घालीन तेव्हां दिसतीलच.

**गणकः**—आतां तर आपल्या लग्नाला कांहीं विघ्न नाहीं ना राहिलें ?

**मोहिनीः**—विघ्न आहे तर ! आणखी एक मोठेंच विघ्न आहे. तुम्ही माझ्याशीं लग्न केलेंत, आणि उद्यां घटखर्पर येऊन दारांत ओरडत बसला तर काय कराल ? याकरतां आधीं त्याची सोडचिठी मिळवा, म्हणजे मग पुढें लग्नाचा विचार ! तेथपर्यंत मी त्याच्या मुलाची बायको आहें असेंच मला समजलें पाहिजे.

**गणकः**—( त्रासून ) लागलीस का पुन्हां वेड पांघरायला ? लबाड कुठची ! नवरीचे दागिने घेऊन बसलीस आणि आतां कां तकरार ? आतां मला तुझा विश्वास येत नाहीं. शास्त्रमार्गानें लग्नाचा विधि केव्हां होईल तेव्हां सावकाश होऊं दे. व्यवहाराच्या बाजूनें माझा नवरेपणाचा हक्क शाबीत करण्याकरतां मी याच वेळीं तुझें चुंबन घेतों. ( तिच्या अंगास झोंबूं लागतो. ती दूर दूर पळते. )

**मोहिनीः**—नका हो नका ! मी तुमच्या पायां पडतें. मला भ्रष्ट करूं नका ! मी परस्त्री आहें. मी पतिव्रता आहें.

**गणक**:—कसा कसा कांगावा करते आहे पहा! इरसाल लुच्ची पोरगी! माझ्याकडून नमस्कार घालवून आतां चमत्कार दाखवते आहे मला!

**मोहिनी**:—इथे मी तुम्हांला एकटी सांपडलें म्हणून माझ्यावर बलात्कार करतां हा केवढा बरें अन्याय!

**गणक**:—अन्याय करतों? असा अन्याय करण्याचा माझा हक्कच आहे माझा हक्क जागवल्याशिवाय मी कधीं सोडणार नाहीं.

**मोहिनी**:—जर माझ्यावर जुलूम कराल तर तुमचा नाश होईल. अधःपात होईल. दूर व्हा. देवा वैकुंठनाथा! तूं द्रौपदीची पाठ राखणारा ऱ्या मोहिनीला कसा विसरतोस?

## पद २६

राग भंकार. ताल रूपक.

**आलें मी तुजसिं शरण। भ्यालें मन करि भजन।**
**हांक एकुन येसिना तरि॥ मज गति कठिन॥ ध्रु०॥**
**कप करि हें विघ्न दारुण। म्लानवदन विनावें अशरण।**
**दुष्ट कामांधासि दंडुन। मजसिं सोडावें हेंच याचन॥**

**गणक**:—वैकुंठनाथ येऊंदे, कैलासनाथ येऊंदे, कोणीसुद्धां असल्या बइमान बायकोच्या उपयोगीं पडायचे नाहींत! तुझें चुंबन घेतल्याखेरीज नाहींच मी रहायचा! त्रिभुवनविजयी अनंगदेवाची मला आज्ञाच तशी आहे. त्याला मी काय करूं? ( तिचा हात धरतो. )

**मोहिनी**:—( त्याचा हात हिसडून ) हो मेल्या दूर! उर्मटा मुरदाडा गणक्या! जवळ येऊं नकोस. अंतरावर उभा रहा.

**गणक**:—माझ्याकडून कोणतें अंतर पडलें म्हणून अंतरावर उभा करतेस? अभ्यंतरांत तुझें ध्यान सांठवलें आहे आणि अंतरावर कसा राहूं?

**मोहिनी**:—अंतरावर कसा राहूं म्हणून मलाच विचारतोस? अस्सा रहा अस्सा! ( त्यास धरून जमिनीवर पाडते. )

**गणक**:—( बोबडी वळल्याच्या स्वरानें )मेलों मेलों! धांवा हो धांवा! ही माणसाचें रूप घेणारी कोणी राक्षसी माझा जीव घेते आहे!

मोहिनीः—तुला चुंबन पाहिजे होतें नव्हे का? हें घे चुंबन! तुझ्या पाठीचें आणि माझ्या मुठीचें! ( त्याला बुक्क्या मारते. )

गणकः—ओयोयोयो! नको माझा प्राण घेऊं! सोड. मारूं नको.

मोहिनीः—प्राणप्रिया! मीं तुमची नवरी ना? मग असें कां बरें बोलावें? ( पुन्हां मारते. )

गणकः—पुरे पुरे! अर्धांगी होण्यापूर्वींच मला अर्धमेला केलेंस! असली महामारीसारखी नवरी नको नको मला! सोड आतां! ( सोडते. )

मोहिनीः—या मेल्यानें मला स्पर्श करून भ्रष्ट केलें आणि आतां तुझ्याशीं लग्न करीत नाहीं म्हणतो! आतां कसें करूं? जगांत हें काळें तोंड मी दाखवूं तरी कसें? कुठे तरी जाऊन मी आतां जीव देतें. (जाऊं लागते.)

गणकः—( तिच्या पाठोपाठ कांहीं पावलें जातो. ) मोहिनी! प्रचंडे! चंडिके! जीव देण्याकरितां जातेस तर खुशाल जा! पण माझे तेवढे दागिने देऊन जायचें तिकडे जा. मला गरिबाला विनाकारण कां नाडतेस?

मोहिनीः—( मूठ वळून त्याच्या अंगावर चालून येते. तो पळून जातो. ) वाहवा! याला म्हणावें गनिमी कावा! शाबास या विद्याधराची! जीते रहो पठ्ठे! कलावती! असला हा गनिमी कावा लढवून तुझ्या बापापासून मीं तुला हिरावून घेतलें याबद्दल वैषम्य मानूं नकोस!

## पद २७

चाल-गजल.

प्रेम तव माता। भुकेला हंस हा जाणीं। प्रिये।
कांति तव ज्योति। चुकेला पांथ हा मानीं। प्रिये॥ ध्रु०॥
वंश—विस्तर—कल्पलतिका। तूंच गुणखाणी। स्वयें।
कैतवें तुज जिंकिलें। तूं को मनिं नाणीं। प्रिये॥

( जातो. )

## प्रवेश चवथा.

स्थळ—माणिकदुर्ग. दरबारची जागा.

( भीमसिंग सिंहासनावर बसला आहे. त्यांचे सरदार, मानकरी, दरकदार वगैरे लोकांची चिकार गर्दी झाली आहे. )

**भीमसिंग**:—लोक हो ! प्रथम तुम्हांला अतिशय आनंदाचें वर्तमान कळवायचें आहे तें हेंच कीं, कुमार हिरासिंग फौजेसह इथून तीन कोसांवर आला आहे,आणि वाटेंत एक शत्रूची टोळी आहे तिचें पारिपत्य करून उद्यां तो इथे येईल. आणि आम्हां सर्वांना तो मोठ्या हर्षाचा प्रसंग होईल. हें अत्यंत संतोषाचें वर्तमान तुम्हांला जाहीर करावें हा आजचा दरबार भरवण्याचा एक हेतु आहेच, पण आणखी असाही उद्देश आहे कीं, तुम्हां सर्वांना एक मौज दाखवावी. ती मौज अशीच आहे कीं, जी पहातांच आमच्या कुशाग्रबुद्धीचा आश्चर्यकारक प्रभाव सर्वांच्या ध्यानांत येऊन तो प्रशंसेला पात्र होईल. कुमारानें समशेर गाजवून लक्ष्मणसिंगाला धरून आणलें तेव्हांपासून त्या कैदी राजाविषयीं आमच्या मनांत दया उत्पन्न झाली होती. जर तो शरण येईल आणि आमच्या मर्जीप्रमाणें वागण्याची कबुली देईल तर त्याला सोडून द्यावें अशी आमची इच्छा होती. परंतू त्याच्या अमर्याद उद्दामपणापुढें आमचा निरुपाय झाला; आणि आमची कृपा संपादन करणें किती अगत्याचें आहे हें त्याला जाणवण्याकरतां त्याचा मानभंग करण्याचे उपाय करणें आम्हांला भाग पडलें आहे. त्याच्या मनाची घमेंड केवढीही मोठी असली तरी जेथपर्यंत त्याचें शरीर आमच्या हातांत आहे तेथपर्यंत तें कोणत्याही अडचणींत आणून नम्र करणें हें आमच्या हातांतलें आहे, ही गोष्ट त्या बंदिवान राजाच्या मनांत आज भिनवायची आहे; व त्याला नम्रतेच्या श्रीगणेशाचें वळण घालून द्यायचें आहे. सर्वांनीं लक्षांत घ्यावें कीं, तो राजा ज्या बाजूनें दरबारांत यावयाचा आहे त्या बाजूला दरवाजे लावले आहेत ते सर्व ठेंगणे आहेत. कोणत्याही दरवाजानें तो आला तरी आम्हांपुढें मान वांकवल्याखेरीज त्याला येतां येणार नाहीं. तो राजा चौकटींतून येतांना वांकला म्हणजे त्यानें कनिष्ठपणाच्या नात्यानें आम्हांला आर्धी

मुजरा केला असें दाखवून वरिष्ठाप्रमाणें आम्ही त्याला मुजरा करूं. त्या वेळीं सर्व लोकांनीं एकदांच मोठ्यानें हंसावें. भरदरबारांत आपली अशी अवज्ञा झालेली पाहून तो मानी राजा दांत ओंठ खाईल, मनगटें चावील आणि लज्जेमुळें मेल्यापेक्षां मेल्यासारखें त्याला दुःख होईल. तथापि त्याची आणखी कुचेष्टा कोणी करूं नये. सर्वांनीं गंभीरपणा धरून दरबारची अदब राखावी. कारण हा संभावितपणाचा चिमटा त्याला घ्यायचा आहे. हा वाघनखाचा ओरखाडा हंसतां हंसतां काढायचा आहे. ( लक्ष्मणसिंग येतांना दिसतो. ) पहा पहा. तो राजा तिकडून येत आहे. त्याच्या मागून त्याचे मानकरी येत आहेत,आणि आमचे अमात्य पुढें वाट दाखवीत चालले आहेत. सावधपणानें नजर ठेवा.

( लक्ष्मणसिंग येतो. )

**लक्ष्मण:**–( स्वगत ) माझा अपमान करण्याखेरीज आजच्या या दरबाराचा दुसरा कांहीं एक उद्देश नसावा असा मला पक्का संशय आहे. तर तसा अपमान करण्याची या दुष्टानें काय बरें युक्ति लढवली असावी? ( दरवाजांकडे पाहून ) हां. आलें ध्यानांत ! यापुढें मी मान वांकवली असें आपल्या प्रजेला दाखवण्याकरतां या मूर्खानें ही ठेंगण्या दरवाजांची ग्राम्य कल्पना योजिली आहे ! या कल्पनेवर तोड करायची तीही तसलीच ग्राम्यपणाची करून याचे दांत पाडले पाहिजेत. ठीक आहे. ( मानकऱ्यांजवळ कांहीं कुजबुजतो. ते माना डोलवतात. )

**अमात्य:**–(एका दरवाजानें दरबारांत येऊन) यावें.लक्ष्मणसिंग महाराज! इकडून यावें.

**भीमसिंग:**– ( सिंहासनावरून उठून चार पावलें त्वरेनें पुढें येतो. ) यावें! यावें राजेसाहेब! आपलें स्वागत करण्याकरतां मी व माझे हे सर्व प्रमुख प्रजाजन सज्ज आहों, व आपली वाट पहात आहों.

**लक्ष्मणसिंग:**–राजेसाहेब ! आपल्या थोरपणाला आणि आपल्या प्रीतीला माझ्या येण्यानें योग्य मोबदला मिळावा म्हणून मीसुद्धां उत्कंठितच आहें. हा आलोंच !

( येतो. व दरवाजाची चौकट हातानें धरून नुसते पाय बाहेर काढतो. )

( भीमसिंग मुजरा करतो व दरबारांत एकदम फार मोठा हंशा होतो. )

**भीमसिंगः**–( क्रोधानें उसळून ) अरे ! हें काय झालें इथे ! या राजानें मान न वांकवतां दरवाजांतून नुसते पाय बाहेर काढले आहेत ! एकूण या दुरात्म्यानें आम्हांला आधीं वंदन करायचें सोडून उलट आम्हांलाच आपल्या पायांना वंदन करायला लावलें ! आणि माझी अशी फजिती झाली म्हणून माझेच हे दरबारी निर्लज्जपणानें हंसताहेत ! चोपदार ! चोपदार ! या सर्व लोकांना छड्या मारा ! यांच्या मुसक्या आंवळा ! हरामजादे लोक !

**१ दरबारीः**–सरकार ! गुन्हा माफ असावा. आम्ही हंसलों ते सरकारी हुकमानें हंसलों आहों. आतां रडायचा हुकूम होईल तर आम्ही रडायलासुद्धां तयार आहों ! आम्ही हुकमाचे बंदे आहों सरकार !

**भीमसिंगः**–कुठे आहे तो दुष्ट राजा ? यावेळीं त्याला चावूं कीं गिळूं कीं तिळातिळाएवढाले तुकडे करूं असें मला झालें आहे. काय त्याला जमिनींत गाडूं कीं विस्तवांत जाळूं, कीं कडेलोट करून मारूं, की करूं तरी काय ? काय करतो आहे तो अजून दरवाजांत ? ओढा त्याला बाहेर !

**लक्ष्मणसिंगः**–( मानकऱ्यांसह दरबारांत येऊन ) काय म्हणतोस तूं ? ही मूर्ति तुझ्या मूर्तीसमोर उभी आहे.

**भीमसिंगः**–तुझ्या मूर्तीसमोर उभी आहे ! तुझी आणि माझी ? अजून मस्ती उतरली नाहीं ! लवकरच उतरेल.

**लक्ष्मणसिंगः**–मला मस्ती केव्हांच नव्हती व नाहीं. तुझी मस्ती अजून उतरली नाहीं ती लवकरच उतरेल असें तूंच म्हणतो आहेस. फार चांगली गोष्ट आहे.

**भीमसिंगः**–आम्ही एवढे राजाधिराज आहों. तूं राजा असलास तरी आमचा बंदिवान आहेस. इतकें असून तूं आपल्या पायांना आम्हांकरवीं प्रणाम करायला लावलास आं ! छे छे ! अशाही स्थितींत तुझा उद्धटपणा पाहून मी आश्चर्यानें थक्क होऊन गेलों ! इतका ताठा तुझ्या अंगांत कशामुळें भरला आहे रे ?

**लक्ष्मणसिंगः**–माझ्या स्वभावांत उद्धटपणाचा लवलेश नाहीं हें दुनियेला मशहूर आहे. मात्र मी नम्राशीं नम्र आहे तसा उद्धताशीं

उद्धत आहें. प्रांजलाशीं प्रांजल आहें, तसा वक्राशीं वक्र आहें. 'जे मला ज्या प्रकारें भजतात त्यांना मी त्या-प्रमाणेंच फळ देतों' या भगवद्वाक्याप्रमाणें माझें आचरण आहे. तुझ्यापुढें नम्र होणें म्हणजे केवळ अन्यायाच्या व दगलबाजीच्या जोरावर पोस-लेल्या क्षुद्र जुलमी सत्तेपुढें मान वांकवणें होय! तें माझ्या हातून कधींही घडणार नाहीं. जे सौजन्यामृताचे मेघ जगाच्या उद्धारासाठीं अवतरले आहेत त्या महात्म्यांना माझे शतशः साष्टांग प्रणिपात आहेत. पण मी कोणत्याही स्थितींत असलों तरी जिथे जिथे कापट्य, अन्याय, विश्वासघात आणि जुलूम माझ्या नजरेस येतील, तिथे तिथे त्यांसाठीं माझा धिक्कार आणि लत्ताप्रहार ठेवलेलाच आहे.

**भीमसिंगः**—बस्स बस्स! आमच्या क्षमावृत्तीची सीमा होऊन गेली! याउपर या भीमसिंगाचा क्रूरपणा म्हणजे काय चीज आहे याची जाणीव तुला करून दिलीच पाहिजे. कोण आहेत रे इथे शिपाई? ठोका याच्या पायांत बिडी! (शिपाई रुप्याची बिडी आणतात ती हिसकून फेंकून देतो.) कशाला पाहिजे रुप्याची बिडी या कृतघ्नाला! केरसुणीला गवसणी पाहिजे कशाला? याला खरोखरीची बिडी—बिडाची बिडी—दीड मण वजनाची बिडी घाला!

(शिपाई बिडी घालण्याकरितां लक्ष्मणसिंगाजवळ जातात. लक्ष्मणसिंग व त्याचे मानकरी तरवारी उपसतात.)

**लक्ष्मणसिंगः**—व्हा दूर! नाहक मारले जाल. पळा! (शिपाई दूर सरतात.)

**भीमसिंगः**—काय? विचित्रवधाला पात्र असलेला हा अपराधी नुसती बिडी घालून घ्यायलासुद्धां तकरार करतो? आणि मगरूरीनें तलवार उपसून आम्हांलाच धमकावणी दाखवतो? सरदारहो, पहातां काय? मी बिडी ठोका म्हणून हुकूम दिला तो याच वेळीं अक्षरशः अमलांत आलाच पाहिजे. या राजाला याच्या मानकऱ्यांसुद्धां कैद करा. याला जखमा लागल्या तरी चिंता नाहीं, पण याला जिवंत धरा. मारूं नका. अजून मला याचे पुष्कळ हालहाल करायचे आहेत.

**लक्ष्मणसिंगः**–( आपल्या मानकऱ्यांस ) मर्द हो, जुलमाचा प्रतिकार करणें हें माणुसकीचें सामान्य लक्षण आहे. आपण मारतां मारतां मरूं. पण या जुलमी राजाचा अनन्वित जुलूम—

**मानकरीः**–कधींही चालूं देणार नाहीं !

**भीमसिंगः**–( आपल्या सरदारांस ) अरे, माझ्या तोंडाकडे काय पहातां ? धरा म्हणतों ना याला ?

( भीमसिंगाचे सरदार आणि लक्ष्मणसिंग व त्याचे मानकरी लढूं लागतात. दुर्गावती धांवत येते. )

**दुर्गावतीः**–थांबा ! थांबा !

**भीमसिंगः**–( त्रासून स्वगत ) ही पोरटी कशाला यावेळीं इथे आली !

**दुर्गावतीः**–लढाई बंद करा ! बंद करा ! नाहीं ऐकत ? ( लढाईंत घुसते. )

**लक्ष्मणसिंग**–( घाईघाईनें ) अरे, संभाळा ! संभाळा ! मागें सरा !

**प्रतिपक्षी सरदारः**–ही राजकन्या मध्यें आली ! हत्यारें आंवरा !

**लक्ष्मणसिंगः**–केवढें भयंकर संकट हें ! मागें सरा, मागें सरा आधीं ! ( लढाई थांबते. )

**दुर्गावतीः**–वीर हो, मी धर्माच्या नांवानें– मी सत्याच्या नांवानें– सत्यसंकल्प सत्यस्वरूप सत्यनारायणाच्या नांवानें-तुम्हांला द्वाही देतें ! लढाई बंद करा.

**भीमसिंगः**–( सद्गदित झाल्यासारखें दाखवून ) बाळे दुर्गावती ! काय हा अविचार ! काय म्हणून अशी आपल्याच प्राणावर उठली आहेस ? या हाणामारींत तुझें शरीर बचावलें यामुळें मला हर्षाच्या कोटी झाल्या! ये ये आधीं तुला कडकडून भेटूं दे !

(दुर्गावती पुढें जाते तों भीमसिंग आपल्या सरदारांना लढाईची खूण करतो. पुन्हा लढाई होणार तों दुर्गावती त्वरेनें परतून पूर्वस्थळीं उभी रहाते..)

**दुर्गावतीः**–हां ! खबरदार कोणी हत्यार चालवील तर ! तुम्हांला सत्याची आणि धर्माची द्वाही दिली आहे, त्या द्वाहीला अनुसरून सत्यपराक्रम व्हा ! धर्मवीर म्हणवा ! बाबांनो, जरी तुम्ही ताबेदार असलांत तरी परलोक म्हणून कांहीं आहे,

परमेश्वर म्हणून कांहीं आहे, एवढें स्मरण असूं द्या! बाबासाहेब! तुम्ही राजे म्हणवतां आणि माझ्याशींसुद्धां बेइमानी करतां! मग दुनियेनें तुमच्या शब्दाचें इमान काय मानावें? मी तुम्हाला असा जबाब विचारतें कीं, आज हा इथे काय प्रकार चालला आहे? ज्या ठिकाणीं या पूज्य पुरुषश्रेष्ठाचा गौरव होऊन त्याला घरीं जाऊं देण्याची तजवीज व्हावयाची, त्याच ठिकाणीं त्याचा प्राण घेण्याची तजवीज चालली आहे; हा काय अनान्वित अत्याचार आहे?

**भीमसिंग:**–( रागानें ) तूं माझी आज्ञाधारक कन्या आहेस. मला उपदेश करण्याचा अधिकार तुझा नाहीं. कोणत्या हक्कानें मला जबाब विचारतेस?

**दुर्गावती:**–कोणत्या हक्कानें? जामीनकीच्या निर्विवाद हक्कानें तुम्हांली जबाब विचारण्याचा मला अधिकार आहे. या लक्ष्मणसिंग महाराजांशीं तुम्हीं शत्रुत्वाची बुद्धि सोडून दिलीत, याबद्दल तुमच्याच इच्छेनें मी तुम्हांला जामीन राहिलें; आणि या महाराजांशीं तुमचें सख्य करून दिलें; ही गोष्ट खरी आहे कीं नाहीं?

**भीमसिंग:**–मूर्ख पोरी, असल्या जामीनक्या, करारनामे, आणा-शपथा राजकारणाच्या भानगडींत नेहमीं द्याव्या घ्याव्या लागतात. त्यांची मातब्बरी कोण मानतो? त्यावेळीं मीं तुला जामीन दिलें म्हणतेस, दिलें असेल! पण तेवढ्यावरच गर्वानें फुगून तूं मला ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतेस याची तुला शरम वाटली पाहिजे.

**दुर्गावती:**–तुमच्या राजकारणाची काय अजब कसरत आणि हात-चलाखी असेल ती मी जाणतें नाहीं आणि जाणूं इच्छीत नाहीं. ज्या-पक्षीं मी तुम्हांकरतां जामीन राहिलें आहे त्यापक्षीं तुम्हांला करारप्रमाणें वागवणें हें माझें कर्तव्य आहे एवढें मात्र मी जाणतें.

**भीमसिंग:**–तूं इथून चालती हो.

**दुर्गावती:**–जाणार नाहीं. कधींही जाणार नाहीं. जामीनगतीच्या कराराप्रमाणें तुम्ही वागत नाहीं त्या अर्थीं या महाराजांचा बचाव मला प्राण जाईपर्यंत केला पाहिजे.

**लक्ष्मणसिंग**:—देवी दुर्गावती, प्रथमपासून भीमसिंगाच्या मनांत कपट-बुद्धि आहे हें मीं तुला बजावलें होतें. तुझ्या जामीनकीमुळें मी फसलों नाहीं अथवा स्वतःला निर्भय समजलों नाहीं. तुझ्या बापानें बेइमानी केली यांत तुझ्याकडे कांहीं दोष येत नाहीं. माझ्या प्राणाचें आणि अब्रूचें जस रक्षण मला करतां येईल तसें मी करीन. त्याची मला पर्वा नाहीं. माझ्या जिवासाठीं तूं आपला जीव धोक्यांत घालावास हें मात्र मला मोठें दुःखदायक संकट झालें आहे. याकरतां तूं इथून जावेंस हीच माझी तुला विनंती आहे.

**भीमसिंग**:—मी तुला जा म्हणतों आहें. तो राजाही तुला तसेंच सांगतो आहे. इतकें असून त्याच्या पारिपत्याच्या कामांत मी आडवी येणारच असें तूं म्हणतेस, हा तुझा नुसता आग्रह नव्हे, तर अत्याग्रह आहे!

**दुर्गावती**:—नाहीं. नाहीं. बाबासाहेब! हा अत्याग्रह नव्हे. हा सत्याग्रह आहे. मी अटीला पडलें ती सत्याच्या संरक्षणासाठीं पडलें आहें. माझा झगडा समाजांत सत्याचा विजयध्वज फडकावण्याकरतां आहे. त्रिभुवनाच्या कटाहाला फोडून पार जाणारी सत्याची हांक जर तुम्हाला अजूनसुद्धां ऐकूं येत नसेल तर तरवारीनें माझे खुशाल तुकडे करा! या महाराजांवर जर तुम्ही तरवार चालवाल तर मी मध्यें पडल्याखेरीज व्हायची नाहीं. लक्ष्मणसिंगमहाराज, माझ्या गळ्याची शपथ—आणि पद्मावतीच्या गळ्याची शपथ घालून मी तुम्हाला प्रार्थना करतें कीं तुम्ही लढाईचा इरादा सोडून देऊन आपल्या बिऱ्हाडाकडे चालते व्हा.

**भीमसिंग**:—( चरफडत स्वगत ) काय करावें या कुलांगार कार्टीला! असा राग येतो कीं, कुठे दूर समुद्रांत नेऊन हिला बुडवून टाकावें!

**लक्ष्मणसिंग**:—देवी दुर्गावती, आजचा प्रसंग लढाई मारून पराक्रम गाजवण्याचा नव्हे हें मी जाणतों. आम्हाला हत्यार उपसावें लागलें तें स्वतःच्या बचावासाठीं. तो बचाव जर रक्तपाताशिवाय होत असेल तर तें आम्हाला हवेंच आहे. हे पहा आम्ही चाललों.

**दुर्गावती**:—माझ्या जामीनगतीवर आपण केव्हांही विसंबून नव्हतांच. मला मात्र भरंवसा होता, पण त्याचाही फोलपणा आज दृष्टीस पडला!

आपला बंदिवास आतां लवकरच संपणार आहे हें आपणाला माहीतच आहे.

**भीमसिंगः**–( स्वगत ) हूं ! तूं आणि तो ! बसा मनांत मांडे खात !

**दुर्गावतीः**–पण तो बंदिवास संपेपर्यंत आपल्या जिवाला जपण्याविषयीं जागृत असावें आणि फार फार सावधागिरीनें व हुशारीनें वागावें, एवढीच हात जोडून प्रार्थना !

**लक्ष्मणसिंगः**–देवी ! माझें रक्षण विश्वंभरानें करावें ! मीं काय करायचें आहे ? तथापि तुला एवढें सांगून ठेवतों कीं, पांच पन्नास बळी घेतल्याशिवाय हा लक्ष्मणसिंग आतां कोणाच्या हातीं लागायचा नाहीं ! ज्याची इतकी तयारी नसेल त्यानें मला धरायच्या नादीं लागूं नये ! ( मानकऱ्यांसह जातो. )

**भीमसिंगः**–जाऊं दे ! जाऊं दे ! आज माझ्या तडाक्यांतून सुटला तरी जातो कुणीकडे ? तृणाप्रमाणें तुच्छ असलेल्या या शत्रूला याच दरबारापुढें दांतीं तृण धरायला लावतों.

**दुर्गावतीः**–बाबासाहेब, आपलें सामर्थ्य अपार आहे असें मानतां तर खुशाल माना. लक्ष्मणसिंगांच्या देहावर तुमचें स्वामित्व कदाचित् चालेल हेंही मला कबूल आहे. परंतु त्यांच्या मनावर साम्राज्य गाजवण्याचा ध्यास तुम्हाला लागला असेल तर तो सोडून द्या. कारण त्यांत तुम्हांला यश येणार नाहीं.

**भीमसिंगः**–कां यश येणार नाहीं ?

**दुर्गावतीः**–त्याचें कारण असें आहे कीं,त्यांचें बळ आत्मिक आहे आणि तुमचें बल दैहिक आहे. दैहिक बल केवढेंही प्रचंड असलें तरी आत्मिक बलापुढें त्याचा बाडिवार चालत नाहीं.

**भीमसिंगः**–त्या भिकारड्याच्या आत्मिक बलाला कोण विचारतो आहे ? मुंगीसारखा केव्हांही चिरडून टाकतां येण्याजोगा माणूस आणि त्याचें कसलें आलें आहे आत्मिक बळ ?

**दुर्गावतीः**–हां. चुकतें आहे तें तिथेंच ! तुम्हाला मुंगीसारखा त्याचा देह तुच्छ दिसतो, पण त्यांत पर्वताचें स्थैर्य आणि गौरव नांदतें आहे तें

दिसून येत नाहीं ! बहिरंगावरून अंतरंगाचें अनुमान करतां हीच मोठी चूक होते आहे.

**भीमसिंग**:–बरें. बरें. त्याचें काय मानसिक धैर्य असेल तें माझ्या दुर्निवार सामर्थ्यापुढें कितपत टिकतें हें जगाला दिसेलच. आज त्याच्याकडून जुलमाचा रामराम घेऊन मी संतुष्ट व्हायला कबूल होतों, पण तेंही त्यानें केलें नाहीं ! कांहीं चिंता नाहीं. आतां त्याला असा दीन व धैर्यहीन करतों कीं त्यानें आपण होऊन मला प्रणाम करावा. असें करीन तरच माझी करामत !

**दुर्गावती**:–तो पराक्रम वंध्यापुत्राचा आहे !

**भीमसिंग**:–( चवताळून ) वंध्यापुत्राचा ? नाहीं. नांहीं. तो पराक्रम या भीमसिंगाचा आहे हें तूं पहाशील आणि हे सर्व लोक पहातील. भरदरबारांत एका क्षुद्र माणसानें भयंकर अपमान केला असतांही जर त्याचा मनाप्रमाणें सूड घेण्याचें कर्तृत्व अंगांत नाहीं,तर राजाधिराज म्हणून मिरवावें कशाला,आणि हें लाजिरवाणें जिणें ठेवावें कशाला ! सर्व लोक हो, काय बोलतों हें ऐकून ठेवा. आतां सांगितल्याप्रमाणें लक्ष्मणसिंगानें आपण होऊन मला प्रणाम करावा अशीच घटना घडवून आणीन. न आणीन तर प्राणत्याग करीन. हीच माझी प्रतिज्ञा!

**दुर्गावती**:–नको नको! प्रतिज्ञा असें कां म्हणतां ? प्रतिज्ञा करूं नका.

**भीमसिंग**:–हीच माझी प्रतिज्ञा! हीच माझी भीष्मप्रतिज्ञा ! या प्रतिज्ञेचा भंग होइल तर माझे सप्तपूर्वज दुर्गति पावोत !

**दुर्गावती**:–( कानांवर हात ठेवून ) शिव शिव! काय हे भयंकर शब्द !

( पडदा पडतो. )

---

**अंक तिसरा समाप्त.**

# अंक चौथा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—पद्मावतीच्या छावणीजवळचें एक देऊळ.

( गणक संतापानें हातवारे करीत येतो. )

**गणकः**–अरे जा जा! जा! मोठा आला आहे फिर्यादीचा धाक घालणारा खापऱ्या! ती पांढऱ्या पायाची पोरगी माझ्या घरांत सोडून दागिने पळवलेस आणि पुन्हां खापरासारखें काळें तोंड घेऊन मुलगी मागायला येतोस काय ? येऊं दे! येऊं दे कोतवालाला घेऊन ! असले सतरा कोतवाल मी खिशांत बाळगून बसलों आहें! तो घटखर्पर आणि त्याची ती मोहिनी मला कांहीं एक ठाऊक नाहीं, म्हणून साफ उडवून देतों! सारें साफ नाकबूल करतों! हो, साक्षी नाहीं, मुद्दा नाहीं, पत्ता नाहीं, आणि हा खापऱ्या माझ्या घरीं मुलगी ठेवली म्हणून कसें काय शाबीत करतो आहे तें मला तरी बघायचेंच आहे! हा आला खापरभट आणि तो अक्कडबाज कोतवाल आणि त्याचा तो शिपाई! बोलत बोलत येताहेत. येऊं देत ! ( घटखर्पर, कोतवाल व शिपाई येतात. )

**घटखर्परः**–( कोतवालास ) अहो, मी तरी तेंच म्हणतों आहें. लफंग्याची लुच्चेगिरी कोतवालीचा हिसका बसल्याखेरीज बाहेर पडायची नाहीं. काय समजलांत ? अं ? ( कोतवालाचा हात ओढून त्यावर जोरानें टाळी मारतो. ) हां !

**कोतवालः**–( हळूच शिपायास ) शिपाई बुवा, भटजींवर लक्ष ठेवा. काय हो घटखर्पर, या गणकाचार्यांवर तुमची काय फिर्याद आहे ती बोला पाहूं.

**घटखर्परः**–माझ्या मुलाच्या लग्नाकरतां मी मोहिनी नांवाची मुलगी खरेदी केली आणि राखणीकरतां कांहीं दिवसांच्या मुदतीनें या गणकाच्या हवालीं केली. आतां मुलाचें लग्न मला कर्तव्य असल्यामुळें मी याच्याकडे

नवरी मागायला गेलों असतां हा देत नाहीं. सबब सरकारमार्फत ती मुलगी याच्याकडून माझ्या ताब्यांत मिळावी.

**कोतवालः**—काय हो गणक, यावर तुमचें काय म्हणणें आहे ?

**गणकः**—माझें म्हणणें असें आहे कीं, फिर्यादीचा दावा खोटा असून तो माझ्यावर मुळींच लागू होत नाहीं. हें माझें म्हणणें स्थापित करण्याकरतां मी तीन मुद्दे मांडतों. माझा पहिला मुद्दा असा आहे कीं, यानें माझ्या हवालीं मुलगी मुळींच केली नाहीं. सबब ती देण्याला मी पात्र नाहीं. माझा दुसरा मुद्दा असा आहे कीं, यानें माझ्या हवालीं जी मुलगी केली होती ती आपोआप याची याच्याकडे पळून गेली आहे; सबब ती देण्याचें जोखीम माझ्यावर राहिलें नाहीं. माझा तिसरा मुद्दा असा आहे कीं, यानें जी मुलगी म्हणून माझ्या हवालीं केली ती खरोखरीची मुलगी नसून मुलगा होता ! सबब हा मुलगी परत मागेल तर ती द्यायला मी बांधलेला नाहीं. याला मुलगे पाहिजे असतील तर लागतील तितके गोळा करून द्यायला मी तयार आहें.

**कोतवालः**—हें पहा गणकाचार्य, असलें कांहीं तरी लटपटीचें तर्कट रचून मला सांगू लागाल तर तुम्हाला फार जड जाईल. तुम्ही राणीसाहेबांच्या पदरचीं प्रतिष्ठित माणसें. तुमची अप्रतिष्ठा करावी ही माझी इच्छा नाहीं. खरा प्रकार काय घडला आहे तो सांगून टाका आणि मोकळे व्हा.

**गणकः**—अगदीं खरा प्रकार असा आहे कीं, हा घटखर्पर कीं खपघटर कोण माणूस म्हणतां तो काळा कीं गोरा मीं जन्मांत कधीं पाहिलेलासुद्धां नाहीं. आज हा प्रथम माझ्या दृष्टीस पडतो आहे. यानें माझ्याजवळ मुलगी ठेवावी केव्हां आणि मी ठेवून घ्यावी केव्हां ?

**कोतवालः**—अहो फिर्यादी, तुम्ही यांच्या हवालीं मुलगी केली म्हणतां आणि हे तर ती गोष्ट साफ नाकबूल करतात, याची काय वाट ?

**घटखर्परः**—करूं देत नाकबूल ! पण मुलीच्या अंगावरचे दागिने यांनीं घेतले आहेत तेवढे तरी कबूल करताहेत ना ? कीं तेही नाकबूल ?

**गणकः**—अरेच्या ! मी मुळीं ती मुलगीच माहीत नाहीं म्हणतों आहें आणि दागिन्यांची बडबड कशाला करतो आहे हा !

**घटखर्परः**—आतां काय करावें? अहो मीं तिच्या अंगावर दोनशें तोळे सोनें घातलेलें होतें.

**गणकः**—अहा रे लुच्चा माणूस! किती किती खोटें बोलतो आहे हा!

**घटखर्परः**—( काकळुतीनें ) अहो कोतवालसाहेब, मी तुम्हाला खासगी सांगतों.

**गणकः**—अहो तो कशाला सांगायला पाहिजे? त्याची सारी चर्पटपंजरी मला पाठ झालेली आहे. "मी तुम्हाला खासगी सांगतों. मी तुम्हाला खरें सांगतों. त्या मुलीच्या अंगावर मीं दोनशें तोळे सोनें घातलें होतें. मी जर तुम्हाला एकशें नव्याण्णव तोळे अकरा मासे सात गुंजा सोनें घातलें म्हटलें असतें तर तुम्ही माझें काय केलें असतें? पण एका गुंजेसाठीं मी कशाला बाबा खोटें बोलूं?" याप्रमाणें हे इतके सारे शब्द याला बोलून दाखवायचे होते ते मींच बोलून दाखवले आहेत. कायरे खापऱ्या! बोल कीं आतां! तुझी नक्कल मी बरोबर उचलली आहे कीं नाहीं?

**घटखर्परः**—( स्वगत ) नक्कल उचललीस आणि अक्कल गमावलीस! ( उघड ) मी कशाला नाकबूल करूं? ज्यानें माझी नक्कल उचलली त्याच उचल्यानें माझें सोनेंही उचललें असलें पाहिजे एवढेंच माझें म्हणणें!

**गणकः**—( रागानें ) हां हां. तें मात्र खोटें आहे. साफ खोटें आहे. ठार खोटें आहे! अहो, आम्ही भिक्षुकलोक म्हणजे वित्ताशीं आणि प्राणाशीं गांठ! द्रव्याच्या कामांतली तोहमत खरी असली तरी नाकारायचे, मग खोटी असल्यावर कशी कबूल करूं? त्या मुलीच्या अंगावर गुंजभरसुद्धां सोनें नव्हतें. ती अंगानें सुवर्णाची होती म्हणाल तर बरोबर आहे. अंगावर सुवर्ण म्हणाल तर त्याचा स्पर्शही नव्हता.

**कोतवालः**—हें अगदीं खात्रीनें सांगितल्यासारखें कसें बोलतां हो?

**गणकः**—कसें बोलतों म्हणजे? हा दोनशें तोळे सोनें म्हणतो तें थोडें थोडकें आहे कीं काय? तिच्या अंगावर तें कुठे तरी दिसावें की नाहीं? तिचें अंग बुरख्यानें झांकलें होतें खरें, पण तिचे हात तरी माझ्या चांगल्या ओळखीचे झाले आहेतच कीं नाहीं? आणि तिच्या हातांत कांहीं सोन्याचा दागिना नव्हता.

**कोतवाल:**—तिचे हात तेवढे तुमच्या ओळखीचे होण्याचें काय कारण ?

**गणक:**—( डोकें खाजवीत ) काय कारण ? काय कारण ! अहो ती मला जेवायला वाढीत होती म्हणून तिचे हात माझ्या ओळखीचे !

**घटखर्पर:**—( स्वगत ) हो हो ! तिच्या हातचे मुष्टिमोदक यथेच्छ खाल्ले आहेत बेट्यानें ! ( उघड ) कोतवालसाहेब, पाहिलेंत ना हें कसें झालें तें ? अंगांत ताप, घरांत साप आणि पदरांत पाप या अनर्थांच्या ठेवी जवळ असूं नयेत. कारण त्या कितीही बंदोबस्तांत ठेवल्या तरी केव्हां प्रकट होतील आणि घात करतील याचा भरंवसा नसतो. काय समजलांत? अं ?

**शिपाई:**—( ढाल पुढें करून ) हां हां ! भटजी !

**घटखर्पर:**—( ढालेवर टाळी मारतो. हात झणझणतो. रडक्या स्वरानें ) हां !

**कोतवाल:**—गणकाचार्य, तुम्ही संभावित म्हणवतां आणि धडधडीत खोटें बोलतां ! जर तुम्हीं या घटखर्परांना जन्मांत कधीं पाहिलें नाहीं म्हणतां, तर यांच्या बोलण्याची ढब तुम्हाला कशी पकडतां आली ? जर यांनीं मुलगी तुमच्या स्वाधीन केल्याचें नाकबूल करतां, तर तिच्या अंगावर सोनें नव्हतें आणि तिचे हात माझ्या पक्क्या ओळखीचे आहेत हें कसें सांगतां ? घटखर्परांची फिर्याद खरी आहे. त्यानीं तुमच्या स्वाधीन केलेली मुलगी आत्तां माझ्यापुढें आणून हजर करा. न कराल तर तुमची शोभा रहाणार नाहीं हें बजावून सांगतों आहें.

**गणक:**—( स्वगत ) अरेच्या ! खरेंच कीं ! मी अगदींच घसरलों ! या खापऱ्याची नक्कल करायला गेलों तों नक्कल झाली माझी! पेचांत सांपडलों खरा! आतां कबुली दिल्याखेरीज सुटका नाहीं.(उघड) यानें माझ्या हवालीं मुलगी केली होती हें खरें आहे. पण ती माझ्या घरांतून कधींच पळून गेली. ती आतां मी कुठची देऊं ?

**कोतवाल:**— पळून गेली ! कशी पळून गेली? कां पळून गेली ?

**गणक:**—कां पळून गेली याचें उत्तर मला सांगतां येत नाहीं.

**कोतवालः**–ज्याअर्थीं या मुलीसंबंधानें तुम्हीं लपवाछपवी चालवली आहे त्याअर्थीं त्यांत कांहीं तरी काळें बेरें आहे खास. तें तुम्हीं नाहीं सांगितलेंत तरी तुमची मुलगी कलावती सांगू शकेल. घटखर्पर, घेऊन या तिला घरांतून.

**गणकः**–थांबा. हा नको माझ्या घरांत शिरायला! मीच तिला हांक मारतों. कलावती, बाहेर ये इकडे. ( कलावती येते. )

**घटखर्परः**–( हंसत ) आतां ठीक झालें. मोहिनीचें इंगित ओळखण्याची कला कलावतीनेंच जाणावी! काय समजलांत? ( शिपाई ढाल पुढें करतो. ) कांहीं समजलांत नाहीं! जाऊं द्या!

**कोतवालः**–कलावती, मोहिनी तुमच्या घरांतून कशी नाहींशी झाली तें सांग.

**कलावतीः**–तें मला माहीत नाहीं. ती ज्या दिवशीं गेली त्या दिवशीं मी घरीं नव्हतें. राणीसाहेबांनीं त्या दिवशीं मला मुद्दाम आपलेजवळ राहून घेतलें होतें.

**कोतवालः**–आंतां कसें करावें? बरें. शिपाईबुवा, या गणकांच्या शेजारीं रहाणाऱ्या लोकांजवळ या फिर्यादीबद्दल तपास करायला तुम्हांला सांगितलें होतें त्याचें काय झालें?

**शिपाईः**–रावसाहेब, शेजारी असें सांगतात कीं, यांच्या बिऱ्हाडीं एक नवीन मुलगी आठ पंधरा दिवस येऊन राहिली होती खरी. ती मुलगी एके दिवशीं मोठमोठ्यानें ओरडून रडत बोलत होती कीं, या मेल्यानें मला भ्रष्ट केलें आणि आतां माझ्याशीं लग्न करीत नाहीं म्हणतो! हें काळें तोंड आतां मी जगांत कसें दाखवू? मी कुठे तरी जाऊन जीव देतें. याप्रमाणें बोलून ती जी एकदां नाहींशी झाली ती अजून दृष्टीस पडली नाहीं.

**कोतवालः**–यावरून त्या बिचारीनें जीव दिला असें झालें! अरेरे!

**घटखर्परः**–हाय हाय! हे चारुगात्री! हे शुद्धशीले! मोहिनी! तूं अब्रूसाठीं प्राण दिलास ना? या कर्मचांडाळाच्या घरीं मीं तुला ठेवलें नसतें तर तुझी अशी गत कशाला झाली असती? हा दुष्टा! कामांधा! गण-

क्या! या प्रचंड दंडानें तुझ्या मस्तकाचीं खंडविखंडें करतों! (सोटा उगारून गणकास मारावयास धांवतो. तो कोतवालाच्या मागें दडतो. )

**कोतवालः**–( घटखर्परास आंवरून ) अहो शांत व्हा. शांत व्हा. हे राणीसाहेबांचे आश्रित आहेत.यांची अब्रू किंवा प्राणसुद्धां जरी तुम्हीं घेतला तरी तुमची मेलेली मोहिनी कांहीं पुन्हां जिवंत होत नाहीं. मग उगीच अविचारानें वागून काय फायदा? विवेक करा. क्षमा धरा. शांत व्हा.

**घटखर्परः**–कोतवालसाहेब, असला विवेकाचा आणि क्षमेचा उपदेश करणारे मीं पुष्कळ पाहिले आहेत ! मी इथे तुमचा उपदेश ऐकायला आलों नाहीं. मी न्याय मागायला आलों आहें.

**कोतवालः**–आणि मीसुद्धां तुम्हाला न्यायच देईन. काळजी करूं नका. तुमच्या मुलाची नवरी गणकानीं नाहींशी केली त्याबद्दल त्यांची मुलगी कलावती तुमच्या मुलाला नवरी मिळाली म्हणजे तुमचें समाधान होईल कीं नाहीं?

**घटखर्परः**–हो. तसं जर होत असेल तर मी फिर्याद काढून घ्यायला तयार आहें.

**गणकः**–वा वा ! वा ! हलवायाच्या घरावर ब्रह्मार्पण ! माझी मुलगी अशी फुकटची फुकट चोरापोरीं जायला–या चोराच्या पोराला द्यायला–वाटेवर नाहीं लागली ! मी मुलगी साफ देत नाहीं !

**कोतवालः**–तुम्हीं देत नाहीं तर मी देतों ! फिर्यादी ! धरा तिला हातांत आणि चालायला लागा !

**गणकः**–कोण माझ्या मुलीला हात लावतो पाहीन बरें ! मी राणीसाहेबांच्या खासदिमतीचा ज्योतिषी आहें.

**कोतवालः**–आणि मी राणीसाहेबांच्या लष्करचा कोतवाल आहें. तुमचें राज्य आभाळांत आहे. माझा अंमल पृथ्वीवर या लष्करांत बिनतकरार चालत असतो. शिपाईबुवा, गणकाला पकडून ठेवा. घटखर्पर, तुम्हीं कलावतीला घेऊन जा.

**गणकः**–अन्याय ! अन्याय ! देखदेखत दिवसाढवळ्या दरवडा ! आणि त्यांत कोतवाल सामील ! माझी कलावतीसुद्धां या खापरभटाला सामील झाली ! जातांना रडत नाहीं अथवा हूं कीं चूंसुद्धां करीत नाहीं !

**घटखर्पर**:–( कलावतीस हातीं धरून जातां जातां ) कोतवालसाहेब, महाराज लवकरच बंधमुक्त होतील तेव्हां त्या वेळच्या आनंदोत्सवांत कलावतीचें आणि माझ्या मुलाचें लग्न होईल. त्या समारंभाचें आमंत्रण तुम्हांला आतांच देऊन ठेवतों. लग्न राणीसाहेबांच्याच खर्चानें आणि पुरस्कारानें व्हायचें आहे. ( गणकाखेरीज सर्व जातात. )

**गणक**:–एकूण राणीसाहेबसुद्धां दरवड्यांत सामील! त्यांच्या मर्जीप्रमाणें कलावती विद्याधराला दिली असती तर किती छान झालें असतें? पण आतां काय त्याचें? ( घटखर्पर परत येतो. )

**घटखर्पर**:–गणकाचार्य, आपणालाही लग्नसमारंभाला यावेंच लागेल आणि कन्यादान करावेंच लागेल.

**गणक**:–जुलूम जुलूम! हें मला असह्य अनिवार दुःख झालें! या दुःखाचा परिहार करणारी मात्रा देणारा या त्रिभुवनांत मला कोण भेटेल? माझी लाडकी कलावती घटखर्पराच्या मुलाला मीं द्यावी काय? हाय! हाय!

**घटखर्पर**:–व्याहीमहाराज, तुम्ही म्हणतां ती दुःखनिवारक मात्रा देणें तुमच्या हातचें आहे! जिथें हाय हाय म्हणतां तिथें होय होय म्हणा म्हणजे झालें!

**गणक**:–खापरभटा! मुलगी बळजबरीनें काढून घेतलीस आणि आतां अशी माझी चेष्टा करून दुःखावर डाग देतोस काय?

**घटखर्पर**:–मीं विद्याधराला मुलगी दिली असती तर छान झालें असतें असें तुम्ही आतांच बोललांत ना?

**गणक**:–होय. बोललों. आणखी शंभरदां तसेंच बोललों तरी काय उपयोग? सरकारमार्फतीनें मुलगी हवालीं करून घेतलीस ती आतां परत थोडाच देणार आहेस! ती परत दे आणि पहा तिचें विद्याधराशीं लग्न करून टाकतों कीं नाहीं तें!

**घटखर्पर**:–तर मग तुम्हाला सांगतों कीं, माझा मुलगा आणि विद्याधर दोन नाहींत.

**गणक:**-( आश्चर्यानें गोंधळतो. ) दोन नाहींत ! दोन नाहींत !! एकच आहेत ! अरे भामट्या ! काय शिताफीनें कावा साधलास रे ! हें कसें झालें? हें काय झालें? होतों कसा आणि झालों कसा ! मुलगीपरी मुलगी गमावली, दागिने गेले आणि पुन्हां दुसरी बायको मिळत नाहीं ती नाहींच ! आठव्या मंगळानें मला चांगलेंच खड्ड्यांत घातलें म्हणायचें ! असो. आतां जें झालें त्यांतच समाधान मानलें पाहिजे. कलावतीचें विद्याधराशीं लग्न होतें आहे यांत कांहींच वावगें नाहीं. पहिली बायको मेल्यावर दुसरी करून घेण्याचा नाद माझा फार दिवसांचा होता. पण ती दुसरी बायको नाहींच मिळत तर काय करायचें ! तो नाद मी सोडून देतों. हो, आतां करायची ती एकदम तिसरीच करूं म्हणजे झालें ! ही मधली दुसरी बायको नकोच मुळीं ! आतां माझे दागिने गेले आहेत तेवढ्यापुरता विचार राहिला. तर ते दागिने पळवून नेणारी मोहिनी कुठे दडवून ठेविली आहेस तें सांग बरें !

**घटखर्पर**—सांगेन. सांगेन केव्हां तरी. तूर्त आधीं राणीसाहेबांकडे जाऊन त्यांच्या समक्षतेनें वाङ्निश्चय करून टाकूं या.

**गणक**—चला. चला तर. ( जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—माणिकदुर्ग. दुर्गावतीचा महाल.

( दुर्गावती उभी आहे. )

**दुर्गावती:**—इतक्या तऱ्हेनें वारंवार बोध करीत असतां बाबासाहेब अजून शुद्धीवर येत नाहींत याला करावें तरी काय ? एकीकडून मीं विघ्नांचा उपसंहार करावा तों दुसरीकडे हे संहाराचें नवें नवें अस्त्र उत्पन्न करतात ! एकीकडून मीं वणवा विझवण्याचा यत्न करावा तों दुसरीकडे हे नवी नवी आग लावीत सुटतात ! संकटांतून संकट उत्पन्न करण्याची यांची हतोटी कांहीं विचित्र आहे! परमेश्वरा! यांना सद्बुद्धि दे म्हणून प्रत्यहीं मीं प्रार्थना करीत असतां ती तूं मनावर घेत नाहींस, यावरून माझ्या सत्त्वाची परीक्षा पहाण्याचा तुझा मानस आहे, असाच अर्थ मीं समजावा

काय ? बाबासाहेब भडकतां भडकतां अखेरीस काळाच्या जबड्यांत जाऊन पडणार, आणि तेथून त्यांना सोडवण्याकरतां मला देहाचा बळी द्यावा लागणार, असेंच माझ्या प्रारब्धाचें घटित दिसतें आहे ! देहाचा बळी देऊनसुद्धां माझें दुःख संपत नाहीं ! पद्मावतीला निर्भयपणानें माझ्याकडे पहातां येईल इतक्यापुरतें तरी मीं माझें तोंड उजळ राखलें पाहिजे ! आणि त्यासाठीं पत्नी होऊनसुद्धां कुमारी—आणि गृहिणी होऊनसुद्धां वनवासी—असेंच मला रहावें लागणार ! भगवंता ! दुर्गावतीच्या जन्माची अशी दशा व्हावी असाच जर तुझा संकेत असेल तर तसेंच घडो ! जर तशीच वेळ येईल तर मी देहाची ममता टाकीन, आणि संसारावर सुखानें पाणी सोडीन ! मी तितकें केल्यावर तरी माझें माहेरघर सुखानें नांदतें ठेव एवढीच माझी तुला प्रार्थना आहे.

## पद २८

राग भीमपलास—ताल त्रिवट.

**करितें मी देवा हा धांवा ॥ ध्रु० ॥**

**या नृपवंशा । वसुधोत्तंसा । नाश चुकावा । होउ सुखावा ।**

**निरविलि तव पदिं देह-दया । भय सोडुनियां । कर जोडुनियां ॥**

( भीमसिंग प्रवेश करतो. )

**भीमसिंगः**—दुर्गावती, माझ्यावर आलेलीं संकटाचीं अभ्रें जीं तुला दिसताहेत तीं माझ्या पराक्रमाच्या झंझावातापुढें क्षणभरसुद्धां टिकाव धरूं शकणार नाहींत याबद्दल मला शंकाच नाहीं. तूं मात्र भलत्याच कल्पना घेऊन विनाकारण दुःख पावतेस याचें मला वाईट वाटतें.

**दुर्गावतीः**—बाबासाहेब, विनाशकाळीं विपरीत बुद्धि होते असें म्हणतात, त्याचा प्रत्यय तुमच्या संबंधानें मला क्षणोक्षणीं येत आहे ! युद्धाचा परिणाम किती भयंकर होणार हें अजूनसुद्धां तुम्ही डोळे उघडून पहात नाहीं याला करावें तरी काय ?

## पद २९

राग हिंदोल—ताल त्रिवट.

**वाटे न कैसा धाक अजुनिही घोर जरि कृतांत देखिला ॥ ध्रु० ॥**

**पावतां अभिमानें क्षय विवेक धरा मति कुटिला करि विनाश**

**हत—नय विजय काण पावला ॥**

बाबासाहेब, भरदरबारांत प्रतिज्ञा बोलून गेलांत ती पूर्ण कशी करणार ?

**भीमसिंग**:–करीन. करीन. त्याची काळजी तूं कशाला करतेस ? लक्ष्मणसिंगाला जिंकणें म्हणजे मला केवळ हातचा मळ वाटतो आहे.

**दुर्गावती**:–( स्वगत ) ज्याला आत्मज्ञान झालें त्यानें जग जिंकलें ! ज्याला तें झालें नाहीं त्यानें स्वतःलाच बुडवलें ! तो दुसऱ्याला काय जिंकणार ? (हुजऱ्या चिठी आणून देतो ती वाचून) बाबासाहेब, पद्मावती फौजेसह किल्ल्याजवळ येऊन पोंचली आहे.

**भीमसिंग**:–( स्वगत ) येऊं दे ! हें मूर्खपणाचें धाडस ती करणार नाहीं असें मी मानीत होतों. पण तिनें तें केलें तरी काय चिंता आहे ? त्यावरसुद्धां खाशी तोड योजून ठेवलीच आहे !

**दुर्गावती**:–माझ्या नवऱ्याला ताबडतोब सोडून देत नसाल तर मी हल्ला करून किल्ला घेतें असा तिचा निरोप आहे. आणि तो तुम्हाला समक्ष कळवण्याकरतां तिच्याकडून वकील आला आहे.

**भीमसिंग**:–बरें आहे. ( हुजऱ्यास ) बाहेर पद्मावतीचा वकील आला आहे त्याला माझ्यापर्यंत घेऊन ये.( हुजऱ्या जातो व वकिलास घेऊन येतो. ) या वकील ! बसा.

**वकील**:–राजेसाहेब, पद्मावतीदेवीची तुम्हांला अशी आज्ञा आहे कीं–

**भीमसिंग**:–हां हां. थांबा. तिच्या अर्जाची सुनावणी दुर्गावतीनें केली आहे.

**वकील**:–अर्ज ? तुम्हाला अर्ज ? माझी मालकीण हुकूम करीत असते. कुणाला अर्ज बिर्ज करायचें तिला ठाऊक नाहीं ! ( जाऊं लागतो. )

**दुर्गावती**:–( वकिलास ) थांबा. ते काय म्हणतात तेवढें ऐकून घ्यां. नुसत्या निरर्थक शब्दांची मातब्बरी काय मानतां ! ज्येष्ठमध म्हटल्यानें तो मधापेक्षां गोड होत नाहीं कीं अतिविष म्हटल्यानें तें विषापेक्षां कडू ठरत नाहीं ! बसा.

**भीमसिंग**:–आज आमचा घातवार आहे. उद्यां आम्ही किल्ल्याखालीं येऊं आणि टकमकीच्या कड्याखालीं पद्मावतीची व आमची भेट होईल. त्यावेळीं लक्ष्मणसिंगाला कोणत्या शर्तीवर सोडावें याची वाटाघाट कर-

ण्यांत येईल. आम्ही खालीं येऊं ते आम्हांला निर्भयपणानें वागतां येईल, शत्रु दगा करूं शकणार नाहीं, अशा बंदोबस्तानेंच येऊं. पद्मावतीनेंही वाटेल तर तशा बंदोबस्तानें भेटीला यावें. भेटीच्या ठिकाणीं मात्र पांचांपेक्षां अधिक माणसें उभयपक्षीं बरोबर आणूं नयेत. तिची व आमची भेट होऊन आम्ही किल्ल्यावर परत येऊंपर्यंत उभयपक्षीं शत्रुत्वाचें कोणतेंही कृत्य होऊं नये. जा. याप्रमाणें तुमच्या धनिणीला आमचा निरोप कळवा. दुर्गावती, तूंही आपल्या वतीनें याच मजकुराचें पत्र आपल्या मैत्रिणीला लिहून यांच्याबरोबर पाठवून दे. ( वकील व दुर्गावती जातात. ) त्या दिवशीं लक्ष्मणसिंग दरबारांतून जातांना काय बडबडून गेला तें ? ( आठवून ) हो ! काय म्हणे पांच पन्नास बळी घेतल्याशिवाय हा लक्ष्मणसिंग कुणाच्या हातीं लागणार नाहीं ! बरें सांगितलेंस बाबा ! बरें सांगितलेंस ! स्वतःला तूं तिस्मारखान अथवा चाळीसमारखान म्हणवीत असशील, पण तुला तीस चाळीस बळी द्यायला माझे शिपाई फुकाचे नाहीं लागले ! आणि तुला पकडायला इतका प्रयास पाहिजे कशाला ? आज तुझ्या अन्नसामग्रींत अमली पदार्थ बेमालूम मिसळून देतों आणि तुला बेशुद्ध पाडून बिडी ठोकून पुन्हां कैदखान्यांत ठेवून देतों ! हो, उद्यां मला तुझा मोठा उपयोग करून घ्यायचा आहे ना ? तुला मोकळा सोडून कसें चालेल ? मात्र हें सारें दुर्गावतीला न कळत पार पाडलें पाहिजे. छे. छे. तिला यांतला सुगावा लागला तर घात करील पोरटी ! (जातो. )

---

## प्रवेश तिसरा.

स्थळ—पद्मावतीची छावणी.

( वेत्रवती येते. )

**वेत्रवतीः—**

### पद.

( चाल—गजल. )

**रघुनाथ बद्ध पाशीं । केला न सोडि त्यासीं ।**
**भरला अहीस ताठा । म्हणवी बलाढ्य मोठा ॥ ध्रु० ॥**

प्रभुची अगाध लीला । करि वज्र ती फुलाला ।
पति सोडवोनि माहिला । अहिला हि दंडि माहिला ॥ ०

( जाते. )

---

## प्रवेश चौथा.

**स्थळ**—माणिकदुर्ग. टकमकीच्या कड्याखालचा जंगली प्रदेश.

( एके बाजूस भीमसिंग व त्याचे सरदार उभे आहेत. दुसऱ्या बाजूस पद्मावती व तिचे सरदार उभे आहेत. )

**पद्मावतीः**—भीमसिंगराजे, आठ दिवसांत महाराजांना सोडून देतों असा तुमचा निरोप आला होता त्याप्रमाणें तुम्ही वागलां नाहीं; सबब त्यांना नेण्याकरतां मला फौजेसुद्धां पुढें चाल करून येथपर्यंत यावें लागलें. आतां त्यांना या लष्करांत ताबडतोब पोंचते करा म्हणजे आम्ही याच पावलीं परत जाऊं. माझ्या बाजूनें जरी युद्धाची जय्यत तयारी आहे तरी स्त्रीस्वभावाला अनुसरून मी युद्धकर्माचा कंटाळा करतें. जर सामोपचारानें माझें कार्य घडून येईल तर तें मला अत्यंत प्रिय आहे.

**भीमसिंगः**—आणि मीसुद्धां जरी युद्धाची तयारी केलेली आहे तरी तें युद्ध एका स्त्रीशीं कर्तव्य असल्यामुळें माझें मन निरुत्साह होतें; आणि या प्रकरणीं सामाचाच उपाय मला समर्पक वाटतो. पूर्वी कबूल केल्याप्रमाणें लक्ष्मणसिंगाला सोडून देण्याची माझी मर्जी अद्याप कायम आहे. परंतु तुझ्या दबकावणीमुळें मीं त्याला सोडलें असा दुर्लौकिक मी कधीं करून घेणार नाहीं. जर आपला मनोरथ सिद्धीस जावा अशी तुला उत्कंठा असेल तर या क्षणीं तूं आलीस तशी परत निघून चालती हो. तूं पांच चार मजली गेलीस अशी बातमी आली म्हणजे मी लक्ष्मणसिंगाला सोडून देईन.

**पद्मावतीः**—तुमच्या म्हणण्याप्रमाणें वागायला कांहीं हरकत नव्हती. परंतु तुम्ही आपल्या शब्दाची पत ठेवली नाहीं. तुम्ही दोनदां दगा केला आहे ते तिसऱ्यानदां करायला चुकणार नाहीं, ही माझी खात्री

होऊन चुकली आहे. आतां असल्या भुलथापांनीं पद्मावती फसेल असें मानूं नका. महाराजांना तुम्ही सोडणार कीं नाहीं याचा जबाब तुम्हांकडून सरळ स्पष्टपणानें आला पाहिजे.

**भीमसिंगः**—बरें, तुझें मागणें मी मान्य करीत नाहीं असा जबाब तुला दिला तर काय करशील ?

**पद्मावतीः**—काय करीन ? युद्ध करून तुमचा पराजय करीन, तुमचें राज्य घेईन, आणि महाराजांना सोडवून नेईन.

**भीमसिंगः**—माझा पराजय तूं करणार ? हें तुझें बोलणें आजपर्यंत एक वेळ शोभलें असतें. पण अजून सुद्धां या गर्वोक्तीच्या वल्गना तूं करते आहेस यावरून कुमार हिरासिंग आपल्या प्रचंड फौजेसह माझ्याजवळ येऊन ठेपला आहे, ही बातमी तुला माहीत नसावी.

**पद्मावतीः**—माहीत नसायला काय झालें ? यावेळीं तुमचा मुलगा अगदीं तुमच्याजवळ आलेला आहे आणि त्याच्याबरोबर फौज आहे ती प्रचंड असून स्वतःला अजिंक्य म्हणवते हें सर्व मला माहीत आहे !

**भीमसिंगः**—जर माहीत आहे तर आम्ही दोघे एक होऊन याच वेळीं तुझ्या सैन्यावर चढाई केली तर काय दशा होईल याचा विचार तूं कां करीत नाहींस ? एका घटकेंत तुझी दाणादाण होऊन तुला सैरावैरा पळत सुटावें लागेल हें भय तुझ्या गांवींही वसत नाहीं हें मोठें आश्चर्य आहे !

**पद्मावतीः**—यांत कसलें आहे आश्चर्य ? तुम्ही दोघे एक झालांत तरी माझ्या प्रभावापुढें क्षुद्रच आहां ! तुम्ही माझी यत्किंचित् हानि करूं शकाल हें भय मानण्याचें मला काय कारण ? मेघ आणि अंधार एक झाले तरी ते उदयोन्मुख उषा देवीचें दिव्य तेज आच्छादूं शकत नाहींत. वृक्षांतून वहाणारा रस आणि फुलांतला मध हे एक झाले तरी त्यांना दावाग्नीची ज्वाळा कशी शमवतां येईल ? नदीचा पूर थांबवण्याकरतां मुलखांतलीं कोल्हीं कुत्रीं एक झालीं आणि नदीचें पाणी पिऊन आटवूं म्हणूं लागलीं तर त्यांचा हट्ट कितपत तडीला जाईल ? या जर गोष्टी सिद्ध होणाऱ्या नाहींत, तर तुम्ही बापलेंक एक झालांत म्हणून पद्मावतीचा कोणता उप-

मई करूं शकाल ? तुम्हां दोघांचीही मी कांहींच गणना करीत नाहीं हें दाखविण्याकरतां प्रत्यक्ष तुमच्या देखदेखत हा तुमचा राजधानीचा किल्ला हां हां म्हणतां कसा कावीज करतें पहा !

**भीमसिंगः**—या माणिकदुर्गाकडे नुसतें पहाण्याचीसुद्धां आजपर्यंत कोणा शत्रूची छाती झाली नाहीं, यावरून तो कसा दुर्भेद्य आहे हें दिसतेंच आहे !

**पद्मावतीः**—तुमच्या किल्ल्याकडे आजपर्यंत कोणाही शत्रूनें ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं यावरून तो किती क्षुद्र आहे एवढेंमात्र दिसतें खरें ! कावळे गिधाडें एखाद्या अवघड जाग्यावर घरटीं बांधतात त्याप्रमाणें तुम्ही या अवघड डोंगरावर घरटें केलेंत म्हणून त्याला कोणी किल्ला म्हणत नाहींत ! माझ्या पराक्रमी योद्ध्यांना असले अवघड डोंगर चढून कावीज करणें म्हणजे नुसता पोरखेळ आहे ! मी म्हणतें याचा अनुभव तुम्हांला कदाचित् इतक्यांतच दिसून येईल.

**भीमसिंगः**—एवढा वेळ झालेल्या प्रश्नोत्तरांवरून पाहिलें तर तूं स्वतःचे आणि आपल्या हजारों सैनिकांचे प्राण पणाला लावून युद्धाचा जुगार खेळायला तयार झाली आहेस, आणि मला कस्पटाप्रमाणें तुच्छ लेखते आहेस, यांत संदेह राहिला नाहीं. स्त्रियेच्या तोंडून असलीं वीरोक्तीचीं भाषणें ऐकणें ही एक मौजेची करमणूक आहे, आणि तिचें पर्यवसान करमणुकीवरच थांबलें पाहिजे. या तुझ्या अमर्याद उच्छृंखलपणाबद्दल तुला शिक्षा करणें मोठेंसें अवघड आहे असें नाहीं. पद्मिनीच्या सौंदर्याचा आणि सुगंधाचा बडेजाव कोठपर्यंत, तर हत्तीनें पाय देऊन चिरडून टाकलें नाहीं तोंपर्यंत ! पद्मावतीच्या प्रभावाची आणि धैर्याची प्रशंसा कोठपर्यंत, तर महाराजा भीमसिंगानें तरवार उपसून ती एक दोनदां परजली नाहीं तोंपर्यंत ! परंतु या भीमसिंगालाही असा विचार करावा लागतो कीं, अबलेवर हत्यार परजून कोणतें भूषण प्राप्त होणार आहे ? पद्मावतीला हटकून पळवून लावणारें अमोघ अस्त्र त्याच्या संग्रहीं असतां त्यानें युद्धाच्या भानगडींत पडून उपहासाला पात्र कां व्हावें ? पद्मावती, तुला मी सौजन्यानें गोड शब्दांनीं सांगतों आहें कीं तुझ्या नवऱ्याला मी सोडून देणार आहें. मात्र तूं या क्षणीं माझ्या आज्ञेप्रमाणें इथून गेलें पाहिजे. याप्रमाणें वागलीस तर त्याचा परिणाम गोड होईल. न वागलीस तर तुला

फार फार दुःख होईल आणि जलदी जलदीनें पळून जावें लागेल तें वेगळेंच ! एवढा वेळ तुझा वावदूकपणा मीं सहन केला. परंतु तो बंद करून तुला थरथर कांपायला लावणारी अशी एक पांडित्याची बिनतोड कोटी माझ्याजवळ आहे तिचा उपयोग मला आतां करावा लागेल.

**पद्मावतीः**–( स्वगत )या दुरात्म्याच्या भाषणाचा काय अभिप्राय आहे याचा कांहीं एक तर्क चालत नाहीं. ( उघड ) अरे पाखंडपंडिता ! तुझ्या सर्व कोट्यांचें खंडन करणारी माझ्या संग्रहींसुद्धां एक कोटी आहे हें ध्यानांत ठेव ! तुझ्या दगलबाजीच्या कल्पना तर्कानें ओळखून त्या कुंठित करण्याचे उपाय मीं आगाऊच योजून ठेवले आहेत व त्यामुळें मी निर्भय आहें. तूं मात्र लढाईच्या हट्टाला पेटून फुकट फुकट प्राणाला मुकणार आहेस !

## पद ३१

राग बहार. ताल त्रिवट.

**भडकतां ज्वाला शलभा झंपोनि जासि लया उगला ॥**
**बलोद्दाम मम सेना पाहासि नाशाया सर्प भेकें काधिं वधिला ॥**

**भीमसिंगः**–पद्मावती ! कशाला तुझ्या बळाची प्रतिष्ठा मिरवतेस ? त्याचा तुला काय उपयोग होणार आहे ? तुझा प्राण घेणारा सर्प तुझ्या डोक्यावर आहे आणि विषमारक वनस्पति आहेत त्या हिमालयावर आहेत ! त्या तुझ्या उपयोगीं कशा पडतील ? तूं चतुर असशील तर यांत तुला सर्व समजून येईल.

**पद्मावतीः**–राजा, सर्प डोक्यावर बसूं देण्याइतकी मी बेफाम राहिलें नाहीं. तो सर्प माझ्यासमोर आहे तो मला दिसतोच आहे. तो माझ्या डोक्यावर चढणार असें जर दिसून येईल तर त्याचें जागच्या जागीं डोकें ठेंचण्याची दक्षता मीं ठेवली आहे.

**भीमसिंगः**–तुझ्या डोक्यावर सर्प आहे असें मी म्हणतों आहें आणि तें नाकबूल करण्याचें तूं धारिष्ट करतेस ? तर मग पहा पहा ! वर पहा ! कड्याकडे नजर लाव ! आणि सांग मला कीं तुझा प्राण घेणारा सर्प तुझ्या डोक्यावर आला आहे कीं नाहीं ? (पद्मावती वर पहाते तों कड्याच्या टोंकावर उभा असलेला व वधाकरितां विकृत वेषानें सजविलेला लक्ष्मणसिंग तिच्या दृष्टीस पडतो. )

**पद्मावतीः**–(गोरी मोरी होते व भीमसिंगाकडे भयचकित मुद्रेनें पहाते.) हाय हाय रे दैवा ! प्राणेश्वरांचें पहिलें दर्शन आणि तें अशा अवस्थेंत !

**भीमसिंगः**–हेंच पहिलें दर्शन आणि कदाचित् हेंच शेवटचें दर्शन !

**पद्मावतीः**–देवा चंद्रशेखरा ! हें काय पहायचें कपाळीं आणलेंस !

**भीमसिंगः**–ही भीमबहाद्दराच्या कल्पनेची चमत्कारचातुरी ! ही तुझ्या काळजाची ठाव घेणारी भयंकर सुरी ! ही अस्मानांत भरारी मारण्याची तयारी ! ( पद्मावती लक्ष्मणसिंगाकडे टक लावून पहाते व रडूं लागते. ) पद्मावती ! काय हें ? इतक्यांत तूं रडूं लागलीस ? दर्पानें फोंफावणारी तूं नागीण–कत्तल करण्याच्या वल्गना करणारी तूं वाघीण–इतक्यांतच गाई-प्रमाणें दीन झालीस ? हा वेळपर्यंत चाललेल्या तुझ्या कल्पना आणि जल्पना कोणीकडे गेल्या ? अजूनसुद्धां मी तुला करपटाप्रमाणें वाटतों काय ? जर वाटत असेन तर ऐक माझे निखाऱ्यासारखे जळजळीत शब्द ! कड्याच्या ज्या टोंकावर लक्ष्मणसिंग उभा आहे तीं गुन्हेगारांचा कडे-लोट करण्याची जागा आहे. ते इथे येतांच काळाच्या अंधकारमय अनंत उदरांत उडी घेण्यापूर्वीं या प्रदेशाच्या विक्राळ स्वरूपाकडे टकमक पाहूं लागतात, म्हणून त्या जाग्याला सुद्धां टकमक हें नांव आहे. निघून जाण्याविषयीं तुला सौम्य शब्दांनीं आज्ञा केली असतां ती तूं मानली नाहींस त्यामुळें तुला ताळ्यावर आणण्याचा तत्काळ कडक उपाय करणें मला जरूर वाटलें; आणि त्यासाठीं तुझ्या नवऱ्याचा कडेलोट करावा म्हणून त्याला या टकमकीवर उभें केलें आहे. माझ्याकडून इशारा होण्याचा अवकाश–कीं लक्ष्मणसिंगाला वरून लोटून दिलें जाईल आणि त्याचें शरीर जमिनीवर आदळून त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होतील! हें संकट तूं आपणावर मुद्दाम ओढून आणलेंस. पातिव्रत्याचा टेंभा पाज-ळतां पाजळतां अखेरीस त्याचा उपयोग पतीची चिता पेटवण्यांत केलास ! ज्याचे हातपाय शिळेखालीं अडकले आहेत त्यानें मस्ती करतां कामा नये. केली असतां सुटका तर व्हायचीच नाहीं. उलट जीवमात्र वेदनांनीं व्याकुळ होईल ! ज्याची मान फांसांत अडकली आहे त्यानें धडपड करतां कामा नये. केली असतां मान मोकळी होण्याऐवजीं प्राणमात्र निघून जाईल ! ज्या स्त्रीचा नवरा शत्रूच्या हातांत अडकला आहे त्या स्त्रीनें त्या शत्रूचें

मन दुखवण्याच्या रंगढंगा करूं नयेत. केल्या असतां नवऱ्याची सुटका होण्याऐवजीं जगांतून त्याची कायमचीच सुटका होईल ! हें व्यवहाराचें सामान्य चातुर्यही तुला असूं नये काय ? असो. आजपर्यंत तूं मूर्खपणा केलास तो केलास. आतां तरी माझ्या प्रश्नाला उत्तर दे कीं तूं स्वदेशाचा मार्ग पुसणार कीं कपाळाचें कुंकूं पुसणार ? माझ्याजवळ सौभाग्याची भिक्षा मागणार कीं वैधव्याची दीक्षा घेणार ? गमन करणार कीं सहगमन करणार ? पळून जाणार कीं जळून जाणार ? सांग.

**पद्मावतीः**–( आंसवें पुसून संतापानें ) अरे अधमाधमा ! राक्षसा ! कोण लोक तुला भीमसिंह म्हणत असतील ते म्हणोत; मी तर तुला आजपर्यंत ग्रामसिंहच म्हणत आलें आहें. आणि एवढा वेळ तूं त्याप्रमाणेंच आचरण केलेंस! झालें तुझें भुंकून ? नसेल तर आणखी भुंकून मनाची हौस पुरवून घे. तुझ्या अभद्र शब्दांची बिरुदावलि जर आणखी कांहीं शिल्लक असेल तर तिचाही उच्चार करून मोकळा हो ! माझी हरकत नाहीं. कारण कावळ्याच्या शापानें गाय मरत नसते अशी म्हण आहे. मग जिला तूं नागीण अथवा वाघीण म्हटलेंस तिनें तुझ्या शिव्याशापांची क्षिति काय मानायची आहे ? मी रडूं लागलें एवढ्यावरून धर्यानें मला सोडलें, मी दीन झालें, असें तूं समजलास ! पण मूर्खा ! तुला हें कळायला पाहिजे होतें कीं, तेजस्वी महापुरुषावर आलेला विपत्तीचा फेरा सर्वांच्याच उद्वेगाला कारण होत असतो. वासरमणीला राहूनें जरी क्षणभर ग्रस्त केलें तरी सुद्धां सर्व विश्व हळहळत असतें हें जर अनुभवसिद्ध आहे, तर हा वीरप्रवीरांचा मुकुटमणि–हा साम्राज्यलक्ष्मीचा कंठमणि–हा महन्मणिमालेचा मध्यमणि–तुझ्या दौर्जन्याच्या उपाधीमुळें स्वतेजाची हानि पावला, हें पाहून कोणाला दुःख होणार नाहीं ? त्यांतून मी तर त्याची धर्मपत्नी. मला रडूं आल्याखेरीज कसें राहील ? पण हा जो तूं माझ्यावर जय मिळवलास तेवढ्यावरून आपण कांहीं मोठें शतकृत्य केलें असें मात्र समजूं नको. जसा राहूचा जय अल्पकालीन असतो तसा तुझाही जय क्षणिकच आहे.

**भीमसिंगः**–क्षणिकच आहे ? एका अर्थानें तूं म्हणतेस तेंही खरें आहे. कारण प्रत्येक क्षण लक्ष्मणसिंगाच्या आयुष्याचीं वर्षं गटागट पीत आहे !

**पद्मावती**:–माझ्या भर्त्याला मार्कंडेयाचें आयुष्य आहे ! त्याचा क्षय कोण करूं शकेल ?

**भीमसिंग**:–दुर्दैवी स्त्रिये ! लक्ष्मणसिंगाच्या आयुष्याचे क्षण आतां नक्षत्रांच्या अथवा राशींच्या संख्येइतकेसुद्धां राहिले नाहींत, असें असून तूं त्याला मार्कंडेयाचें आयुष्य आहे म्हणतेस ? असेल बुवा ! नाहीं कुणी म्हणावें ? तुझ्या पातिव्रत्याचें तसेंच कांहीं अलौकिक तेज असेल तर तें आतां दिसेलच !

**पद्मावती**:–त्याबद्दल मीं आपल्याच तोंडानें काय बोलावें ? पण इतकें मात्र खात्रीनें सांगतें कीं, माझ्या पातिव्रत्याचें तेज तुझें तोंड काळें ठिक्कर पाडायला पुरेसें आहे.

**भीमसिंग**:–( क्रोधानें ) बरें बरें ! आतां कुणाचें तोंड काळें ठिक्कर पडतें तें पाहूं या. मी हात वर करतांच डोळे मीट आणि तुला पंचप्राणात्मक वाटणारीं तुझ्या नवऱ्याच्या नांवाचीं पांच अक्षरें ल-क्ष्म-ण-सिं-ग अशीं उच्चार, आणि डोळे उघड; म्हणजे तो तुझ्या आणि माझ्या पायाशीं दंडायमान पडलेला दृष्टीस पडेल ! माझी प्रतिज्ञा तुझ्या अवज्ञेमुळें अशी विपरीत प्रकारानें पूर्ण होणार असेल तर होईना ? ( हातरुमाल तीनदा गरगर फिरवतो व खालीं टाकतो. पद्मावती व तिचे सरदार हंसतात. भीमसिंग व त्याचे सरदार आश्चर्यचकित होऊन कड्याकडे निरखून पाहतात. ) आं ! हें असें कसें होतें आहे ? संकेताप्रमाणें इशारा दिला असतां अजून त्याला लोटून देत नाहींत ! काय करावें !

**पद्मावती**:–टकमकीकडे टकमक पहात रहावें !

**भीमसिंगाचा प. सरदार**:–( जागा बदलून कड्याकडे निरखून पाहतो. ) सरकार, ही कडेलोटाची कामगिरी ज्यांच्यावर सोंपवली होती त्या मांगांपैकीं एकसुद्धां मांग लक्ष्मणसिंगाजवळ दिसत नाहीं.

**भीमसिंग**:–एक देखील नाहीं ? पागल अदमी ! आयत्या वेळीं भयानें गांगरून पळून गेले म्हणावें कीं काय !

**भीमसिंगाचा दु. सरदार**:–( दुसऱ्या जाग्यावरून कड्याकडे पहातो व घाबरतो. ) महाराज ! दगा झाला ! शत्रूच्या सैनिकांच्या झुंडीच्या झुंडी या टकमकीच्या कड्यावरून फिरतांना दिसताहेत ! त्यांच्या रंगीबेरंगी

पोषाखांनीं हा कडा फुलून गेल्यासारखा भासूं लागला आहे ! महाराज ! सर्वस्व बुडालें ! नाश झाला ! किल्ल्याची ही बाजू शत्रूनें बळकावली !

**भीमसिंगः**–( पाहून आश्चर्यानें ) होय होय. खरेंच कीं ! पद्मावती ! मी किल्ल्यावर परत जाईपर्यंत उभयपक्षीं शत्रुत्वाचें कृत्य होऊं नये असा करार ठरला असतां तो तूं मोडलास आणि विश्वासघात करून माझ्या किल्ल्यावर हा अकल्पित घाला घातलास !

**पद्मावतीः**–असें काय ? हे करार मोडल्याचे सवाल आतांच बरे सुचूं लागले ? एवढा वेळ तूं केलेंस हें कांहीं तुझ्या मतानें शत्रुत्वाचें कृत्य नव्हेच एकूण ! तो तुझ्या स्नेहाचा पूर टकमकीच्या कड्याखालीं उडी घेत होता वाटतें ! ज्याला आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं त्याला दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ बरें दिसतें ? माझ्यापुरतें विचारशील तर मीं करार मोडला नाहीं. मात्र तुझ्या दगलबाजीला अवसर सांपडूं नये इतक्यापुरता जेवढा बंदोबस्त करणें मला योग्य वाटलें तितका मीं केला आहे. विश्वासघात करणें हा तुझा जातिस्वभाव असल्यामुळें इतका सावधपणा ठेवणें मला तूं भाग पाडलेंस. काल जेव्हां तूं या टकमकीच्या कड्याखालीं माझी भेट घेण्याचा संकेत ठरवलास त्याच वेळेपासून तूं कोणत्या उपायानें दगा करणार याविषयीं आमचे तर्क सुरू झाले. भेटीच्या वेळीं तूं कड्यावरून आमच्या डोक्यावर शिळा लोटून देशील, अथवा सुरुंग लावून डोंगराचा एखादा कपरा आम्हांवर पाडशील, किंवा कुठून तरी तोफा मारून आमचे प्राण घेशील, हीं भयें आमच्या डोळ्यासमोर उभीं राहिलीं; आणि त्यांचा सं[illegible] टाळण्याकरतां आज पहांटेस फौजेची एक टोळी निराळ्याच एका वाटेनें मीं या कड्यावर चढवून जागोजाग दडवून ठेवली. तुझी आमची भेट चालू असतां माझ्या फौजेनें हा डोंगर ताब्यांत घेऊन पहारा करीत हिंडावें अशी माझी आज्ञा होती त्याप्रमाणें ती फिरत आहे. आतां एवढें मात्र खरें कीं, ही तुझी कडेलोटाची कल्पना आमच्या मनांत आली नव्हती ! कडेलोटाचा दुष्टपणा दाखवण्यांत तूं दुष्टपणाचा कडेलोटच करून दाखवलास ! असो. आमच्या बचावासाठीं म्हणून जी आम्हीं तजवीज केली तिनेंच या भयंकर प्राणसंकटापासून महाराजांचा बचाव आपोआपच केला आहे. हें चुडेदान मला दहाव्या मंगळानें दिलें

आहे. बाराव्या बृहस्पतीप्रमाणें तूं दावा साधायला चुकला नव्हतासच. पण तारत्यापुढें मारत्याचा हात चालत नाहीं हेंच अखेरीस खरें ठरलें ! ( कित्येक शिपाई लक्ष्मणसिंगाजवळ येऊन त्याची बिडी काढतात तें पाहून हर्षानें )शाबास ! शाबास ! महाराजांच्या बंधमोचनाचा पहिला मान ज्यानीं मिळवला त्यांच्या दैवाचा धन्यवाद किती वर्णावा ! ( पडद्यांत तोफांचे बार होतात व मोठा कलकलाट होतो. )

**भीमसिंगः**–( सचिंत मुद्रेनें ) हा काय गलबला आहे ? माझ्यावर इथेच कांहीं गहजब करण्याचा बेत ठरला आहे कीं काय ?

**पद्मावतीः**–घाबरूं नकोस. तुला किल्ल्यावर सुखरूप जाऊं देण्यापुरती दुर्गावतीची जामीनगत आहे ती मी अक्षरशः पाळीन. त्यांत माझ्याकडून कसूर होणार नाहीं. हा गलबला कशाचा आहे हें अजून नाहीं तुझ्या लक्षांत येत ? त्या टकमर्कीच्या टेंकाडावर उभे राहिलेले महाराजे लक्ष्मणसिंग आपल्या सर्व फौजेची सलामी घेत आहेत ! सेनापतीच्या नात्यानें ती सलामी त्यांना सर्वांआधीं देणें हें माझें कर्तव्य आहे. (गुडघे टेंकून मस्तकावर ओंजळ धरते. नंतर उभी राहून क्षणभर हात जोडून लक्ष्मणसिंगाकडे पहाते. ) काय करावें ? धांवत जाऊन यांच्या चरणाला मिठी घालीन म्हटलें तर हा डोंगराचा कडा आठव्या मंगळासारखा माझ्या कल्याणाआड उभा राहिला आहे ! भीमसिंगा, आज माझ्या सर्व श्रमांचें साफल्य झालें. मी कृतार्थ झालें. यांच्या जीवाला तूं केव्हां कसा अपाय करशील, या चिंतेमुळें माझा जीव रात्रंदिवस माशासारखा तळमळत होता. त्या चिंतेचा परिहार तूं आज आपण होऊन केलास! तूं जिचा सर्वस्वी घात करायला गेलास तिचेंच न कळत कोटकल्याण साधलेंस ! नादान मनुष्या ! तुझे सर्व डावपेंच तुझ्याच गळचेपीला कारण झाले आहेत. हा जो कापट्याचा जुगार तूं खेळलास त्यांत तूं हरला आहेस. दैवानें तुझ्याकडे पाठ फिरवली आहे. अजून तरी शहाणा हो ! कृतकर्माबद्दल पश्चात्ताप पाव, आणि लीन हो ! तुझ्या पाषाणहृदयाला अजून तरी सद्वासनेचा द्रव फुटूं दे !

**भीमसिंगः**–दुष्टे ! बायकांची बुद्धि उतावळी म्हणतात तें खोटें नाहीं. जयश्रीनें तुझ्याकडे क्षणभर तोंड फिरवलें न फिरवलें तों इतक्यांतच तूं मला

धर्मोपदेशाच्या गोष्टीसुद्धां सांगूं लागलीस! पण अजून तूं जिंकलें नाहींस! तुझा नवरा माझ्या कैदेंतून सुटला तरी तो मी तुझ्या हाताला जिवंत लागूं देईन अशी आशा केव्हांही धरूं नकोस. तो आणि त्याचे शिपाई या टकमकींच्या कड्यावर भले चांगले कोंडमाऱ्यांत सांपडले आहेत. आतां ते कुणीकडे पळून जातील? किल्ल्याच्या चांदबुरजावरून तोफेचा मारा या कड्यावर चालतो ही या किल्ल्याची गुरुकिल्ली कुठे तुला माहीत आहे? या क्षणीं वर जातों आणि तोफा चालवून लक्ष्मणसिंगासुद्धां तुझें माणसानूमाणूस मारून काढतों; आणि हिरासिंगाचा हल्ला आणवून फौजेसकट तुलाही मारून टाकतों!

पद्मावतीः–(वेडावते.) मारून टाकतों! निर्लज्जा! अजूनसुद्धां मारून टाकण्याच्या बकवा चालल्याच आहेत! अरे मानवजातीच्या कलंका! अशीं तूं पातकांचीं पुटावर पुटें अंगावर चढवून भूमीला भारभूत झाला आहेस तरी ती दुभंग होऊन तुला गिळून टाकीत नाहीं, यावरून तिला क्षमा हें नांव पडलें आहे तें यथार्थ ठरतें. पण माझ्या क्षमेनें आतां अवसान सोडलें! तुझ्या घोर अन्यायांचा भार तिला याउपर सहन होत नाहीं. अद्यापि तूं निर्भयपणानें धमकावणीच्या गोष्टी मला सांगतो आहेस तो तूं मला काय समजतो आहेस? तूं कोणत्या घमेंडींत आहेस? आज कित्येक दिवस तुझी नरडी माझ्या मुठींत सांपडलेली आहे, जरा मूठ दाबली तर तत्काळ मरून उताणा पडशील, हें झणझणीत अंजन तुझ्या डोळ्यांत कोंबून दिलेंच पाहिजे कीं काय? तर मग पहा हा देखावा! डोळे फाडून पहा! (जंगलाची जाळी दूर होते. तोफेच्या तोंडाला हिरासिंग बांधलेला आहे, खलाशी तोफ धरून उभे आहेत. गोलंदाज तोडा शिलकावून बत्ती देण्याच्या तयारींत आहे, असा देखावा दृष्टीस पडतो.) भाग्यहीना! हा तुझा मुलगा मी तोफेला बांधलेला आहे. याचा चेहरा एकदां नीट न्याहाळून घे. कारण हा पुन्हा तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं. ज्याच्याकडून हल्ला करवून माझी कत्तल करवण्याच्या उड्या मारीत होतास तो हा तुझा पोर—महाराजांना धरण्याच्या कामीं तुझ्या दगलबाजीचा साथीदार झालेला वध्य अपराधी—पुढच्या क्षणीं माझ्या क्रोधाच्या आणि तुझ्य प्रेमाच्या पल्ल्याबाहेर निघून जाणार आहे! (हिरासिंगास पाहून भीमसिंग मूर्च्छित होतो. त्याचे सरदार त्यास सावध करितात.)

**भीमसिंग**:–हाय रे हाय ! माझा बाळ ! माझ्या जिवाचा विसावा ! माझ्या सुखाचा ठेवा ! माझ्या ताइताचा हिरा ! याला मरणाच्या दारांत उभा राहिलेला पहाण्याकरतां मी जगलों काय ? राक्षसणी ! हा माझ्या काळजांत केव्हां खंजीर खुपसलास हें कळूं देखील दिलें नाहींस ! ( दांत ओंठ चावीत ) जर तूं याला पकडलें आहेस हें आजपर्यंत मला कळलें असतें, तर हा तुझ्या हातून सुटेपर्यंत मी लक्ष्मणसिंगाच्या अंगाला पेटवलेल्या दिवट्या लावलावून त्याला होरपळीत राहिलों असतों !

**पद्मावती**:–होय. तूं तसाच दिवटा आहेस हें मला माहीत होतें आणि त्यासाठींच ही बातमी आजपर्यंत मीं तुला कळूं दिली नाहीं ! तूं बेफाम रहावेंस म्हणून आपण खुशाल आहों अशा मजकुराचीं पत्रें मींच याच्या हातून लिहवून तीं तुझ्याकडे जातील अशी तजवीज केली !

**भीमसिंग**:–( रडत ) बाळा हिरा ! मला हर्षानें नाचायला लावणारीं तीं तुझीं पत्रें कुणीकडे आणि हा विपरीत प्रकार कुणीकडे ? कालच तसलें एक पत्र माझ्या हातीं आलें आणि त्यांत मी जवळ आलों आहें आणि माझ्याबरोबर मोठी फौज आहे असें लिहिलेलें होतें !

**पद्मावती**:–मग ? त्यांत काय खोटें होतें ? हिरासिंग किती जवळ आलेला आहे हें तूं पहातोसच आहेस ! आणि त्याबरोबर मोठी फौज आहे खरीच ! मात्र ती त्याची नसून माझी आहे एवढाच काय तो फरक ! असो. हिरासिंगाची वार्ता आजपर्यंत छपवून ठेवण्यांत माझा उद्देश होता तो सिद्धीस गेला आहे. आतां छपवाछपवी कशाला पाहिजे ? याला सोडण्याच्या शर्तीवर महाराजांना सोडवून घ्यावें असा माझा बेत होता तोही आतां आपोआपच रहित झाला. आतां याला जिवंत ठेवण्याचें मला काय कारण ? या क्षणीं तोफेला बत्ती देऊन तुझ्या देखतच याला उडवून देतें ! एकदां याला डोळे भरून पाहून घे. पुन्हां याचें दर्शन दुर्लभ आहे. कारण याच क्षणीं याच्या शरीराच्या चिंधड्यान् चिंधड्या होऊन याचें मांस आभाळांत गिधाडें परस्परच खाऊन टाकतील आणि रक्ताचे शिंतोडे आणि हाडांचे तुकडेमात्र जमिनीवर पडतील ! देऊं गोलंदाजाला इशारा ?

**भीमसिंग**:–( पाया पडतो. ) नको नको ! देवी पद्मावती ! माझ्या बाळाला मारूं नकोस. मी तुला शरण आलों. दया कर.

**पद्मावती**:—काय म्हणून दया करूं? आपला मतलब साधण्यासाठीं स्त्रियेसमोर तिच्या नवऱ्याला उभें करून त्याला ठार मारूं पाहणारा तूं खरोखर नीचांतला नीच अथवा नीचांतला उच्च आहेस, हें ज्ञान माझ्या अनुभवाचें आहे. मी तुझ्यावर कशी दया करावी? तथापि दयासागर लक्ष्मणसिंग महाराजांची मी पत्नी आहें. त्यांच्या नांवासाठीं तरी तुझा दयेचा अर्ज मला विचारांत घ्यावा लागतो. ठीक आहे. या वेळीं हिरासिंगाला तोफेच्या तोंडीं देण्याचें मी तहकूब करतें, आणि सुमार्गाला लागण्याची तुला आणखी एकदां संधी देतें. आतां तरी तुझ्या मनांत उमज पडूं दे कीं, तुझें राज्य हें लक्ष्मणसिंग महाराजांचें राज्य आहे. हुजूरची स्वारी किल्ल्याची एक बाजू काबीज करून बसलीच आहे. फक्त किल्ल्यावर निशाण चढवायचें राहिलें आहे तें घेऊन मी तुझ्या मागोमाग येतेंच आहें. जा. महाराजांना शरण जा. त्यांची माफी मिळव. कशीही तजवीज करून त्यांची मर्जी प्रसन्न करून घे. हें सर्व मी किल्ल्यावर येण्यापूर्वी झालेंच पाहिजे. तसें तूं केलें नाहींस असें जर मला आढळून आलें, तर तुझ्या पोराला तुझ्याच किल्ल्यावर तोफेच्या तोंडीं देऊन उडवीन इतकेंच नव्हे, तर त्याच्या हाडक्या तुझ्या गळ्यांत बांधून याच टकमकीवरून तुझाही कडेलोट करीन! याद राखून ठेव!

( पडदा पडतो. )

---

**अंक चवथा समाप्त.**

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला

**स्थळ**—पद्मावतीची छावणी.

( वेत्रवती येते. )

वेत्रवती:—

### पद ३२

चाल गजल.

मोह मावळला । बोध सुदैवें उगवला ॥ ध्रु० ॥
भय अभयांत विरवा । कोप शमीं स्मावा ।
तोषवु सकलांला ॥ मंगल–माला ॥

( जाते. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—माणिकदुर्ग. राजवाड्यांतला एक महाल.

( भीमसिंग आत्महत्या करूं पहात आहे. दुर्गावती व अमात्य त्यास निवारीत आहेत. दुर्गावती त्याच्या हातांतली कट्यार हिसकून घेत आहे. )

**दुर्गावती:**—बाबासाहेब, असे निराश होऊन आत्मघाताला प्रवृत्त होऊं नका. दादाचें मरण एकदां चुकलें तसें तें पुन्हां चुकवतां येईल कीं नाहीं, लक्ष्मणसिंगांचा कडेलोट जसा खोटा ठरला तसा तुमचाही कडेलोट खोटा ठरवतां येईल कीं नाहीं, हा विचार आपण पाहूं या.

**भीमसिंग:**—बाळे, आतां कसचा विचार पहातेस ? माझ्या दुष्टबुद्धी-पासून जन्म पावलेलीं संकटें भेसुर पिशाचांप्रमाणें माझ्या डोळ्यांपुढें फेर

धरून पिंगा घालीत आहेत आणि त्यामुळें भ्रांत झालेलें माझें मन मंथन यावल्याप्रमाणें घुसळलें जात आहे ! या मंथनाच्या कष्टांतून मुक्त होण्याला मरणाखेरीज दुसरा मार्ग कोणता हें तूंच सांग बरें !

**दुर्गावती**:—आहे. त्याला मरणाखेरीज आणखी एक मार्ग आहे. पूर्वीं देवदैत्यांनीं सागराचें मंथन केलें तेव्हां त्यानें विष्णूला आपली कन्या देऊन टाकली. त्या दिवसापासून मंथनाचा प्रसंग त्यावर पुन्हां कधीं आला नाहीं.

**भीमसिंग**:—समजलों. चतुर्विध उपायांपैकीं दान म्हणजे कन्यादान करून शत्रूचें सख्य संपादन करावें हा उपाय तूं सुचवतेस तो करायला माझ्याकडून तयारी आहे. आणि केवळ आम्हां सर्वांना वांचवण्याकरतां तूं शत्रूची स्त्री व्हायला कबूल झालीस हें तुझ्या मनाचें औदार्य लोकोत्तर होय. पण वेडे, ही युक्ति आम्हाला फार उशीरानें सुचली. आतां तिचा काय उपयोग ? लक्ष्मणसिंग आतां आम्हां दीनदुबळ्यांची विनंती कशाला मान्य करील ? तो आमची भेट सुद्धां घेणार नाहीं. मग आम्ही काय म्हणतों तें ऐकून घ्यायचें दूरच राहिलें.

**दुर्गावती**:—तुम्ही भेटीला बोलावलेंत तर ते येणार नाहींत. पण मी बोलावलें तर खचीत येतील. पहा त्यांना इथे कसे आणतें ते ! अमात्य ! लक्ष्मणसिंग महाराजांकडे जा आणि येथपर्यंत येऊन जाण्याविषयीं त्यांना माझी विनंती कळवा. ( भीमसिंगाच्या हातांतली कट्यार घेऊन अमात्या-जवळ देते. ) आणि ही कट्यार मी खुणेसाठीं पाठवली आहे असें सांगून त्यांच्या हवालीं करा. ( अमात्य जातो तों किल्लेदार घाईघाईनें येतो. )

**किल्लेदार**:—( मुजरा करून ) महाराज, आमचे सर्व उपाय थकले. याउपर आमच्यानें दम निघत नाहीं. पद्मावतीनें किल्ल्याचा दरवाजा काबीज केला. आतां ती राजवाड्यावर चाल करून येत आहे. स्वतःच्या बचावाची आतां काय तजवीज महाराजांना करणें असेल ती अति-त्वरेनें करावी. ( भीमसिंग दुर्गावतीकडे पहातो. )

**दुर्गावती**:—किल्लेदार, जर तुम्ही आणखी एक घटकाभर टिकाव धराल तर धन्याला जीवदान दिल्याचें श्रेय तुम्हांला मिळणार आहे.

कसेंही करा, शूरत्वाची पराकाष्ठा करा, आणि तितका वेळपर्यंत पद्मावतीला थांबवून धरा. जा. ( किल्लेदार जातो. )

**भीमसिंग**:—हे पहा लक्ष्मणसिंग महाराजांना घेऊन अमात्य आलेच ! ( अमात्य व परिवारासह लक्ष्मणसिंग येतो. ) यावें महाराज ! यावें. कृतापराधाबद्दल पश्चात्ताप पावलेला आणि क्षमेची याचना करणारा हा भीमसिंग या खेपेस आपलें स्वागत सरळबुद्धीनें आणि जिव्हाळ्याच्या प्रेमानें करीत आहे.

**लक्ष्मणसिंग**:—फार उत्तम आहे, 'जे मला ज्या प्रकारें भजतात, त्यांना मी त्याप्रमाणेंच फळ देतों.' या भगवद्वाक्याप्रमाणें माझें आचरण आहे, हें मीं तुम्हांला पूर्वीं एकदां सांगितलेंच आहे. तुम्ही सरळ वागत असाल तर त्याचा परिणाम सरळच होईल. वांकडा होणार नाहीं. दुर्गावती, कां बोलावलेंस ? तूं खुणेसाठीं कट्यार पाठविलीस तिनें तुझ्यावर कांहीं बाणीचा वक्त गुदरला आहे असें सुचविलें, आणि पळाचा विलंब लावूं न देतां मला तुझ्याकडे आणलें. या दूतीनें आपलें काम चांगलें बजावलें आहे. ही तुझी तुझ्याकडे जाऊं दे.

**दुर्गावती**:—( त्याच्या हातांतली कट्यार घेऊन ) कांहीं संकटाचा प्रसंग माझ्यावर गुदरल्याचें हिनें सुचविलें तें खरेंच आहे. पण हिनें आणखी कांहीं सुचविलें आहे तें नाहीं का आपल्या लक्षांत आलें ?

**लक्ष्मणसिंग**:—नाहीं लक्षांत आलें. काय तें तूंच सांग म्हणजे झालें.

**दुर्गावती**:—मी नाहीं इतक्यांत सांगायची ! बाबासाहेब काय म्हणतात तें आधीं ऐकून घ्या. मग काय सांगायचें तें सांगेन.

**भीमसिंग**:—माझी अनाथाची अशी प्रार्थना आहे कीं, आपण दुर्गावतीचें पाणिग्रहण करावें आणि तिला व मला सनाथ करावें.

**लक्ष्मणसिंग**:—( आश्चर्यानें चकित होतो. ) राजेसाहेब, काय सांगतां हें ? मी इकडे आलों तेव्हां हें बोलणें आपणाकडून येईल असें माझ्या स्वप्नांतही नव्हतें ! ( दुर्गावतीकडे पाहतो. )

**दुर्गावती**:—महाराज, हा प्रसंगच असा विचित्र बनून आला आहे कीं, लज्जा व मर्यादा सोडून बोलल्याखेरीज मला गत्यंतर राहिलें नाहीं. हा

अपराध या प्रसंगाचा आहे. माझा नाहीं. क्षमा करावी. जर आपणाला माझा अव्हेर करायचा असेल तर माझ्या देहाचा आणि संकटाचा शेवट या कट्यारीनें माझा मीच लावून टाकतें. माझ्या संकटाचा शेवट निराळ्या प्रकारानें कसा करतां येईल हें बाबासाहेबांच्या बोलण्यांत आलेंच आहे. त्याप्रमाणें कर्तव्य असेल तर हीच कट्यार कुळधर्माप्रमाणें लग्नाच्या वेळचें एक उपकरण होईल! तात्पर्य हिला तारक मारक ठरवणें हें सर्वस्वी मी आपणावर सोपविलें आहे.

**लक्ष्मणसिंगः**–दुर्गावती, तूं अशी निकरावर येऊन मला निराशेचे शब्द बोलतेस हें मी तुझ्या अवकृपेचें लक्षण समजतों. स्वतःच्या जिवावर उदार होऊन तूं माझा जीव वांचवला आहेस, त्यापक्षीं या देहावर तुझा हक्क निर्विवाद आहे. हल्लीं तुझ्यावर आलेलें संकट कोणतेंही असो. तुझें संकट तें माझें संकट समजून त्याचें निवारण करणें माझें कर्तव्य आहे. तें कर्तव्य जर तुझें पाणिग्रहण करून मला पूर्ण करतां येत असेल तर तें करायला मी कसा नाकबूल होईन? सखे, तुझ्या वचनाबाहेर मी नाहीं. पण दया कर आणि मला थोडा अवकाश दे. पद्मावतीनें मला बंधमुक्त करण्याकरतां एवढा विश्वप्रयत्न केला आहे. त्या तुझ्या प्रियसखीचें मन न दुखवतां तिची संमति घेऊन ही गोष्ट आपण केली तर बरें नव्हे का? त्यांतून ती कुठे दूर आहे अशांतलाही प्रकार नाहीं.

**दुर्गावतीः**– ( उत्सुकतेनें ) कोण म्हणतें ती दूर आहे म्हणून? तिच्या संमतीवरच आपला मनोदय तटून राहिला असेल तर ती काय सांगते हें तिलाच विचारून घ्या. (पद्मावतीची मुद्रिका त्याच्या हातांत देते.)

**लक्ष्मणसिंगः**– (चपापतो.) हें काय? ही मुद्रिका तुझ्याजवळ कशी आली?

**दुर्गावतीः**–कशी आली तें सांगायला आतां वेळ नाहीं. ती आपल्या मालकिणीचा काय निरोप सांगत असेल त्याप्रमाणें करा म्हणजे झालें.

**लक्ष्मणसिंगः**–ही दूती तुझा निमूटपणें स्वीकार करण्याविषयीं तीचा निरोप मला कळवते. तो निरोप मीं मान्य केला.

**दुर्गावती**:–( हर्षानें )मान्य केलात ? तर मी या क्षणीं कृतार्थ झालें ! बाबासाहेब,महाराजांनीं एकाच शब्दांत आपल्या सर्व विघ्नांचा संहार केला. थोडयाच वेळापूर्वीं आपल्या काळजाचें रक्त चाखूं पाहणारी ही उग्र कट्यार आतां मंगल कार्याची उपयोजक झाली आहे. अशी ही उग्रमंगल वस्तु आतां जागच्या जागीं ठेवा.

**भीमसिंग**:– (तिच्या हातांतून कट्यार घेऊन कमरेच्या पडद्ळांत ठेवतो. ) आतां तुम्हां दोघांचा औपचारिक विवाह करून देण्याचें काम माझ्याकडे राहिलें तें मी अत्यंत संतोषानें करतों. ( दुर्गावतीचा हात लक्ष्मणसिंगाच्या हातीं देतो. ) महाराज, मोहाच्या अंधारांत चांचपडत चालणाऱ्या मला जिनें दीपिकेप्रमाणें सुमार्ग दाखवून अधःपातापासून वांचवलें, ती ही माझी कुलदीपिका कन्या मीं तुम्हाला अर्पण केली आहे. ही उभय कुळांच्या कल्याणाची समृद्धि करो !

**दुर्गावती**:–महाराज, आपण शिष्टाचाराचे ज्ञाते आहां. हा मंगल प्रसंग वडील माणसांना वंदन करण्याचा आहे. तर आपण बाबासाहेबांना नमस्कार करूं या.

**लक्ष्मणसिंग**:–छे बुवा ! यांना नमस्कार करायचा ? आपण नाहीं करणार ! पण आतां नाहीं म्हणून कसें चालेल ? केलाच पाहिजे ! ( अळें बळें नमस्कार करितो. )

**दुर्गावती**:–( हंसते. ) आमच्या बाबासाहेबांपुढें मान वांकवणार नाहीं म्हणत होतां नव्हे का ? आतां कसें कराल ? वांका, वांका, माझ्याइतके खालीं वांका. त्यासाठीं तर माझा आटोकाट प्रयत्न ! आणि आतां नाहीं म्हणून मी कुठे ऐकतें आहें? बाबासाहेब,तुमची प्रतिज्ञा मोठी दुस्तर होती, परंतु आतां तुम्ही तींतून पार पडलां याबद्दल मी तुमचें अभिनंदन करतें.

**भीमसिंग**:–( हंसत ) हो, आतां खोट्या प्रतिज्ञेचा आरोपी म्हणून खालीं मान घालण्याचें कारण मला राहिलें नाहीं.

**लक्ष्मणसिंग**:–( हंसत ) दुर्गावती, हें काय केलेंस ? माझी मान वांकवलीस आणि यांची वर केलीस, यांत काय झालें ? इतक्यांतच तुला माहेरचा ओढा लागला वाटतें ! संसाराच्या मार्गांत सर्व स्त्रियांना

लागणारा हा माहेरचा ओढा बेटा असा विलक्षण आहे कीं, यांत नवरे ओढेबहुत अंशानें बुडाल्याखेरीज माहेरचीं माणसें पार पडतच नाहींत!

( पडद्यांत शब्द होतो—कुठे आहे भीमसिंग? पकडा त्याला! पकडा! )

**भीमसिंगः**—( हंसत ) ही पद्मावतीची गर्जना! आतां ही मला पकडून करणार काय?

**दुर्गावतीः**—कोण म्हणतें भीमसिंगांना पकडा म्हणून?

( पद्मावती परिवारासह घाईघाईनें प्रवेश करते. )

**पद्मावतीः**—कोण म्हणतें म्हणजे? मी म्हणतें भीमसिंगांना पकडा म्हणून!

**दुर्गावतीः**—अहो दांडग्या बाईसाहेब, मीच आधीं तुम्हांला पकडून महाराजांच्या हवालीं करतें.

**पद्मावतीः**—( हर्षानें ) हां! स्वारी इथे आली आहे का? (लक्ष्मणसिंग व पद्मावती भेटतात. ) महाराज, काय हा आजच्या सूर्योदयाचा महिमा! माझ्या मनांत आनंदाच्या लहरींवर लहरीं उचंबळताहेत! सखे दुर्गावती, तुलाही आलिंगन मला देऊं दे गडे! ( दोघी भेटतात. )

**लक्ष्मणसिंगः**—प्रिये, भीमसिंग राजाशीं आमचा कलह आजपर्यंत होता तो उदार दुर्गावतीच्या मध्यस्थीनें शांत झाला आहे. युद्धाच्या कथा आतां राहूं देत!

**पद्मावतीः**—फार फार उत्तम गोष्ट झाली. तर मग आतां कुमार हिरासिंगांना सोडून दिलेंच पाहिजे. ठाकूरजी, जा लवकर आणि हिरासिंगांना मोकळे करून इथे घेऊन या. ( ठाकूर रामसिंग जातो. )

**दुर्गावतीः**—सखे, माझ्या दादाला सोडून दिलेंस, चांगलें केलेंस. पण त्याला तोफेच्या तोंडीं देण्याची तयारी केली असशील ती फुकट जाऊं देऊं नको. दादाच्या जागीं मला तोफेच्या तोंडीं बांधून मारून टाक!

**पद्मावतीः**—( विस्मयानें ) हें काय? तूं नेहमी माझ्याशीं प्रेमाचे गोड शब्द बोलणारी, आणि आज माझ्या आनंदाचा मुद्दाम विरस करण्याकरतां एखाद्या सवतीसारखें उरेंबुरें कां बोलते आहेस?

**दुर्गावती**:—सवतीप्रमाणें बोलते आहेस म्हणजे ? सखे, मी तुझी खरोखरीचीच सवत झालें आहें. मला तोफेच्या तोंडीं दे म्हणतें तें उगीच नव्हे. मी तुझा अपराधच तसा केला आहे.

**पद्मावती**:—खरोखरीची सवत झालें आहें ! याचा काय बाई अर्थ ?

**भीमसिंग**:—देवी पद्मावती, कसेंही करून महाराजांची कृपा संपादन कर, नाहीं तर तुझा कडेलोट करीन, असें तूं मला बजावलें होतेंस. त्या भयानें मी महाराजांना दुर्गावतीचें दान केलें आणि त्यांची मर्जी प्रसन्न करून घेतली.

**लक्ष्मणसिंग**:—आणि या दानाचा प्रतिग्रह करण्याविषयीं तुझी संमति आहे असें तुझ्या मुद्रिकेनेंच मला सांगितलें. ( मुद्रिका दाखवतो. )

**पद्मावती**:—होय. मी हिला ही मुद्रिका मागें एकदां दिली होती खरी ! सखे, या मुद्रिकेचा तूं असा हा भलताच उपयोग केलास एकूण !

**दुर्गावती**:—होय. केला. मी अपराधी आहें आणि त्यासाठींच मला तोफेच्या तोंडीं दे म्हणून सांगितलें.

**पद्मावती**:—मला बुडवून तूं स्वार्थाचें साधन करशील हें माझ्या स्वप्नांतसुद्धां येणार नाहीं. तूं तशीच उदात्त पवित्र मनाची आहेस अशी माझी खात्रीच आहे. ही गोष्ट तूं केलीस त्यांत तुझा कांहीं तरी अतिशय स्तुत्य उद्देश असलाच पाहिजे. कोणचा तो उद्देश ?

**दुर्गावती**:—पूर्वजांची अधोगति टाळावी व ज्यांच्या पोटीं जन्म घेतला त्या परमपूज्य पित्याचे प्राण वांचवावे एवढ्यासाठींच मी महाराजांची स्त्री व तुझी वैरीण झालें. अपत्यधर्माला जागण्यासाठीं मी सखीच्या स्नेहाकडे डोळेझांक केली, हा मी तुझा अपराध केला नव्हे तर काय ?

**पद्मावती**:—छे छे, यांत कसला अपराध आला आहे ? सखे, तुझ्या जागीं मी असतें तर असेंच केलें असतें. याबद्दलची मनांत कांहीं एक खंती मानूं नकोस. तूं सवत आज झालीस, पण सखी जन्मापासूनची आहेस. तुझ्या माझ्या सख्याला सवतीमत्सराचा स्पर्श कधीं देखील होणार नाहीं. महाराजांना द्वितियभार्येचा योग आहे असें गणकाचार्यांनी पूर्वीं मला सांगितलेंच होतें तें खरें झालें. तें कधीं चुकणार होतें ? मला

कोणी तरी सवत व्हायचीच होती ती तूं झालीस ही सुदैवाची गोष्ट नव्हे का ? माझा सहवास रात्रंदिवस घडावा म्हणून तूं देवाजवळ लहानपणीं प्रार्थना करीत होतीस तो तुझा हेतु देवानें अशा रीतानें पर्ण केला एकण !

**दुर्गावती**:—पूर्ण केला असें म्हणूं नकोस. पूर्ण केला नाहीं असें म्हण ! तुझ्या संसारसुखाची आणि ऐश्वर्याची वांटेकरीण व्हावें म्हणून मी महाराजांना वरलें नाहीं. तुझ्यावर माझें कसें प्रेम आहे हें तुला ठाऊकच आहे. ती मी तुझ्या आनंदांत विष कसें कालवीन ? तुझी मी नांवाची सवत झालें, तरी तेवढासुद्धां शब्द माझ्या नांवाला लागलेला मला सहन होत नाहीं. पण मी तरी काय करूं ? लक्ष्मणसिंगानीं मला प्रणाम करावा असाच बनाव घडवून आणीन, न आणीन तर प्राणत्याग करीन, ही बाबासाहेबांची प्रतिज्ञा ! प्रतिज्ञाभंग होईल तर आमचे सप्तपूर्वज अधोगतीला जावोत अशा भयंकर शपथेची त्या प्रतिज्ञेवर पुन्हां त्यानीं मखलाशी केलेली ! ती प्रतिज्ञा खरी करून दाखवण्याची आशा खुंटली तेव्हां बाबासाहेब प्राण देऊं लागले तें मला मरणापेक्षां मरण वाटूं लागलें. त्यांचे प्राण वांचवण्यासाठीं त्यांच्या पायां पडा असें महाराजांना तरी कसें सांगूं ? आणि ते तरी कसे ऐकतील ? बरें. महाराजांशीं सख्य करून त्यांची मर्जी बाबासाहेबानीं प्रसन्न केली नाहीं तर तूं माझ्या भावाला तोफेच्या तोंडीं देणार आणि बाबासाहेबांचा कडेलोट करणार ! याप्रमाणें कलहाच्या विक्राळ राक्षसानें चोहोंकडून उग्र स्वरूप धारण केलें, तो डोळे वटारून माझ्याकडे पाहूं लागला आणि माझा बळी मागूं लागला, तेव्हां सर्वांच्या जिवाला सुख लागावें म्हणून मी माझा बळी देऊन त्याची भूक शांत केली. पद्मावती, तूं आणि महाराज आनंदानें खुशाल राज्य करा, म्हणजे त्यांतच मला पराकाष्ठेचा संतोष आहे. महाराजांच्या कल्याणासाठीं तूं पूर्वीं चंद्रशेखराच्या मंदिरांत राहून सेवा करीत होतीस. तेंच तुझें देवसेवेचें व्रत तुम्हां दोघांच्या कल्याणासाठीं करीत राहून मी आयुष्याचें सार्थक्य करीन.

**भीमसिंग**:—हाय हाय ! दुर्गावती ! हा तुझ्या वर्तनाचा अर्थ त्यावेळीं माझ्या लक्षांत कसा आला नाहीं ? तुझ्या या अपूर्व आत्मयज्ञाची झळ माझ्या संसारसौख्याची राखरांगोळी करील ! हें साहस तूं करूं नकोस.

**लक्ष्मणसिंगः**—धन्य धन्य दुर्गावती! तूं स्त्रीजातीच्या स्वार्थत्यागाची बोलती चालती प्रतिमाच आहेस. अशा पूज्य स्त्रीरत्नाचें पाणिग्रहण करून मी त्याची अनास्था होऊं देईन तर परमेश्वर मला पाठमोरा होईल. आणि मला राज्याचा उपभोग कारागृहापेक्षांही दुःखदायक वाटेल. हा वैराग्याचा विचार मनांत आणला आहेस तो सोडून दे.

**पद्मावतीः**—( दुर्गावतीच्या गळ्यास मिठी मारून ) नको नको! दुर्गावती! अशी औदार्यानें आम्हांला मारूं नकोस. आजपर्यंत तूं आणि मी शरीरानें दोन, परंतु मनानें एक अशाच वागत आलों; आणि आतांच हा द्वैतभाव कां धरलास? जशा पूर्वीं वागत आलों तशाच वागूं आणि आनंदानें राहूं. बाबासाहेब सांगतात, महाराज सांगतात, आणि मीही गळ्याची शपथ घालून प्रार्थना करितें.

## पद ३२

राग भैरवी. ताल कवाली.

**दे मज हें सखे । सोडूं नको तूं मला ॥ ध्रु० ॥**
**भाग्यभोगा सेवुं सहचरी । रमवुनि पतिमन । राहूं सुखें प्रेमला ॥**

आम्हां सर्वांची प्रार्थना मान्य केलीसना? ( दुर्गावती माननें होय असें सुचवते. ) महाराज, माझ्या सखीच्या मनांत जो कांहीं संकोच राहिला असेल तो घालवण्याकरतां हिचा हात पुन्हां मीच आपल्या हातांत देतें. ( तसें करते. ) हो, या आनंदाच्या प्रसंगीं आणखी एक वधूवरांची जोडी माझ्याकडून हस्तसंमेलनाची अपेक्षा करीत आहे. तेंही मंगलकार्य याच वेळीं करतें. ( कलावतीचा हात विद्याधराच्या हातांत देते. ) ( हिरासिंगास घेऊन रामसिंग येतो. ) हे कुमार हिरासिंग आले. कुमार, जसे दुर्गावतीचे तसे माझेही तुम्ही बंधु झालां! बाबासाहेब, हे आमचे दादासाहेब तुमच्या भेटीला आणले आहेत!( हिरासिंग सर्वांस भेटतो.)महाराज, आतां आमच्या सर्व संकटांचा परिहार होऊन सर्वत्र आनंदीआनंद झाला आहे. आपलें आणखी कोणतें प्रिय व्हायचें राहिलें आहे?

**लक्ष्मणसिंगः**—नेहमीं जवळ रहाणाऱ्या तुम्ही दोघी संधिविग्रहाच्या देवता मला अनुकूळ असल्यावर आणखी प्रिय व्हायचें तें कोणतें राहिलें?

तथापि या वेळीं भगवान् चंद्रशेखरजवळ कांहीं मागणें मागायचें तर हेंच मागूं कीं--

सर्व जणः—

## भरतवाक्य.

### पद ३४

राग हिंदोल. ताल सुरफाकता.

संसरण-दुख-करी। भव-भयांतकारी।
भगवद्गीताज्ञा। ठसवुनि मनिं निर्वृति वरो विरागी॥ ध्रु०॥
विहित संभारें करो। अवहित जन संसारीं। फलकामनेला।
नच धरो कर्मयोगी॥

पडदा पडतो.

---

अंक पांचवा समाप्त.

उग्रमंगल नाटक समाप्त.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

या पुस्तकांत पटवर्धन सरदारांच्या जुन्या दप्तरांतील ऐतिहासिक महत्त्वाचे निवडक अस्सल कागदपत्र सालवारी लावून तारीख, महिना व सन यांच्या अनुक्रमानें आम्ही छापीत आहों. प्रत्येक कागदावर तारीख, महिना व सन घातलेला असतो आणि त्याखालीं अर्थाची फोड करणाऱ्या भरपूर टिपाही दिलेल्या असतात. शिवाय प्रत्येक प्रकरणास आंतील विषयाचें सुसंगत विवेचन करणारी एक एक प्रस्तावनाही जोडिलेली असते. पानिपताच्या युद्धापासून तों तहत बाजीरावाच्या अखेरीपर्यंतचा इतिहास या पुस्तकांत येत असून तो त्या त्या काळांतील पेशवे, प्रमुख मुत्सद्दी व सरदार यांच्याच शब्दांनीं वर्णिला जात आहे. आजपर्यंत या पुस्तकाचे दहा भाग प्रसिद्ध झाले आहेत. त्यांपैकीं पहिले चार भाग शिल्लक नाहींत. पुढचे पांचव्यापासून अकराव्यापर्यंत सात भाग विक्रीस आहेत. दहा व अकरा या भागांची किंमत चार रुपये असून बाकी सर्व भागांची किंमत प्रत्येकीं ३ रु० आहे. शिवाय पोस्टेज प्रत्येक भागास ०५ निराळें पडेल.

## ऐतिहासिक-लेख-संग्रहांतील-विषयानुक्रम.

**भाग पहिला**—सन १७६० जानेवारी ते १७६३ मेपर्यंत. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीची अखेर-माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें-मोंगलांची पुण्यावर स्वारी-लढाया व तह-माधवराव व दादासाहेब यांमध्यें वितुष्ट-घोडनदीची लढाई-समेट-राघोबाची पटवर्धन वगैरे सरदारांवर गैरमर्जी-मिरजेचा वेढा-मोंगलांची पुण्यावर दुसरी स्वारी-पुण्याचा विध्वंस-पेशव्यांची मोंगलाईवर स्वारी. डे. अ पृ. ४८०.

**भाग दुसरा**—सन १७६३ मे ते १७६४ डिसेंबरापर्यंत. राक्षसभुवनची लढाई-मोंगलांशीं तह-हैदरअल्लीचें मनोवेधक चरित्र-पेशव्यांची हैदरअल्लीवर पहिली स्वारी-रटेहळ्ळी-अनवटी, हावेरी येथील लढाया-सावनूरचें रक्षण-धारवाडचा वेढा. डे. अ. पृ. ४८०.

**भाग तिसरा**—सन १७६४ डिसेंबर ते १७६९ ऑक्टोबरपर्यंत. अनंतपूर व बिदनूर येथील लढाया-हैदरअल्लीशीं तह-भोंसल्यावर पहिली स्वारी-तोतया प्रकरणाचा-उद्भव-राघोबाची गोहद वगैरे उत्तरप्रांतीं स्वारी-पेशव्यांची हैदरअल्लीवर दुसरी स्वारी-शिरें-मदगिरी, चेनरायदुर्ग, येथील लढाया-तह-माधवराव व

राघोबा यांची आनंदवल्लीस भेट–धोडपची स्वारी व राघोबास कैद–भोंसल्यांवर दुसरी स्वारी. डे. अ. पृ. ४८०.

**भाग चवथा**––सन १७६९ ऑक्टोबर ते १७७३ ऑगस्टपर्यंत. भोंसल्याशीं तह–हैदर अल्लीवर तिसरी स्वारी–कोल्हार, बाळापूर, नंदिदुर्ग वगैरे ठिकाणीं लढाया–हैदराचा गोपाळरावावर छापा–निजगलचा वेढा–पेशवे दर्शी येतात–गोपाळरावांचा मृत्यु–त्रिंबकराव मामाचे पराक्रम–मोतीतलावाची लढाई–श्रीरंगपट्टणाचा वेढा–तह–बिनीवाल्यांची फत्तरगडावर स्वारी–जाटांशीं लढाई–बादशहाची स्थापना–दिल्लीची लढाई–रोहिल्यांवर सूड–पेशव्यांचा अजार व त्यांतील अनेक हृदयद्रावक प्रसंग–मृत्यु–रमाबाईचें सहगमन–नारायणरावाची पेशवाईवर स्थापना–छोटी कारकीर्द व खून. डे. अ. पृ. ६००.

**भाग पांचवा**––स. १७७३ ऑगस्ट ते १७७६ जुलईपर्यंत. बारभाईचें कारस्थान–निजामअल्लीशीं लढाई व भेट–गंगाबाईची स्थापना–कासेगांवची लढाई–राघोबाचा पाठलाग–समेटाची खटपट व राघोबाचें पलायन–गुजराथची मोहीम–इंग्रजांशीं लढाया–पुरंदरचा तह–कोळ्यांचा दंगा–प्रतिनिधींचा दंगा–कोल्हापूरकरांशीं लढाया–तोतयाच्या बंडाची सुरुवात. डे. अ. पृ. ६००

**भाग सहावा**––१७७६ ऑगस्ट ते स. १७७८ एप्रिलपर्यंत. तोतयाच्या बंडाचा बीमोड–परशुरामभाऊंची कोल्हापुरावर मोहीम–पांडुरंगरावांची धारवाडप्रांतीं स्वारी–सावशीची लढाई व सैन्याची वाताहत–परशुरामभाऊ कुमकेस जातात–त्यांच्या गनीमी हालचाली–पाळेगारांचें पारिपत्य–भाऊ व हरिपंत यांची धारवाडप्रांतीं छावणी–हैदरअल्लीवर पांचवी स्वारी–महादाजी शिंद्यांची कोल्हापुरावर स्वारी–मोरोबादादांचें कारस्थान–उभारणी व चलती–कर्नाटकच्या फौजा देशीं येतात. डे. अ. पृ. ६००.

**भाग सातवा**—सन १७७८ एप्रिल ते १७८४ एप्रिलपर्यंत. मोरोबादादांचें कारस्थान ( उत्तरार्ध ) व पारिपत्य–दरबारची डळमळ–परशुरामभाऊ स्वारीस निघतात–बेरड––बंडखोरांचा दंगा–भाऊंची सुरापुरावर स्वारी–इंग्रजांची पुण्यावर स्वारी–पराजय व वडगांवचा तह–करवीरकरांचा बंदोबस्त–कित्तूरकराचें पारिपत्य–इंग्रजांशीं तिसरा बिघाड–इंग्रज गुजराथ व्यापितात–वसई व कल्याण घेतात–पुण्यावर चालून येतात–पटवर्धनांशीं निकरानें लढतात–रस–

देची लूट व पीछेहाट–सालबाईचा तह–स्वस्थतेचीं दोन वर्षे–काशीयात्रा–करवीरकरांचा पुन्हां बंदोबस्त व तह. डे. अ. पृ. ६१०.

**भाग आठवा**—स. १७८४ मे पासून १८९१ फेब्रुवारीपर्यंत–मराठे व मोंगल यांच्या यादगीर येथें भेटी–टिपूचा नरगुंदास वेढा–नरगुंदकरांची मर्दुमी–परशुरामभाऊ कुमकेस येतात–झटापटी–तह–टिपू दगा करून नरगुंद व कित्तूर घेतो–टिपूवर पहिली मोहीम–होळकर व बेहरे कित्तूर प्रांतीं येतात–मराठे व मोंगल यांच्या पुनः भेटी–चदामी–अदवानी–टिपू मराठे व मोंगल यांस छापे घालून हैराण करितो–तह–स्वस्थतेचीं पुनः तीन वर्षे–पेशवे नाशिकास जातात–परभू ग्रामण्यप्रकरण पुन्हा उद्भवतें–सोनार व वेदोक्त–टिपूवर दुसरी मोहीम–मराठे-मोंगल व इंग्रज एकत्र होतात–परशुरामभाऊंचा धारवाडास वेढा–निकराच्या लढाया–इंग्रजांची मर्दुमी–चातेऱ्या, पेठ, रेंवणी व खंदक यांवर हल्ले. डे.अ. पृ.६००

**भाग नववा**—स. १७९१ मार्च ते १७९६ नोव्हेंबरपर्यंत. धारवाड काबीज होतें–म्हैसूरच्या राज्यावर स्वारी–चांकी नवाबाचा पराजय–इंग्रजांची श्रीरंगपट्टणावर स्वारी व पीछेहाट–इंग्रजी व मराठी लष्करांच्या भेटी–इंग्रजांचा पट्टणास वेढा–घाशीराम कोतवाल–पाटीलबावा देशीं येतात–श्रीमंतांची कृष्णा-स्नानार्थ स्वारी–साताऱ्यास महाराजांची भेट–टिपूशीं तह–पाटीलबावांचा पुण्यास मुक्काम–वकीलमुतलखी–नानाशीं वैमनस्य–सचिव प्रकरण–गायकवाडांची सरदारी–पाटीलबावांचा मृत्यु–अळत्याची लढाई–करवीरकरांवर मोहीम–खर्ड्याची लढाई–सवाईरावसाहेबांचा मृत्यु–बाजीरावसाहेब पुण्यास येतात.–शिंद्यांचें प्राबल्य–नाना साताऱ्यास जातात–शेणवी कारभारी व पटवर्धन सरदार यांचा मिलाफ–चिमाजीआप्पाची स्थापना व छोटी कारकीर्द–नाना वाईस जातात–महाडाकडे पळतात–महाडचें कारस्थान–शेणवी व पटवर्धन यांचा पाडाव–परशुरामभाऊंस कैद. डे. अ. पृष्ठें ६००.

**भाग दहावा**—स १७९६ दिसेंबर ते १७९८ डिसेंबर अखेर. बाजीराव-साहेबांची स्थापना–नवाब, भोसले, शिंदे, होळकर यांच्या लष्करांचा पुण्यास मुक्काम–पेशवे व शिंदे यांजविषयीं नानांचा बेभरंवसा–शिंद्याकडून नानांच्या द्रव्यहरणाची सुरुवात–नबाब, शिंदे व भोसले यांचे लढे व समजुत–काशीराव होळकरास सरदारीचीं वस्त्रें–खुन्या मुरलीधर–मल्हारराव होळकरावर छापा व मृत्यु–नाना व शिंदे यांत द्रव्यमूलक वितुष्ट– मुकीराची दगलबाजी

–नानांचा कारागृहवास–घाटगेशाहीच्या राक्षसी लीला–अनूदार धनिकांचा अमानुष छळ–शेणवी सरदारांवर साडेसाती–शिंदे बायांचें बंड उद्भवतें–बंड जोरावतें–घाटग्याचा अमृतरावावर छापा–पेशवे व शिंदे यांत बेबनाव–सातारकर महाराजांचा दंगा–रास्त्यांची त्रेधा–परशुरामभाऊंची सुटका–नानांची सुटका–भाऊंच्या सातारकरांशीं लढाया–साताऱ्यावर हल्ला व लूट–महाराजांचा बंदोबस्त–पेशव्यांकडून नानांची पायधरणी–नाना पुन्हां कारभारी होतात-परशुरामभाऊंची शेवटची स्वारी–सुरापूरची खंडणी–कर्नाटकची मुलुखगिरी. डे-अ. पृष्ठें ६०० किं. ४ रु.

**भाग अकरावा**—सन १७९७ सप्टेंबर ते सन १८०० फेब्रुवारी–मागच्या दोन प्रकरणांची अधिक तपशीलवार माहिती. चतुरसिंगाचा रास्त्यांच्या लष्करावर छापा–रास्ते चतुरसिंगाचें बंड मोडतात–विश्रामबाग राजवाडा–शितोळे व निपाणीकर–पंढरपुरीं डुकराचें कौतुक–दक्षिणप्रांतीं बायांच्या फौजेचा दंगा–बाया व करवीरकर यांचा मिलाफ–पेशवाईतले नामांकित वैद्य–बाळोबातात्यांची सुटका व पुन्हां कारभारावर स्थापना–पेशव्यांकडून परशुरामभाऊंस सरंजामाची मोकळीक, बहुमान व धारवाडचा किल्ला मिळतो–नाना, भाऊ व बाळोबा यांचा मिलाफ–बाळोबांच्या मध्यस्थीनें बायांची समजूत–भाऊ करवीरच्या बाजूस येतात–गोकाक, हुकेरी व चिक्रोडी वगैरे ठाणीं घेतात–भाऊंवर जारण-मारणाचा प्रयोग व त्यामुळें शरीराची हैराणगत–सातारच्या संस्थानाकरितां चतुरसिंगाचा आणखी प्रयत्न–इंग्रज टिपूचें राज्य घेतात–वाघाच्या बंडाची सुरुवात–भाऊ व करवीर यांच्या हालचाली–पट्टणकुडीची लढाई–भाऊंचा मृत्यु व त्यांच्या सैन्याची वाताहत–पुणें दरबार कह्यांत आणण्याविषयीं इंग्रजांचा कावा–घाटग्याची सुटका–घाटग्या शिंदे बायांवर मारेकरी घालतो–रामचंद्र परशुराम करवीर राज्यावर स्वारी करितात–पुण्याहून फौज व पलटणें कुमकेस आणितात–शिराळें काबीज करितात–करवीरच्या फौजेवर छापा घालून नासधूस करितात–करवीरावर चालून जातात–करवीरची लढाई. डे. अ. पृ. ६००. किं. चार रुपये.

## आमचीं इतर ऐतिहासिक पुस्तकें व कविता.

**अधिकार–योग** अथवा नाना फडनवीस यांस राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास–'खूच शर्तीनें राज्य राखणाऱ्या' नाना फडनावीसांनीं राज्य बुडवि-

ांन्या एकाहून एक बलिष्ठ अशा प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठीं लढविलेलीं कारस्थानें, तीं लढवितांना त्यांवर आलेलीं दुर्धर संकटें, त्या संकटांतून पार पडतांना त्यांनीं प्रकट केलेली निस्सीम स्वामिभक्ति, उज्वल देशाभिमान व अलौकिक चातुर्य यांचें सप्रमाण वर्णन सरदार परशुरामभाऊ पटवर्धन वगैरेंच्या लेखांतून जागोजाग भरपूर उतारे देऊन या ग्रंथांत केलें आहे. किं. ८१०

**हरिवंशाची बखर** अथवा पटवर्धन सरदारांच्या हकीकती—या पुस्तकांत पेशवाईतील पटवर्धन वगैरे प्रसिद्ध सरदार व थोर थोर मुत्सद्दी यांचे अद्भुत पराक्रम, चातुर्य, धाडस, स्वाभिमान, गुरुजनांविषयीं आदर, औदार्य व निस्सीम स्वामिभक्ति वगैरे सद्गुणांचें उत्तम प्रकारें आविष्करण करणाऱ्या आणि वीर, करुण व हास्य या रसांनीं ओथंबलेल्या आख्यायिका असून लढाईंतले, छावणींतले, दरबारचे व नानाप्रकारचे घरगुती प्रसंग फार मनोरंजक प्रकारें वर्णिले आहेत. किं० ८१०.

**इचलकरंजी संस्थानाचा इतिहास**—यांत प्रारंभीं कापशीकर प्रसिद्ध सेनापति संताजी घोरपडे यांचा वृत्तांत सांगून नंतर त्यांच्या दौलतींतून इचलकरंजी संस्थान कसें उद्भवलें, कसें फैलावलें व नानाविध संकटांतून आजपर्यंत कसें पार पडत आलें यांचें सविस्तर विवेचन केलें आहे, व त्याच्या अनुषंगानें संस्थानाचे मूळ संपादक नारो महादेव यांजपासून तों विद्यमान नारायणराव गोविंद यांजपर्यंतच्या सर्व अधिपतींचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. या पुस्तकांत विशेष हा आहे कीं, शाहूमहाराजांच्या मरणापूर्वींचे व त्यानंतरचे प्रसंग, राजसत्ता भोसल्यांच्या घरांतून निघून पेशव्यांच्या हातीं कशी गेली तो प्रकार—मराठी राज्याची घटना व तिचे मोंगलसत्तेशीं संबंध वगैरे अत्यंत महत्त्वाच्या विषयांची चर्चा अन्यत्र कोठेंही न केलेली या पुस्तकांत वाचावयास मिळेल. इचलकरंजी संस्थानाच्या प्राचीन दप्तरांतील ज्या पत्रें, यादी वगैरे अस्सल लेखांच्या आधारें हा इतिहास लिहिला ते लेखही याच पुस्तकांत छापिले आहेत, डे. अ. पृष्ठें ५३० किं. ३ रु.

सदरहू संस्थानाचा फक्त इतिहास, पत्रें यादीविरहित. डे. अ. पृ. १८७ किं. १८..

**मालोजी व शहाजी**—मालोजी राजे व शहाजीमहाराज भोंसले याविषयींची जेवढी माहिती बखरींतून व मुसलमानी तरवारिखांतून मिळणारी आहे, तिच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दल चिकित्सक पद्धतीनें विचार करून आम्हीं हें बुक नुकतेंच तयार केलें. यांत मनोरंजक नवी माहिती पुष्कळच आली असून याच्या वाचनानें शिवाजीमहाराजांच्या अद्भुत चरित्राच्या पूर्वभागाची उपपत्ति चांगली कळते. किं. ८५.